CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १६० । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

पंजाब किंग्ज वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू

## विचारपुष्प



हिंदू राष्ट्राच्या परम् वैभवाचे साधन म्हणून धर्माचे रक्षण करणे आणि त्यासाठी हिंदूंची विजयशाली संघटित कार्यशक्ती, अर्थात् प्रत्येक हिंदूच्या हृदयात राष्ट्राप्रति समर्पणाचे संस्कार रुजवून, त्याला सुसंस्कारित करून, त्याचे अनुशासनबद्ध संघटन निर्माण करणे होय.

- **दत्तोपंत ठेंगडी,** भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक



# पुढील सुनावणीपर्यंत वक्फ मालमत्ता रद्द नाही




**● केंद्र सरकारचे आश्वासन; न्यायालयाने उत्तरासाठी दिले सात दिवस ● पुढील सुनावणी ५ मे रोजी**

**◆ नवी दिल्ली, १७ एप्रिल**

संसदेने पारित केलेल्या वक्फ सुधारित कायद्याच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बाय युजरसह १९९५ च्या कायद्यानुसार वक्फ मंडळाने घोषित केलेली मालमत्ता रद्द केली जाणार नाही आणि केंद्रीय वक्फ परिषद व राज्य वक्फ मंडळांमध्ये बिगरमुस्लिम सदस्यांची नियुक्ती केली जाणार नाही, असे आश्वासन केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिले. या आश्वासनाची नोंद घेत न्यायालयाने उत्तर सादर करण्यासाठी सात दिवसांचा वेळ सरकारला दिला. ५ मे रोजी पुढील सुनावणी होणार आहे.


वक्फ मालमत्ता रद्द करणे, वक्फ बाय युझर आणि वक्फ परिषद आणि राज्य वक्फ मंडळांमध्ये बिगरमुस्लिमांची नियुक्ती या तरतुदींवर अंतरिम आदेश पारित करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्तावाचा केंद्र सरकारने कडाडून विरोध केला. मुख्य न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठापुढे गुरुवारी सुनावणी झाली. सात दिवसांच्या आत यावर केंद्र सरकार थोडक्यात उत्तर सादर करणार आहे. तसेच पुढील सुनावणीपर्यंत वक्फ सुधारित कायद्यातील कलम ९ आणि १४ अंतर्गत परिषद अथवा मंडळावर नियुक्ती केली जाणार नसल्याचे सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयाला सांगितले, असे खंडपीठाने म्हटले आहे.

केंद्र सरकारचे म्हणने ऐकून घेतल्याशिवाय संसदेने पारित केलेल्या कायद्याला स्थगिती देऊ नये, अशी विनंती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी खंडपीठाला केली. तुषार यांचे म्हणणे ऐकल्यानंतर खंडपीठाने वक्फ सुधारित कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर उत्तर दाखल करण्यासाठी केंद्र सरकारला सात दिवसांचा कालावधी दिला. तसेच पुढील सुनावणी ५ मे रोजी निश्चित केली.

आजच्या सुनावणीतील महत्त्वाचे मुद्दे म्हणजे वक्फ बाय युजर आणि वक्फ परिषद आणि राज्य मंडळांवरील बिगरमुस्लिमांची नियुक्ती या कायद्यातील तरतुदींवरील हंगामी स्थगिती म्हणजे केंद्र सरकारला धक्का मानला जात आहे.

या सुनावणीत कायद्याच्या विरोधात राजीव धवन, कपिल सिब्बल, अभिषेक मनू सिंघवी, सी. यू. सिंह, राजीव शाकधर, संजय हेगडे, हझेफा अहमदी आणि शादान फरासत यांनी बाजू मांडली. तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, राकेश द्विवेदी व रणजित कुमार यांनी कायद्याच्या बाजूने युक्तिवाद केला. ◂(वृत्तसंस्था)

### पाच याचिकांवर सुनावणी



वक्फ कायद्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात १५० पेक्षा जास्त याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मात्र, फक्त पाचच याचिका प्रातिनिधिक म्हणून स्वीकारल्या जाणार असून त्यावर सुनावणी होईल. त्यामुळे सर्व याचिकांमधून पाच याचिका म्हणून निवडून न्यायालयाला सादर करण्यावर सहमती झाली आहे.

### आपलाच विजय झाल्याचा समर्थक-विरोधकांचा दावा

आजच्या निकालावर कायद्याचे विरोधक आणि समर्थक यांनी आनंद व्यक्त केला. दोन तरतुदी वगळता उर्वरित तरतुदींवर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे तसेच कायद्याला स्थगिती दिलेली नाही. वक्फ बाय युजर आणि नोंदणी असलेल्या वक्फ मालमत्ता वगळता नोंदणी नसलेल्या वक्फ मालमत्तांविरोधात कारवाई करता येणार आहे, असे हिंदू पक्षकार विष्णू गुप्ता यांचे वकील वरुण कुमार सिन्हा यांनी म्हटले आहे. दुसरीकडे वक्फ बाय युजर आणि वक्फ परिषद आणि राज्य वक्फ मंडळ नियुक्तीसंदर्भातील निकालावर आम्ही समाधानी आहोत, असे आपचे आमदार अमानतुल्ला खान, काँग्रेस खासदार इमरान प्रतापगडी यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रपतींना कोणीच निर्देश देऊ शकत नाही

**◆ नवी दिल्ली, १७ एप्रिल**

न्याय पालिकेच्या अमर्यादित अधिकारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतांना उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी कोणतीही शक्ती राष्ट्रपतींना निर्देश देऊ शकत नसल्याचे म्हटले आहे.



राज्यसभेच्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या सहाव्या तुकडीला संबोधित करतांना धनकड म्हणाले की, न्यायपालिकेचा अधिकार हा फक्त सल्ला देण्याचा आहे, सल्ला ही सहमती नाही, तर सल्ला हा फक्त सल्लाच आहे. राष्ट्रपतींना निर्देश देता येईल, असे वातावरण देशात निर्माण करता येणार नाही.

देशात राष्ट्रपतींचे पद सर्वोच्च आहे, आणि राष्ट्रपती संविधानाचे रक्षण, संरक्षण आणि बचावची शपथ घेत असतात, याकडे लक्ष वेधत धनकड म्हणाले की, अशी शपथ फक्त राष्ट्रपती आणि राष्ट्रपतींद्वारा नियुक्त राज्यपालच घेत असतात. संविधानचे रक्षण आणि संरक्षण करण्याची शपथ तिन्ही सेनादलांचे सर्वोच्च सेनापती असलेले राष्ट्रपती घेत असतात. उपराष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री, न्यायाधीश संविधानाचे पालन करण्याची शपथ घेत असतात. काही दिवसांपूर्वी न्यायालयाने राष्ट्रपतींना निर्देश दिले होते.


राष्ट्रपतींकडे विचारार्थ ज्या फाईल पाठवल्या जातात, त्यावर त्यांनी तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यायला पाहिजे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच दिले आहे.

विधानसभा वा लोकसभा निवडणूक लढवणाऱ्याला आपली संपत्ती जाहीर करावी लागते, मात्र न्यायाधीशांसाठी ते अनिवार्य नाही, असे स्पष्ट करत धनकड म्हणाले की, राष्ट्रपतींना निर्देश दिले जातील, अशी स्थिती खपवून घेता येणार नाही. घटनेच्या अनुच्छेद १४५(३ ) अंतर्गत न्याय पालिकेला संविधानाची व्याख्या करण्याचा अधिकार आहे. असा अधिकारही पाचपेक्षा जास्त न्यायमूर्तींच्या संविधानपीठाला असतो. ◂(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### निर्देशांकाने गाठला ७८ हजारांचा टप्पा

**मुंबई** : टॅरिफच्या मुद्यावर अमेरिका-जपानची चर्चा ही बातमी देशांतर्गत शेअर बाजारासाठी अतिशय सकारात्मक ठरली आणि निर्देशांकाने मोठी झेप घेत ७८ हजारांचा टप्पा गाठला. मुंबई बाजाराचा निर्देशांक १५०८ अंकांनी वाढून ७८,५५३ वर बंद झाला तर निफ्टीत ४१४ अंकांची लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली. निफ्टी २३,८५१ वर बंद झाला. जागतिक व्यापार युद्धात गेल्या काही दिवसात शिथिलता आल्याने बाजार सावरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यातूनच गुंतवणूकदार थोडे आश्वस्त होऊन शेअर्स खरेदी करत आहेत. याचा परिणाम म्हणून सलग चौथ्या दिवशी निर्देशांक आणि निफ्टीत वाढ झाली. या तेजीतही आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपनी विप्रोचे शेअर्स पाच टक्क्यांनी घसरले होते. जानेवारी ते मार्चच्या निराशाजनक तिमाही निकालांमुळे विप्रोच्या शेअर्समध्ये मोठी घसरण नोंदविण्यात आली.




### आम्ही बाप चोरला नाही, हृदयात पुजला : शिंदे

**मुंबई** : बाप चोरला हे रडगाणे सुरूच आहे, आम्ही बाप चोरला नसून तो कायम हृदयात पुजला आणि यापुढेही पुजत राहू. पण, तुम्ही पाप झाकण्यासाठी त्यांचा आवाज चोरला, त्यांचे विचार चोरले आणि हे विचार चोरण्याचे पाप आम्ही नाही तुम्हीही केले अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांचे जुने व्हिडीओ दाखवत उद्धव ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. प्रसार माध्यमांशी बोलताना शिंदे म्हणाले, बाळासाहेब यांनी काँग्रेससोबत जाण्याची वेळ येईल तेव्हा राजकारणातून बाहेर जाईन असे म्हटले होते. पण त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांच्या विरोधात जावून निर्णय घेतला. आम्ही आज आणि उद्यादेखील बाळासाहेबांच्या विचारावरच समोर जाणार आहे. जनतेने तुम्हाला गेल्या निवडणुकीत धडा शिकवला, हे विसरू नका.

### स्वारगेट प्रकरणात ८९३ पानी आरोपपत्र दाखल

**पुणे** : राज्यभरात खळबळ माजवणाऱ्या स्वारगेट एस.टी. स्थानक बलात्कार प्रकरणी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत आरोपी दत्तात्रय गाडे याच्याविरोधात ८९३ पानांचे आरोपपत्र शिवाजीनगर येथील सत्र न्यायालयात दाखल केले आहे. ५२ दिवसांत खंडणीविरोधी पथकाने हा तपास पूर्ण करत आरोपपत्र दाखल केले आहे. हा धक्कादायक प्रकार २५ फेब्रुवारी रोजी सकाळी सहाच्या सुमारास घडला होता. परगावी जाण्यासाठी स्वारगेट एस.टी. स्थानकात आलेल्या एका तरुणीकडे आरोपी दत्ता गाडे याने स्वत:ला वाहक असल्याची बतावणी केली. त्यानंतर तरुणीला एका शिवशाही बसमध्ये नेऊन, दरवाजा बंद करून तिला जीवे मारण्याची धमकी देत दोनदा बलात्कार केला. या घटनेनंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करत आरोपीला अटक केली. मात्र, अद्याप आरोपीचा मोबाईल पोलिसांच्या हाती लागलेला नाही, अशी माहिती तपासातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.



वक्फ सुधारित कायद्याच्या विरोधात झालेल्या आंदोलनानंतर मुर्शिदाबाद जिल्ह्यात हिंसाचार उसळला होता. न्यायालयाच्या आदेशानंतर या भागात निमलष्करी दल तैनात करण्यात आले आहे.

### हिंदीकरणाचा प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही

**मुंबई** : हिंदी ही राष्ट्रभाषा नसून देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची? तुमचे त्रिभाषेचे सूत्र सरकारी व्यवहारांपुरतेच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. राज्यात हिंदीकरणाचा प्रयत्न कदापि यशस्वी होऊ देणार नाही अशा शब्दात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीच्या निर्णयावरून राज्य आणि केंद्र सरकारला इशारा दिला. अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्याचा प्रस्ताव आहे.

# बंगालमधील २६ हजार शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा

### नवीन भरती होईपर्यंत शिकवू शकणार

**◆ नवी दिल्ली, १७ एप्रिल**

पश्चिम बंगाल शिक्षक भरती घोटाळा प्रकरणात गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने सुमारे २६,००० बडतर्फ शिक्षकांना दिलासा दिला. न्यायालयाने म्हटले आहे की ज्या शिक्षकांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे ते नवीन निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अध्यापन सुरू ठेवू शकतात. जरी २०१६ च्या घोटाळ्याच्या प्रकरणात त्याचे नाव आले नव्हते. न्यायालयाने म्हटले, कोणत्याही निर्णयामुळे मुलांचे शिक्षण बाधित होऊ नये अशी आमची इच्छा आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले, बंगाल स्कूल सर्व्हिस कमिशन (एसएससी) ला ३१ मे पर्यंत भरती प्रक्रियेसाठी अधिसूचना जारी करावी लागेल. निवड प्रक्रिया ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करावी लागेल. बंगाल सरकार आणि एसएससीला ३१ मेपर्यंत भरतीची जाहिरात जारी करावी लागेल आणि त्याचे संपूर्ण वेळापत्रक न्यायालयात सादर करावे लागेल. जर प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण झाली नाही तर न्यायालय योग्य ती कारवाई करेल आणि दंड आकारेल.

तथापि, गट क आणि गट ड मधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कोणताही दिलासा मिळालेला नाही. यातील बहुतेक कर्मचाऱ्यांवरील आरोप सिद्ध झाले आहेत, असे न्यायालयाने म्हटले आहे. ३ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने कोलकाता उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला होता. ◂(वृत्तसंस्था)

# 'घरगुती हिंसाचार' प्रकरणी सासूलाही तक्रार करता येणार

### अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्वाळा

**अलाहाबाद, १७ एप्रिल**

सासूला सून किंवा कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याकडून त्रास दिला जात असेल. तसेच तिचा शारीरिक किंवा मानसिक छळ होत असेल तर तिला पीडित व्यक्तीच्या कक्षेत आणता येईल. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १२ अंतर्गत सासूने सुनेविरुद्ध केलेला तक्रार अर्ज कायम ठेवण्याचा अधिकार असेल, असे अलाहाबाद उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.



या प्रकरणी सून आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांना समन्स बजावण्याचा सत्र न्यायालयाचा निर्णयही उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. तक्रारदार सासूने लखनौ अतिरिक्त सत्र न्यायालयात सूनेविरोधात तक्रार दाखल केली होती. तिने तक्रारीत म्हटले होते की, सून आपल्या मुलास स्वत:च्या पालकांसोबत राहण्यासाठी दबाव आणत आहे. या कारणावरून ती आपल्यासह कुटुंबातील अन्य सदस्यांशी गैरवर्तन करत आहे. वारंवार खोटे खटले दाखल करण्याची धमकीही ती देत आहे. या तक्रारीची अतिरिक्त सत्र न्यायालयाने दखल घेतली. सुनेसह तिच्या पाच नातेवाईकांना समन्स बजावला. सुनेने समन्स आदेशाला आव्हान देणारी याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

# निवडणूक सुधारणांविरोधातील याचिकांवर उत्तरासाठी केंद्राला तीन आठवड्यांची मुदत

### काँग्रेस सचिव जयराम रमेश यांची याचिका

**नवी दिल्ली, १७ एप्रिल**

१९६१ च्या निवडणूक नियमांमध्ये अलिकडेच केलेल्या सुधारणांविरुद्ध काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश आणि इतरांच्या याचिकांना उत्तर देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निवडणूक आयोगाला आणखी तीन आठवड्यांची मुदत दिली. मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या न्यायासनाने १५ जानेवारी रोजी रमेश यांच्या याचिकेवर केंद्र आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावली होती आणि उत्तर मागितले होते. निवडणूक आयोगाकडून उपस्थित असलेले वरिष्ठ वकील मनिंदर सिंग यांनी उत्तर दाखल करण्यासाठी आणखी तीन आठवड्यांची मागणी केली. न्यायालयाने सिंग यांच्या प्रार्थनेला मान्यता दिली आणि २१ जुलैची सुनावणीसाठी तारीख निश्चित केली. रमेश यांच्याव्यतिरिक्त, श्याम लाल पाल आणि कार्यकर्त्या अंजली भारद्वाज यांनी दाखल केलेल्या अशाच दोन जनहित याचिका प्रलंबित आहेत. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक सिंघवी यांनी रमेश यांचे प्रतिनिधित्व केले. १९६१ च्या निवडणूक नियमांध्ये सुधारणा अत्यंत हुशारीने करण्यात आल्याचे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे आणि मतदाराची ओळख उघड होईल ,असा दावा करत सीसीटीव्ही फुटेज पाहण्यास मनाई करण्यात आली आहे. सिंघवी यांनी पूर्वी म्हटले होते की मतदानाचे पर्याय कधीही उघड केले जात नाहीत आणि सीसीटीव्ही फुटेज मते उघड करू शकत नाहीत आणि पुढील सुनावणीच्या तारखेपूर्वी निवडणूक आयोग आणि केंद्राला त्यांचे उत्तर दाखल करण्यास सांगावे अशी विनंती न्यायालयाला केली. रमेश यांची याचिका डिसेंबरमध्ये दाखल करण्यात आली होती आणि सर्वोच्च न्यायालय निवडणूक प्रक्रियेची क्षीण होत चाललेली अखंडता पुनर्संचयित करण्यास मदत करेल, अशी आशा व्यक्त केली होती. सरकारने सीसीटीव्ही कॅमेरा आणि वेबकास्टिंग फुटेज सारख्या काही इलेक्ट्रॉनिक कागदपत्रांची सार्वजनिक तपासणी रोखण्यासाठी तसेच उमेदवारांच्या व्हिडी ओ रेकॉर्डिंगचा गैरवापर रोखण्यासाठी निवडणूक नियमात बदल केले आहेत.



# महाराष्ट्रातील दुर्मिळ 'स्टेगोडॉन हत्ती'चे जीवाश्म चंद्रपुरात!

**» आज जागतिक वारसा दिन**

**◆ चंद्रपूर, १७ एप्रिल**

चंद्रपूर तालुक्यात वर्धा-पैनगंगा नदीपात्रात २५,००० ते १२,००० वर्षांदरम्यान विदर्भात विचलन करणारे आणि आज लुप्त झालेले दुर्मिळ 'स्टेगोडॉन हत्ती'चे जीवाश्म आढळले आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारची 'प्लीस्टोसीन' काळातील हत्तीची ही दुर्मिळ जीवाश्म आहेत.

डायनासोरनंतर विशालकाय प्राण्यांची जीवाश्मे पहिल्यांदाच विदर्भात सापडली आहेत. या जीवाश्मासोबतच पाषाणयुगीन अवजारेसुद्धा मिळाली असून, दुर्मिळ हत्तींचे जीवाश्मे आणि पाषाणयुगीन अवजारे एकाच ठिकाणी सापडणे हेही अतिशय महत्त्वाचे मानले जाते.

दातावरून ही लुप्त झालेल्या स्टेगोडॉन हत्तीची जिवाश्मे आहेत, असे मत अनेक परदेशी संशोधक तसेच वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिओलोजीचे निवृत्त प्राध्यापक आणि संशोधक अविनाश नंदा यांनी व्यक्त केले आहे. ते आजच्या आशियायी हत्तींचे पूर्वज होते. याच ठिकाणी 'एलेफास नामाडीकस' या लुप्त झालेल्या हत्तीसदृश्य डोकेसुद्धा आढळल्याने या हत्ती जीवाश्मांचे सविस्तर विश्लेषण करण्याची गरज संशोधक प्रा. सुरेश चोपणे यांनी अधोरेखित केली आहे. ◂(तभा वृत्तसेवा)





**अशी आहेत जीवाश्मे**

सापडलेल्या जीवाश्म अवशेषात हत्तीच्या मांडीची हाडे, चर्वण करणारी दात आणि डोक्याची कवटी, छातीची हाडे अशा अवयवांचा समावेश आहे. अजून हत्तीची दोन लांब सुळे दात सापडले नसले तरी, एक तुकडा मात्र मिळाला आहे. गेल्या दोन-तीन दशकांपासून ही जीवाश्मे नदीच्या पुरामुळे वाहून गेली असल्याने महत्त्वाचे पुरावे नष्ट झाले आहेत. परंतु, अजूनही काही ठिकाणी सजीवांची जीवाश्मे जमिनीत दडलेली आहेत. सविस्तर उत्खननात ती बाहेर येवू शकतात.

**पाषाणयुगीन मानवाची अवजारे**

हत्तींच्या जीवाश्मासोबत पाषाणयुगीन मानवाने बनवलेली दगडी अवजारेही सापडली आहेत. एकाच ठिकाणी ही अवजारे सापडल्यामुळे मानव हत्तींची शिकार करीत होते, हे सिद्ध होते. तर, मानवाच्या अती शिकारीमुळे हत्ती विलुप्त झाले असावे. या अवजारात हात कुऱ्हाडी आणि इतर प्रकारची अवजारे प्रा. सुरेश चोपणे यांना आढळली असून, ती त्यांनी संग्रहालयात ठेवली आहेत.



## महत्त्वाचे...



### भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळा; संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

भगवान परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठान या संस्थेतर्फे भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यामित्त २९ एप्रिल रोजी भगवान परशुराम जयंती मिरवणूक त्यानंतर भगवान परशुरामांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना आणि पूजा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. हा सोहळा उत्तमामरीतीने पार पाडावा तसेच विविध कार्यक्रमाच्या समन्वयासाठी संपर्क कार्यालयाचे उद्घाटन गुरुवारी सायंकाळी डफरीन चौकातील ब्राह्मण समाजसेवा संघाच्या कार्यालयात करण्यात आले. हा उद्घाटनाचा कार्यक्रम पंचांगकर्ते मोहनराव दाते, परशुराम जन्मोत्सव प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन कुलकर्णी, जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बी.जी. कुलकर्णी, कार्याध्यक्ष बजरंग कुलकर्णी, परशुराम जन्मोत्सव सोहळा स्वागत समितीचे अध्यक्ष प्रमोद तमन्नवार, मीनाताई चाटी, डॉ. माधुरी दबडे आदींच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलनाने करण्यात आले. हे कार्यालय २९ एप्रिल पर्यंत दररोज सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत चालू राहणार आहे. रामभाऊ तळवळकर यांनी प्रास्ताविक केले. मोहनराव दाते यांनी परशुरामासंबंधी आणि त्याच्या जन्मासंबधीची माहिती दिली. नितीन कुलकर्णी आणि रमण कुलकर्णी यांनी पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. यावेळी डॉ. माधुरी दबडे, रोहिणी तडवळकर आदींनी कार्यक्रमा नियोजना संदर्भात सूचना केल्या.



### तुळजापूर येथील आरोग्य शिबीरात २१० रुग्णांची तपासणी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

तुळजापूर येथील आरोग्य शिबीरात २१० रुग्णांची तपासणी करण्यात आली. उप-जिल्हा रुग्णालय तुळजापूर येथे डॉ. सुवर्णा मलगोंडा यांचे मलगोंडा हॉस्पिटल, अक्कलकोट व अपेक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सोलापूर व उप-जिल्हा रुग्णालय तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत मोफत महा-आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात तुळजापूर येथील २१० नागरिकांचे ईसीजी, ब्लड शुगर, वजन व बीपी, या सर्व तपासण्या करण्यात आल्या व मोफत औषधेही देण्यात आली. डॉ. प्रथमेश मलगोंडा यांनी सुमारे ३० रुग्णांचे तपासणी केली. या मोफत आरोग्य शिबिरासाठी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दीपक चोरमुले, डॉ. घाटे, डॉ. अखिलकुमार राठोड व योजनेचे आरोग्यमित्र विकास माळवदकर आणि रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### मिरवणुकीत हॉटेल्स, दुकाने चालू ठेवा; भीमदल संघटनेच्यावतीने निवेदन

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव मिरवणूकीवेळेस शहरातील सर्व हॉटेल्स, दुकाने चालू ठेवण्याबाबत भीमदल संघटनेच्या वतीने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांना भिमदल संघटनेचे संस्थापक शशिकांत कांबळे यांनी निवेदन दिले. दरवर्षीप्रमाणे सोलापूरमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त २० एप्रिल रोजी मिरवणूक निघणार आहे. दरवर्षी मिरवणूक दरम्यान सोलापूर शहरातील बरेचसे हॉटेल बंद असतात, त्यामुळे आंबेडकर अनुयायीचे खूप हाल होतात. तरी प्रशासनाने हॉटेल धारकांना हॉटेल चालू ठेवण्याबाबत आवाहन करावे असे निवेदनात नमूद आहे. यावेळी सचिन अक्कलकोटे उपस्थित होते.

# नागपूरनंतर सोलापूरमध्येही बोगस मान्यतेचा धक्कादायक प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १७ एप्रिल-**

राज्यातील नागपूर येथील शिक्षक भरती आणि शालार्थ आयडी घोटाळा सध्या सर्वत्र चर्चेचा विषय असतानाच, सोलापूर जिल्ह्यात देखील याच धर्तीवर मोठ्या घोटाळ्याचे धागेदोरे उघडकीस येत आहेत. शिक्षक भारती सोलापूर या शासनमान्य संघटनेने वारंवार निवेदनाद्वारे हे प्रकरण उपस्थित करूनही, माध्यमिक शिक्षण विभाग आणि पुणे येथील उपसंचालक कार्यालयाने आजतागायत कोणतीही ठोस कारवाई केली नाही, असा आरोप संघटनेने केलेला आहे.

शिक्षक भारतीच्या माहितीनुसार, खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये बनावट व बोगस मान्यतांवर शिक्षकांची भरती करून त्यांना शालार्थ आयडी मिळवून देण्यात आले आहेत. यासाठी पूर्वीच्या काही शिक्षणा धिकाऱ्यांनी शासन निर्णय डावलून बोगस मान्यता दिल्याचे पुरावे संघटनेने वेळोवेळी सादर केले आहेत. सोलापूर माध्यमिक



शिक्षणाधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेल्या तसेच बदली होऊन गेलेल्या काही अधिकाऱ्यांनी त्यांच्या सेवाकाळानंतर अनेक बोगस मान्यता मोठ्या रकमा घेऊन दिलेल्या आहेत. अशा मान्यतांची नोंद व ती माध्यमिक शिक्षण विभागात नसताना देखील त्यांच्या शालार्थच्या प्रस्तावावर माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी शिफारस करून पुणे उपसंचालक कार्यालयाकडे पाठवले आहेत. यामुळे बोगस मान्यता व शालार्थ बाबतीत सोलापूर मध्ये मोठे रॅकेट सक्रिय असल्याचा शिक्षक भारतीने दावा केला आहे.

विशेष म्हणजे, काही लाभार्थ्यांनी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळवताना चुकीची माहिती दिली

> शिक्षण व्यवस्थेतील प्रामाणिक शिक्षकांवर अन्याय होऊ नये, आणि गुणवत्ताधारक उमेदवारांना संधी मिळावी यासाठी शिक्षक भारतीचा संघर्ष सुरूच राहील. बोगस मान्यतांचे समर्थन कोणीही करू शकत नाही. या मान्यता देताना मोठा आर्थिक व्यवहार झालेला आहे. यासाठी संघटनेच्या निवेदनानुसार चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई व्हावी.
>
> **- सुजितकुमार काटमोरे,**
> जिल्हाध्यक्ष, शिक्षक भारती सोलापूर

असून, त्यांच्या कुटुंबातील सदस्य आधीपासूनच शासकीय सेवेत असल्याचेही निदर्शनास आले आहे. खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये नोकरी मिळवताना काहीजण शिक्षक पात्रता परीक्षा घोटाळ्यातील काळ्या यादीतील उमेदवार असताना मान्यता मिळवलेल्या आहेत.

शिक्षक भारतीच्या निवेदनाची दखल घेऊन शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून बोगस मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यां विरोधात चौकशीचे आदेश दिले गेले आहेत. परंतू शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्या कार्यालयाने या आदेशाची अंमलबजावणी केली नाही. बोगस मान्यता देणाऱ्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना नेमकं वाचवतंय कोण ? याचा शोध घेणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर, शिक्षक भारतीच्या निवेदनांना दुर्लक्ष करून, ही माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहचू न देण्याचा प्रयत्न माध्यमिक शिक्षण विभागात सुरू असल्याचे शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी सांगितले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर, नागपूर येथील गाजत असलेल्या शिक्षक भरती व शालार्थ आयडी घोटाळ्याची पुनरावृत्ती सोलापूरमध्येही झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याची तातडीने सखोल चौकशी करण्याची मागणी शिक्षक भारतीने निवेदनाद्वारे थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. नागपूर प्रमाणे सखोल चौकशी होऊन बोगस मान्यता देणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या हातात बेड्या पडणार का? याकडे सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

## डिव्हायडर रंगवणाऱ्या व्यक्तीला वाचवण्यात तीन वाहनाचा अपघात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

डिव्हायडर रंगवणाऱ्या व्यक्तीला वाचवण्यात तीन वाहनचा विचित्र अपघात झाला. पुणे महामार्ग क्रमांक ६५ वरती केगाव दरम्यान रस्त्याच्या बाजूचे डिव्हायडर रंगवण्याचे (पांढरे पट्टे) मारण्याचे काम सुरू आहे. यामधील कामगारांनी सुरक्षितेकरिता सुरक्षा गार्ड न लावल्यामुळे आणि रंगकाम करणारा व्यक्ती रस्त्याच्या थोडसं बाजूला आल्यामुळे त्याला वाचवण्याकरिता टिपर क्र एम एच १३ डी क्यू ०५०५) चालकाने अचानक ब्रेक मारला.

एका कामगाराला वाचवण्याच्या प्रयत्नामध्ये या टिपरला पाठीमागे असलेला मालट्रक क्रमांक (एम. एच. १४

केगाव येथील घटना



जि.यु ७७६२) येऊन धडकला. तर त्या मालकट्रूला एक प्रवासी कार क्रमांक (आर जे ११ जीबी ७५८१ )येऊन धडकल्याने तीन वाहनांचा विचित्र अपघात महामार्गावरील केगाव येथे झाला आहे. महामार्गावरील या अपघातामुळे थोडा वेळ ट्राफिक जाम झाले होते. शहरातील फौजदार तावडी पोलीस स्टेशन च्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन सदर वाहनांचा पंचनामा करत वाहतुकीला मार्ग मोकळा करून दिला.

## इनरव्हील क्लबकडून विविध संस्थांना मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

इनरव्हील क्लब परिमंडळ ६ अंतर्गत १३ क्लबतर्फे मोहोळ तालुक्यातील मोरवंची येथील प्रार्थना फाउंडेशन संचलित वृध्दाश्रम आणि अनाथाश्रमाला आटाचक्की व मसाला ग्रायंडर उपलब्ध करून देण्यात आले. तसेच अन्य संस्थांनाही मदतीचा हात देण्यात आला.

इनरव्हील क्लबच्या जिल्हा ३१३ च्या जिल्हाध्यक्षा डॉ. शोभना पालेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात हे साहित्य प्रार्थना फाउंडेशनचे प्रमुख प्रसाद मोहिते आणि अनु मोहिते यांना सुपूर्द करण्यात आले. याशिवाय इनरव्हील क्लब सोलापूरतर्फे लष्कर भागातील वसंतराव नाईक प्रशालेतील विद्यार्थी तंत्रस्नेही होण्यासाठी ई-लर्निंग डिजिटल



संच भेट देण्यात आले. तसेच ७ गरजू महिलांना स्वावलंबी होण्यासाठी शिलाई यंत्रांचे वाटप करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमास डॉ. मेतन फाऊंडेशनचे सहकार्य लाभले.

तसेच इनरव्हील क्लब सोलापूर व इनरव्हील क्लब उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा येथील श्री तुळजाभवानी अनाथ, अपंग व मतिमंद मुलांच्या अनाथाश्रमालाही आटा चक्की भेट देण्यात आली. डॉ. शोभना पालेकर यांनी अध्यक्षीय भाषणात इनरव्हील क्लब परिमंडळ ६ अंतर्गत विविध १३ शाखांनी एकत्र येऊन सामाजिक उपक्रम राबविले. यातून सकारात्मक संदेश दिल्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. क्लबच्या परिमंडळ समन्वयक तथा माजी जिल्हाध्यक्षा रेखा माने यांचे मार्गदर्शन व पाठपुराव्यामुळे हे सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. क्लबच्या माजी जिल्हाध्यक्षा पद्मजा अय्यंगार, विद्यमान अध्यक्षा श्रद्धा काबरा व सचिवा दीप्ती देसाई यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.



## मंत्री नितेश राणे यांच्या विरोधात सोलापुरात आंदोलन

### राणेंना दाखविले कोंबड्याचे फोटो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

राज्याचे मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे हे गुरूवार, दि.१७ एप्रिल २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यांचे आगमन सोलापूर विमानतळावर झाले आणि ते शहरात वाहनांद्वारे बाहेर पडताच उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी त्यांना कोंबड्याचे फोटो दाखवून घोषणाबाजी केली.

मंत्री राणे दि. १७ एप्रिल २०२५ रोजी चिपी विमानतळ, सिंधुदुर्ग येथून विमानाने सायंकाळी सोलापूरला आले होते. यावेळी त्यांच्या गाड्या सोलापूर विमानतळावरून रस्त्यावर येताच रस्त्याच्या बाजूला उभे राहून ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना कोंबडीचे फोटो दाखवित कोंबडीचोर, कोंबडीचोर अशी घोषणाबाजी केली. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख संतोष घोडके यांनी जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केल्याची माहिती स्थानिक आंदोलकांनी दिली.

दरम्यान, मंत्री राणे हे सोलापूर विमानतळ येथून मोटारीने एमआयडीसी रोड, पेट्रोलपंप सोलापूर येथे मल्लिकार्जून पाटील यांच्या निवासस्थानी गेले. त्यांनी मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर येथे ५१ फुटी हनुमान मुर्तीच्या महाआरतीस उपस्थिती लावली आणि श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे स्वामी समर्थ यांचे दर्शन, सायंकाळी ६ वाजता हिंदु विराट सभा आदी कार्यक्रमांसाठी नियोजित दौऱ्याप्रमाणे मार्गस्थ झाले.



## छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वक्तृत्व स्पर्धेत ४५ विद्यार्थी सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ४५ विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

तरुण पिढी संस्कारक्षम आणि धैर्यशील व्हावी यासाठी छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याचा आणि पराक्रमाचा इतिहास त्यांना अवगत व्हावा या उद्देशाने स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे कामकाज सुरू असल्याचे मत या केंद्राचे अध्यक्ष तथा विद्यापीठाच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी व्यक्त केले. समाज कोणत्या दिशेने चालला आहे याचा मागोवा घेऊन भावी पिढीने आपली वाटचाल करायला हवी अशी अपेक्षा आपल्या मनोगतातून माजी आमदार विनायकरावजी पाटील यांनी व्यक्त केली. मान्यवरांच्या शुभहस्ते वक्तृत्व स्पर्धेचे उदघाट्न करण्यात आले. यावेळी मंचावर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा. सचिन गायकवाड, समन्वयक प्रा. डॉ. विकास पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, अध्यासन केंद्राचे सदस्य डॉ. नेताजी कोकाटे, डॉ. विष्णू वाघमारे, डॉ. विकास शिंदे, डॉ. अरुण सोनकांबळे यांची उपस्थिती होती.

वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय टेंभूर्णी येथील डॉ. संजय साठे आणि शिवाजी महाविद्यालय बार्शी येथील डॉ. रविकांत शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. विकास शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन सहायक कुलसचिव तथा अध्यासन केंद्राचे सचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

### डॉ. आंबेडकर जयंती अध्यक्षपदी बंगाळे

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**



स्टुडंट्स युथ असोसिएशनच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी शेखर बंगाळे यांची निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष गौरव पवार, कार्याध्यक्ष मनोजकुमार तम्मेवार, सचिव संदीप कांबळे, राहुल सावंत, सहसचिव चंद्रशेखर पाटील, प्रसिद्धीप्रमुख प्रविण चाफाकारंडे, खजिनदार मळगे, सहखजिनदार लक्ष्मीकांत शिवणगी यांची निवड करण्यात आली.

### आयुक्तांनी केली बस डेपोंची पाहणी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज सात रस्ता येथील मनपा परिवाहनच्या बस डेपो, राजेंद्र चौक येथील बस डेपो,बुधवार पेठे जागेची पाहणी केली. यावेळी उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी परिवाहन विभागाची संपूर्ण माहिती आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांना दिली.यावेळी सहायक आयुक्त गिरीष पंडित, पडगानूर, गुंड आदी उपस्थित होते.

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे अनुदान द्या

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

प्रधानमंत्री आवास योजना टप्पा क्रमांक दोन मधील ६३ हजार लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले आहे. आवास योजनेसाठी एक लाख २० हजार रूपये अनुदान असुन त्या सर्व लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे १५ हजारांचे अनुदान देण्यात आले होते. यापैकी ५ हजार ५०० लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे ७० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे.

मात्र उर्वरित ५७ हजार ५०० लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे अनुदान लाभ देण्यात आले नव्हते. त्यामुळे ग्रामीण भागातील घरकुलचे बांधकाम रखडले होते. ऊन्हाळ्यात पाणीटंचाई व बांधकाम साहित्य मध्ये झालेली वाढ यामुळे अनेक लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम थांबविले होते. त्यामुळे लाभार्थ्यांमधून दुसऱ्या टप्प्यातील अनुदान देण्याची मागणी होत होती.

> **बांधकाम जलद गतीने पूर्ण**
>
> दुसऱ्या टप्प्यातील ६३ हजार लाभार्थ्यांपैकी ५५०० लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे ७० हजार रुपये अनुदान वाटप करण्यात आले होते. उर्वरित ५७ हजार ५०० लाभार्थ्यांना दुसऱ्या टप्प्याचे ७० हजार रुपये अनुदान जमा करण्याचे देण्यात आले आहेत .यामुळे घरकुल बांधकाम जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.
>
> **- संदिप कोहीनकर,**
> **प्रभारी, मुख्य कार्यकारी अधिकारी**

या मागणीची दखल घेऊन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाला उर्वरित सर्व लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे ७० हजार रूपये अनुदानाचे वाटप करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे बांधकाम पूर्ण करण्यास मदत होणार आहे. अनुदान देताना संपूर्ण बांधकाम पूर्ण झाल्यानंतरच रक्कम देण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.



## लोकमंगल महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समता दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अनंत शेरखाने (विद्या प्रतिष्ठान कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय) हे लाभले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे, प्रा. स्वप्नील कदम, प्रा. निशा काटे, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन अमृता माळी यांनी व आभार प्रदर्शन रोहन पवार यांनी केले.

## मिळकत कर भरण्यासाठी ऑनलाईनसह सर्व पेमेंट गेटवेची सुविधा उपलब्ध

### उपायुक्त आशिष लोकरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

महापालिकेच्या मिळकत कराची छापील देयकांची छपाई करण्यास काही कालावधी लागणार असल्याने महानगरपालिका मिळकत कर भरण्यासाठी संकेतस्थळावर तसेच मिळकत कर भरण्याकरीता क्यू आर कोड सुविधा तसेच फोन पे, गुगल पे अशा सर्व पेमेंट गेटवेची सुविधा कार्यान्वित करण्यात आलेली आहे, अशी माहिती सोलापूर महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके दि.८ एप्रिल २०२५ रोजी ऑनलाइन पध्दतीने महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून, एसएमएस व्दारे देयकांची लिंक पुढील आठवडयामध्ये पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर छापील देयकांचेही वाटप करण्यात येणार आहेत. छापील देयकांची छपाई करण्यास काही कालावधी लागणार असल्याने महानगरपालिका मिळकत कर भरण्यासाठी www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर व ऑनलाइन पध्दतीने कर भरण्याकरीता https://smccity.solapurcorporation.org/counter receipt online.aspx ही लिंक ओपन करुन मिळकत कर भरता येईल. मिळकत कर भरण्याकरीता क्यू आर कोड सुविधा तसेच फोन पे, गुगल पे अशा सर्व पेमेंट गेटवेची सुविधा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

शहरातील मिळकतदारांनी मिळकत कराची देयक प्राप्त होण्याची वाट न पहाता लिंकव्दारे देयकातील थकबाकीसह संपूर्ण कराचे बिल ऑनलाईन पध्दतीने भरुन मनपा करावर देण्यात येत असलेल्या ६ टक्के सुटीचा लाभ घ्यावा. ऑनलाईन कर भरण्यास काही अडचण आल्यास मालमत्ता कर कार्यालयास संपर्क साधून रोखीनेही कर भरु शकता. दिनांक २५ सप्टेंबर २०२४ पूर्वी मागील संपूर्ण थकबाकीसह चालू आर्थिक वर्षातील महानगरपालिका कराची रक्कम एकरकमी भरून मिळकत कर ऑनलाईन भरल्यास ६ टक्के व रोखीने भरल्यास ५ टक्के सुटीचा लाभ घ्यावा. महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन सोलापूर महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




# आपले सरकार पोर्टलवर दिरंगाईसाठी विभाग प्रमुखांना रोज एक हजाराचा दंड लावा

## मुख्यमंत्र्यांच्यांचे मुख्य सचिवांना निर्देश

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १७ एप्रिल:**

राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत १०२७ सेवा अधिसूचित केल्या असून त्यापैकी ५२७ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिसूचित सेवा पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखाला दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिवांना केल्या.

फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात विविध सामाजिक क्षेत्रांची वॉररुम बैठक पार पडली. यावेळी आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कार्यान्वयन, अग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा घेण्यात आला.

ते म्हणाले, '१आपले सरकार पोर्टलवर विविध विभागांच्या १३८ इंटिग्रेटेड सेवा ३१ मेपर्यंत उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन कराव्यात. याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन सेवा उपलब्ध करण्यास दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांवर दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याची कारवाई करण्यात यावी. यासंदर्भात मुख्य सचिवांनी परिपत्रक काढावे, असे निर्देशही त्यांनी दिले. सेवा हक्क अधिनियमासंदर्भात पुढील प्रक्रिया राबविताना कोणकोणत्या नवीन सेवा अधिसूचित करता येतील, याबाबत १५ सप्टेंबरपर्यंत माहिती द्यावी.

सेवा ऑनलाईन करण्याच्या प्रक्रियेचे प्रमाणीकरण करण्याची कार्यवाही 'महाआयटी'ने करावी. एका अर्जाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ घेता यावा यादृष्टीनेही प्रक्रियेत बदल करावा. ऑक्टोबरपर्यंत जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आपला महाराष्ट्र देशात अव्वल व्हावा यादृष्टीने प्रयत्न करावा, असे सांगून ते म्हणाले,' आदिवासी, शेतकरी, विद्यार्थी यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान करतानाच त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा-लाभांच्या स्थितीची रिअल टाईम माहिती उपलब्ध होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ट्रॅकिंग प्रणाली आणखी मजबूत करण्यावर भर द्या, असे निर्देश दिले. ते म्हणाले,' प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत येणारी सर्व उद्दिष्ट्ये वर्ष २०२६ अखेर पूर्ण करावीत. आदिवासी भागातील मोबाईल मेडिकल युनिटचे जिओटॅगिंग करावे, घरोघरी नळ योजनेसाठी ग्रामसभेचा ठराव घ्यावा. पूर्ण झालेली बहुद्देशीय केंद्रे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करा. आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधून देण्याच्या कामाला गती द्या. जमीन अधिग्रहणासाठी आदिवासी विकास विभागाने विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून देऊन उर्वरित रस्ते पूर्ण करून घ्यावेत. नाशिक, नंदुरबार, पालघर, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बांधवांचे दावे लवकरात लवकर निकाली काढून त्यांच्या नावावर ७/१२ करून देण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### मेडिकल कॉलेजच्या भविष्यातील विस्तारासाठी २० एकर जागा राखीव ठेवा

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या कार्यान्वयनाचा आढावा घेतला. या महाविद्यालयांच्या उभारणीला गती देण्यासाठी त्यातील अडचणी तातडीने सोडविण्याच्या संबंधितांना सूचना केल्या. अंबरनाथ, वर्धा, पालघर येथील महाविद्यालयांसाठी जागा निश्चित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. भविष्याचा विचार करूनच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी केली पाहिजे. महाविद्यालयांना जागा उपलब्ध करून देताना भविष्यात विस्तारासाठी किमान २० एकर जागा राखीव ठेवावी. नवीन महाविद्यालयांसाठी १४८९ पदांची मागणी करण्यात आली असून त्यापैकी ३०० पेक्षा जास्त पदे अजूनही भरली गेली नाहीत. त्यामुळे एमपीएससीमधून तांत्रिक पदे वगळण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीसमोर आणावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### ॲग्रीस्टॅक'च्या अद्ययावतीकरण आणि वापराबाबत यंत्रणा उभारा

'ॲग्रीस्टॅक'च्या नोंदणीत देशात तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या महाराष्ट्राला 'शेतकरी ओळखपत्र नोंदणी'त पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी नोंदणीची प्रक्रिया गतिमान पद्धतीने राबवावी. शेतकऱ्यांची नोंदणी, हंगामी पिकांची माहिती, ई-पिक पाहणी, गाव नकाशांची माहिती उपलब्ध करताना अचुकता व गुणवत्तेवर भर द्यावा. ॲग्रीस्टॅकच्या अद्ययावतीकरण आणि वापराबाबत यंत्रणा उभारावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. 'ॲग्रीस्टॅक' उपक्रमांतर्गत १ कोटी १९ लाख शेतकरी ओळखपत्र नोंदणीचे उद्दिष्ट असून आतापर्यंत ९२ लाख ३५ हजार शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. कृषी गणना २०२१-२२ नुसार १ कोटी ७१ लाख १० हजार ६९७ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येत असून त्यापैकी ७८ लाख ७५ हजार ४७७ शेतकऱ्यांची नोंदणीही ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावा, असे सांगितले.

# १०० दिवसांच्या केलेल्या कामाची 'पीपीटी' विभागीय आयुक्तांकडे सादर

## उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेप्रमाणे राज्याच्या सर्वांगिण प्रगतीसाठी १०० दिवसांचा आराखडा तयार करण्यात आला होता. या आराखड्यात लोक केंद्रीत योजना, तंत्रज्ञानाच्या उपयोगाने सहजतेने नागरिकांना लाभ मिळणाऱ्या योजनांचे ध्येय धोरण ठरविले होते. या आराखड्यातून सोलापूर येथील प्रत्येक विभागांनी ठोस कामगिरी बजावली असून, याबाबतची पीपीटी (कामाचा आराखडा) विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे आज (दि. १७) पाठविण्यात आली असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली.



मध्यंतरी विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी १०० दिवसांत सोलापूरकर जिल्हा प्रशासनाने केलेल्या कामाचा आढावा घेतला होता. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा प्रशासन विभागाने या सुचनांची योग्य पध्दतीने अंमलबजावणी केल्याने पुलकुंडवार यांची शाब्बासकीही मिळविली होती. दरम्यान, हा सात सुत्री कार्यक्रम जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबध्द राबविण्यात आला. सध्या या कामाची पीपीटी विभागीय स्तरावर पाठविली असून, आपल्या कामाचा स्तर विभागात उंच वाटला तर पुढील आठवड्यात उच्चस्तरीय संस्थेच्या समितीकडून या कामकाजाची पाहणी झाल्यानंतर जिल्ह्याचा राज्यातील गुणक्रम कळणार असल्याचेही नाटेकर यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत जिल्हाभरातील कर्मचारी-अधिकाऱ्यांनी काम जोरात केले आहे. या कार्यक्रमातून सर्वसामान्यांचा शासकीय कार्यालयाकडे पाहण्याचा पूर्वीचा नकारात्मक दृष्टिकोन बदलून सकारात्मक दृष्टिकोन केला आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर सोलापूर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक आला पाहिजे, असे आवाहन विभागीय आयुक्त पुलकुंडवार नुकतेच केले होते. त्या ध्येयाने सर्व विभागप्रमुखांनी काम केले आहे. या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाचा पोट खराबा जमीन तसेच बिगर शेती असलेल्या जमिनीसाठी सनद वाटप कार्यक्रम हा अत्यंत चांगला झाला असून, राज्यातील इतर जिल्ह्यापेक्षा वेगळा व लोकांसाठी खूप महत्त्वपूर्ण केला आहे. अभिलेखासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करून त्या अनुषंगाने अभिलेखाचे निंदनीकरण व सुसूत्रीकरण केले आहे. इतकेच नाहीतर मुदतबाह्य अभिलेखे नष्ट केले आहेत. यामुळे कामात अत्यंत सुसुत्रता आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न आमच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केला आहे. आता विभागीय स्तरावरील निकालानंतरच पुढील दिशा ठरणार आहे.

# मेव्हणीकडे शरीर सुखाची मागणी; भाऊजीविरूध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

९ वर्षापूर्वी दुधात झोपेच्या गोळ्या घालून मेव्हणीवर अत्याचार केल्याचा व्हिडीओ दाखवून ब्लॅकमेल करून शरीर सुखाची मागणी करणा-या भावजीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

सुनील चौगले (रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. यातील आरोपी याने सन २०१६ मध्ये त्याच्या मेव्हणीला दुध प्यायला दिले होते. त्यात त्याने झोपेच्या गोळ्या घातल्या होत्या. यानंतर आरोपीने मेव्हणीवर अत्याचार करून त्याचा व्हिडीओ तयार केला. यानंतर तो व्हिडीओ तिच्या पतीला दाखवितो म्हणून अनेकवेळा अत्याचार केला. दरम्यान १४ एप्रिल रोजी रात्री आरोपीने ब्लॅकमेल करून पुन्हा फिर्यादीकडे शरीरसुखाची मागणी केली. त्यावर मेव्हणीने नकार देताच तिला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने खाली पाडून गळा दाबला. या गुन्ह्याचा तपास पोलीस करत आहेत.

# दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना व्ही.शांताराम पुरस्कार जाहीर

## अनुपम खेर, काजोल यांना स्व.राज कपूर जीवन गौरव जाहीर; राज्य सरकारच्या पुरस्काराची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि.१७ एप्रिल-**



राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या व्ही.शांताराम जीवन गौरव, चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान, स्व.राज कपूर जीवन गौरव, स्व.राज कपूर विशेष योगदान तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर या पुरस्कार गुरुवारी जाहीर करण्यात आले.

यंदाच्या वर्षी हे पुरस्कार महेश मांजरेकर, मुक्ता बर्वे अनुपम खेर काजोल देवगन हे कलाकार व जेष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना गौरविण्यात येणार आहे.

२५ एप्रिलला सायंकाळी वरळी येथील एनएससीआय डोम येथे हा सोहळा होणार आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी आज केली. पत्रकार परिषद घेऊन पुरस्कारांची घोषणा केली. या वर्षीचा चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेता, दिग्दर्शक व निर्माते महेश मांजरेकर जाहीर झाला आहे. १० लाख रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे त्याचे स्वरूप आहे. व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना प्रदान केला जात असून ६ लाख, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे स्वरूप आहे. हिंदी चित्रपट सृष्टीतील मानाच्या स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना मिळत असून स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल देवगण यांना मिळणार आहे. या दोन्ही पुरस्कारांचे अनुक्रमे १० व ६ लाख रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे स्वरूप आहे. १९९३ पासून देण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावर्षी मराठीतील ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. १० लाख रोख, मानचिन्ह, मानपत्र व शाल यांसह दिला जातो. या सोहळ्याशिवाय, संविधान अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने २० एप्रिलला सायंकाळी ६:३० वाजता गेटवे ऑफ इंडिया येथे एक खास सांगीतिक मानवंदना कार्यक्रम होणार आहे.

यावेळी जेष्ठ सुरेश वाडकर, आदर्श शिंदे, वैशाली सामंत, उर्मिला धनगर, नंदेश उमक आदी कलाकार सहभागी होणार असून, संचालन सुबोध भावे करणार आहेत. कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीतं, नाट्यप्रवेश व नृत्य सादर केले जातील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# उत्तर तहसिल कार्यालयाच्या वतीने भरली फेरफारांची शाळा

**▸ १५२ शेतकरी बांधवांनी घेतला लाभ ▸ अनेक शेतकऱ्यांनी केले उपक्रमाचे स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी कार्यालय व सर्व तलाठी सजामध्ये फेरफारांची शाळा हा नाविन्यपुर्ण उपक्रम दर गुरूवारी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने (दि. १७) रोजीही या शाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक शेतकऱ्यांनी उपस्थिती लावली आणि या उपक्रमाचे कौतुकही केले. दरम्यान, या कार्यक्रमात जवळपास १५२ शेतकऱ्यांनी आपला फेरफारही काढून घेतला.



दरम्यान, एखाद्या गुरूवारी शासकीय सुट्टी असल्यास सदरचा फेरफारांची शाळा उपक्रम लगतच्या कार्यालयीन दिवशी राबविण्यात येणार आहे. मंडलाधिकारी आणि तलाठी बांधवांनी आज ज्या-त्या सज्जावर शेतकऱ्यांना फेरफार दिल्याने त्यांचा तहसील कार्यालयाकडील प्रवास आणि आर्थिक ताणही कमी झाल्याने शेतकरी बांधवांनी या उपक्रमाचे कौतुकच केले. सदरचा उपक्रम हा अतिशय महत्वाकांक्षी उपक्रम असून, या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना वेळेत सुविधा पुरविणे हा याचा मुख्य उद्देश असल्याची माहिती तहसीलदार निलेश पाटील यांनी दिली. तरी सर्व शेतकरी बंधुंनी दर गुरूवारी आपल्या प्रलंबित अनोंदणीकृत, नोंदणीकृत फेरफार नोंदीच्या निर्गतीकरीता संबंधित मंडळ अधिकारी किंवा ग्राम महसूल अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून सदरचे कामकाज पुर्ण करून घ्यावे, असे आवाहन तहसिलदार निलेश पाटील यांनी केले आहे.

# एटीएम कार्ड बदलून देऊन वृध्दाची ४३ हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल -**

एटीएम मशिनमध्ये मशीनमध्ये अडकलेले कार्ड काढून देण्याच्या बहाण्याने वयोवृद्ध व्यक्तीच्या खात्यावरून ४३ हजार रुपये काढून फसवणूक केली आहे. ही घटना १० एप्रिल रोजी सव्वा अकराच्या सुमारास सात रस्ता येथील स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या शाखेच्या एमटीएममध्ये घडली.

याबाबत विश्वनाथ धोडींबा खेत्रे (वय ६४, रा. दोन नं. झोपडपट्टी विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन अज्ञात इसम ांविरुध्द सदर बझार पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. विश्वनाथ खेत्रे हे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. १० एप्रिल रोजी सकाळी सव्वा अकराच्या सुमारास पेंशन काढण्यासाठी सात रस्ता येथील बॅक ऑफ इंडियाच्या शाखेत गेले होते. मात्र बॅक बंद होती. बॅक बंद असल्याने एटीएम मध्ये गेले होते. तेव्हा एटीएम मधून पैसे काढत असताना एटीएममध्ये पेंशन कार्ड आडकले. पैसे निघाले नाहीत. त्यावेळी आरोपी सदर ठिकाणी होते,दोघांपैकी एकाने मशीन कार्ड काढून देतो.असे म्हणाला,त्यावेही विश्वनाथ खेत्रे हे बाजूला सरकले. दुसऱ्याने वयोवृद्ध फिर्यादीस बोलण्यात गुंतवून ठेवले. त्यावेळी लक्ष विचलित करून खात्यावरील ४३ हजार ३०० रुपयांची रक्कम वेळोवेळी काढून घेत फसवणूक केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस अंमलदार चव्हाण हे करीत आहेत.




# अवैध कत्तलखाने केले सील; प्रशासनाची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

शास्त्री नगर दक्षिण सदर बजारमध्ये ३ अनधिकृत कत्तलखान्यात छापा मारून सिल केले आहेत.

आयुक्त सचिन ओंम्बासे यांच्या आदेशावरून सदर बजार पोलिस आयवळे यांच्या ५ पोलिस टीम, मंडई अधीक्षक तोडकर, सहा निरीक्षक कट्टिमनी व इतर सहकारी सोबत उपायुक्त किरणकुमार मोरे, सहा आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी पार पाडली.

महाराष्ट्र शासन प्राणी कल्याण कायदा संनियंत्रण समिती सदस्याकडून आव्हान करण्यात येतड आहे की शहरात कोठेही अनधिकृतरित्या कत्तलखाने व गोमातेची हत्या चालू असेल तर त्याचे फोटो, व्हिडिओ रेकॉर्डिंग करुन लोकेशन महापालिका मंडई अधीक्षक किंवा पोलीस कट्रोल रूमवर कळवावे. त्यांच्यावर त्वरित योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच अन्न व प्रशासन विभागातर्फे मास व मच्छी दुकानासाठीचा परवाना दिला जातो. परंतु जिल्ह्यामध्ये हजारोच्या संख्येत विनापरवाना दुकाने अनेक भागात राजरोस सुरू असून दुकानाच्या मागील बाजूस बकरे व कोंबड्या उघड्यावर गटारी व उकरड्या शेजारीच कापले जातात व तेच मास उघड्यावर विक्री केली जाते. त्यामुळे अश्या अनधिकृत व बेकायदेशीर दुकानावर अन्न व प्रशासन विभागाने पोलिसांची मदत घेऊन कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अन्यथा पुन्हा बर्डफ्लू सारखे संसर्गजन्य रोग प्रसरू शकतील.

मृत प्राणी व पक्षी यांच्या करिता विद्युत दाहिनी तयार असून ती अद्याप कार्यान्वीत का होत नाही. मागील ३ वर्षापासून प्राणी क्लेश प्रतिबंधीत समितीचे गठन पशु उपायुक्त हे करत नाहीत त्यामुळे या सगळ्या गोष्टीवर कोणाचेच नियंत्रण राहत नाही. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार व्हावा, ही पशु-पक्षी व प्राणी प्रेमींची अपेक्षा आहे.

# मेट्रो मार्ग ७ अ मधील भुयारी बोगद्याचे 'ब्रेक थ्रू' यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि. १७ एप्रिल-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व या मेट्रो मार्ग ७ अ मधील १.६५ किलोमीटर लांबीच्या भुयारी बोगद्याचे ' ब्रेक थ्रू ' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. यावेळी मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार पराग अळवणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कळ दाबून 'ब्रेक थ्रू' कामाला सुरुवात केली. यानंतर या कामाची पाहणी केली. हा भुयारी बोगदा मेट्रो ७ अ वर डाऊनलाईन वर आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन ते एअरपोर्ट कॉलनी स्टेशन दरम्यान हा बोगदा असणार आहे. ही मेट्रो जोडणे मुंबई महानगर प्रदेशातील एकूण मेट्रो जाळ्यासाठी महत्त्वाचा टप्पा असणार आहे.

या मेट्रो मार्गामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील मीरा-भाईंदर व पुढे वसई - विरार हा भाग छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत मेट्रोने जोडले जातील. तसेच ठाणे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा मेट्रो ने जोडण्यात येईल. या मेट्रो मार्गाचे ५९ टक्के काम पूर्ण झाले आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये टीबीएम मशीन जमिनीपासून ३० मीटर खाली भूगर्भात उतरवण्यात आली.

मेट्रो मार्ग तीनच्या वरून, सहार उन्नत रस्त्यांच्या पायाखालून, मोठ्या सांडपाणी वाहिन्या व जलवाहिन्यांना क्रॉस करून विविध अडचणींवर मात करून या बोगद्याचा ब्रेक थ्रू पूर्ण करण्यात आला. या मेट्रो मार्गामुळे मुंबईकरांना कुलाबा ते वसई विरार, मीरा भाईंदर पर्यंत आरामदायी प्रवास अनुभवता येणार आहे. या मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील विविध मेट्रोमार्ग थेट विमानतळापर्यंत मेट्रोने जोडले जातील. मेट्रोमार्ग ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) च्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ या भूमिगत स्थानक मार्गासोबत सुलभ संलग्न करणे शक्य होईल. प्रवाशांसाठी सुरक्षित आरामदायी व सुलभ प्रवास शक्य होणार आहे. दाटीवाटीच्या नागरी परिसरातून मेट्रोसाठी उन्नत व भूमिगत मार्गाची रचना केल्यामुळे विमानतळ परिसरात मेट्रो बांधकामासाठी कमी जागा व्यापली जाणार आहे.



**मेट्रो मार्ग ७ अ विषयी.. :** या मेट्रो मार्गाची लांबी ३.४ किलोमीटर असून त्यापैकी उन्नत मार्ग ०.९४ किलोमीटर आणि भूमिगत २.५० किलोमीटर आहे. या मार्गावर दोन स्थानके असणार आहेत. एक स्थानक उन्नत मार्गावर एअरपोर्ट कॉलनी तर दुसरे स्थानक भूमिगत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे असणार आहे. उन्नत मेट्रो मार्ग ०.५७ किलोमीटर असेल दुहेरी बोगद्याची लांबी २.०३५ किलोमीटर आहे. १ सप्टेंबर २०२३ रोजी डाउनलाईन बोगद्याचे पहिले ड्राईव्ह सुरू झाले. या बोगद्याची लांबी १.६५ किलोमीटर असून लाइनिंगसाठी ११८० रिंग्स बसविण्यात आल्या आहेत. बोगद्याचा व्यास ६.३५ मीटर एवढा असून सहा भागात विशेष डिझाईन असलेल्या प्रिकास्ट रिंग वापरण्यात आल्या आहेत.



# पाणी जपून वापरा

## मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१७ एप्रिल-**

बार्शी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या उजनी पाईपलाइनला सोमवारी कंदर गावाजवळ गळती झालेली होती. ही गळती दुरुस्त करुन काल शहरात पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता. मात्र आज दि. १६ एप्रिल रोजी कंदर हेडवर्क्स येथे महावितरणच्या कामासाठी विद्युत पुरवठा खंडित झाल्याने पुन्हा एकदा पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे.

यामुळे आज आणि उद्या बार्शी शहरातील नियमित पाणीपुरवठा होत नाही. नागरिकांच्या मागणीनुसार काही भागांमध्ये सध्या टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.दरम्यान, या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

## अग्रलेख...

# धोक्याची नवी घंटा!

दहशतवाद ही एकट्या भारताची समस्या नाही, तर उभ्या जगाला या समस्येचा धोका भेडसावत असल्याने दहशतवादाच्या विरोधात जागतिक मतैक्य निर्माण झाले पाहिजे, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वारंवार दिला आहे. भारताला सीमेपलीकडच्या आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा सर्वाधिक फटका बसला असल्याने यापुढे दहशतवादी किंवा अतिरेकी कारवायांच्या विरोधात शून्य सहिष्णुता हेच भारताचे धोरण राहील, असेही केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. दहशतवादाने पोखरलेला आणि सर्वाधिक झळा सोसणारा देश म्हणून या समस्येकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी मोदी सरकारने केलेल्या प्रयत्नांची जगाने दखल घेतलीच; पण या प्रयत्नांमुळेच दहशतवादाविरोधात जागतिक मतैक्य तयार करण्यातील भारताच्या नेतृत्वाची प्रशंसाही झाली होती.

गेल्या काही वर्षांत जागतिक आर्थिक स्थिती आणि अनेक देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे दहशतवादासारख्या गंभीर समस्येकडे जगाचे काहीसे दुर्लक्ष झाले. त्यामुळे दहशतवादी कट्टरपंथीयांना कारवायांसाठी रान मोकळे मिळाले. भारताने या कारवायांच्या विरोधात कंबर कसलीच; पण संयुक्त राष्ट्रांच्या मंचावर हा मुद्दा केंद्रस्थानी आणून ती जगाच्या गळी उतरविण्यासाठीही पुढाकार घेतला. ही समस्या संपविण्यासाठी शून्य सहिष्णुता हेच धोरण योग्य ठरेल, ही भारताची भूमिका ठाम राहिली, म्हणूनच दहशतवाद्यांच्या सुरक्षित आश्रयाची भूमी मानल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलून भारताने आपल्या या धोरणाचा पुरावा जगाला दाखविला. जम्मू-काश्मिरातील दहशतवादी कारवायांत सहभागी होणाऱ्यांना क्षमा नाही; त्यांना एक तर जेलची हवा खावी लागेल किंवा थेट जहन्नुमचा रस्ता दाखवावा लागेल, असा स्पष्ट इशारा केंद्र सरकारने संसदेच्या सभागृहातूनच दिला, तेव्हा दहशतवादी कारवायांना खतपाणी घालणाऱ्या सर्वांनाच भारताच्या कठोर धोरणाची धडकी भरविणारी जाणीव झाली होती. त्याआधीच्या काही दिवसांत भारताने केवळ इशारे न देता थेट कारवाई करून जवळपास ३० दहशतवाद्यांना जहन्नुमचा रस्ता दाखविलादेखील होता. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या कटाचा सूत्रधार तहव्वूर राणा यास भारतात आणून केंद्र सरकारने या धोरणाच्या पाठपुराव्याचे बळही जगाला दाखवून दिले. दहशतवादाची पाळेमुळे जेथे जेथे रुजू पाहतील, तेथे तेथे त्यांचा नायनाटच केला पाहिजे, हे धोरण जगाला पटवून देण्याची कृतिशीलता भारताने अवलंबिल्याने दहशतवादग्रस्त भारतातील कारवायांची हिंमत आता कमी झाली आहे. ब्रिटनमध्ये दहशतवादी कट्टरपंथीयांच्या कारवायांमुळे लोकशाहीपुढेच आव्हाने उभी राहिल्याची भीती गेल्या वर्षी तेव्हाचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी व्यक्त केली, तेव्हा ही समस्या ब्रिटनपुरतीच आहे, असे कदाचित अन्य देशांतील अनेकांस वाटूनही गेले असेल. या कट्टरपंथी शक्ती देश तोडणाऱ्या आणि अस्थिरता माजविणाऱ्या कारवायांत मग्न असून, या शक्तींचा सामना करण्यासाठी उभ्या देशाने संघटित झाले पाहिजे, असे आवाहन करताना, इस्लामी कट्टरपंथीयांना कठोर कारवाईचा इशारा देत त्यांनी भविष्यातील चिंतेचे भयही अधोरेखित केले होते. आज ते भय ब्रिटनला भयाणपणे भेडसावू लागले आहे. आधीही अशा अनेक कारवायांचा धुमाकूळ ज्या ब्रिटनने अनुभवला, त्यांना आता कट्टरपंथीयांच्या नव्या संकटाने घेरले आहे. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असलेल्या ब्रिटनच्या तुरुंगांवर कट्टरपंथी इस्लामी दहशतवाद्यांच्या टोळ्यांनी ताबा मिळविल्याच्या बातम्या केवळ त्या देशासमोरील संकटाचे संकेत समजून दुर्लक्षित करण्याजोग्या नाहीत. कारण, तेथील आजची ही स्थिती एका रात्रीत तयार झालेली नाही. अमेरिकेतील ११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्यानंतर जगातील दहशतवादी कारवायांनी अचानक उचल खाल्ली होती. या हल्ल्यानंतर ब्रिटनमध्येही दहशतवादी कट्टरपंथीयांच्या कारवाया वाढल्या आणि अनेक दहशतवाद्यांना ब्रिटनने तुरुंगात घातले. २०२२ पर्यंत या देशातील वेगवेगळ्या तुरुंगांमध्ये दहशतवादी कारवायांशी संबंधित असलेल्या इस्लामी कट्टरपंथीयांची संख्या दीडशेहून अधिक होती. आता हे कैदी संघटित होऊन तुरुंग प्रशासनातील अधिकाऱ्यांवरच हल्ले चढवू लागले आहेत. गेल्या १२ एप्रिलला हाशीम अबीदी नावाच्या कैद्याने एचएमपी फ्रँकलँड तुरुंगात गरम तेल आणि धारदार हत्यारे घेऊन तीन तुरुंग अधिकाऱ्यांवर हल्ला केला. हा अबीदी २०१७ मधील मँचेस्टर एरिना बॉम्बस्फोटातील आरोपी आहे. त्याच्या विरोधात २२ हत्यांच्या आरोपावरून खटला सुरू आहे. त्याने या तुरुंगातील अन्य कैद्यांना धमकावून किंवा दहशत दाखवून आपली टोळी तयार केली आहे. जे कैदी त्याच्या टोळीत सहभागी होणार नाहीत, त्यांना ठार मारण्याची धमकी देऊन दहशत माजविली आहे. या हल्ल्यामुळे ब्रिटनमधील तुरुंगात दहशतवादी कट्टरपंथीयांच्या वाढत्या वर्चस्वाची गंभीर जाणीव आता ब्रिटन प्रशासनास झाली आहे आणि कट्टरपंथीयांना स्वतंत्रपणे डांबण्याच्या ब्रिटिश नीतीचा भस्मासुर आता ब्रिटनच्याच डोक्यावर हात ठेवण्यासाठी सज्ज झाल्याचे दिसत आहे. आता ब्रिटनमधील तुरुंगांच्या प्रशासनावरच इस्लामी कट्टरपंथीयांचा कब्जा प्रस्थापित झाल्याची चिंता तेथे उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे. कट्टरपंथी दहशतवाद्यांकडून तुरुंगांमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या कारवाया होऊ शकतात, त्यामुळे या कैद्यांना एकत्र ठेवू नये, ही बाब तुरुंग प्रशासनाच्या ध्यानात आली नसावी की त्याकडे दुर्लक्ष केले गेले, याचा शोध दहशतवादग्रस्त ब्रिटनला नव्याने घ्यावाच लागेल. तुरुंगांवर पूर्ण ताबा प्रस्थापित झाल्याची या कट्टरपंथीयांची भावना झाली आहे, ही ब्रिटनसाठीच नव्हे, तर दहशतवादाच्या झळा पोहोचूनही या समस्येची गंभीर दखल न घेणाऱ्या सर्वांसाठीच धोक्याची पूर्वसूचना ठरणार आहे. असे काही होऊ शकते याची जाणीव तुरुंग प्रशासनास नव्हती, असेही नाही. अशा कट्टरपंथीयांनी एकत्र ठेवणे धोकादायक ठरू शकते, असा इशारा देणारा अहवाल इयान एचिसन या माजी तुरुंग अधिकाऱ्याने पूर्वीच सादर केला होता. अशा कैद्यांची तीन तुरुंगांमध्ये स्वतंत्र व्यवस्था करावी, असेही त्याने सुचविले होते. या हल्ल्यामुळे ब्रिटनमधील तुरुंग सुरक्षेचा गंभीर मुद्दा समोर आला आहे, असे एचिसन यांनी म्हटल्याचे 'द टेलिग्राफ' या वृत्तपत्राने नमूदही केले आहे. हा हल्ला म्हणजे तुरुंग प्रशासनाच्या अपयशाचा गंभीर परिणाम असल्याचा स्पष्ट आरोप मँचेस्टर हल्ल्यातून बचावलेल्या एका नागरिकाने केला आहे, तर काहीतरी गंभीर त्रुटी राहिल्या, अशी कबुली ब्रिटनच्या पंतप्रधान कार्यालयानेही दिली आहे.

दहशतवाद आणि हिंसाचारापासून मुक्ती मिळाल्याखेरीज संघटित राष्ट्रांच्या क्षमतेचादेखील पूर्ण वापर करता येणार नाही, त्यामुळे दहशतवादाच्या विरोधात जगाने एकवटले पाहिजे, असे पंतप्रधान मोदी यांनी डिसेंबर २०२० मध्ये दक्षिण आशियाई देशांच्या ३६ व्या संकल्प दिनानिमित्त पाठविलेल्या संदेशात म्हटले होते. भारताने दहशतवादाची कडू फळे भोगली आहेत, या समस्येकडे पाहण्याची भारतीयांची दृष्टी अधिक संवेदनशील आहे. ब्रिटनमध्ये तुरुंगात असतानाही इस्लामी कट्टरपंथी आपल्या हिंसक बळाच्या जोरावर एखाद्या यंत्रणेस वेठीस धरतात, तेव्हा अशा शक्तींना वेसण घालण्यासाठी राजनैतिक इच्छाशक्ती, हिंमत आणि निर्धार या बाबींचीच गरज असते, हे अधोरेखित होते. ब्रिटनमधील हल्ल्याने याची जाणीव जगाला करून दिली आहे. भारताची आग्रही भूमिका स्वीकारून संघटितपणे दहशतवादाविरोधात जागतिक स्तरावर शून्य सहनशीलता धोरण स्वीकारणे व दहशतवादास संरक्षण देणाऱ्या, दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या आणि दहशतवादास खतपाणी घालणाऱ्या शक्तींना एकाकी पाडणे ही जगाची गरज ठरली आहे. गेल्या महिन्यात अमेरिकेच्या नॅशनल इंटेलिजन्सच्या डायरेक्टर तुलसी गबार्ड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन दहशतवादाच्या समस्येवर चर्चा केली. ही केवळ भारताची नव्हे, तर जगापुढील समस्या आहे आणि दहशतवाद निपटण्यासाठी भारताकडून होणाऱ्या प्रयत्नांस अमेरिकेचे समर्थन असेल, अशी ग्वाही या भेटीनंतर त्यांनी दिली. जागतिक मतैक्य घडविण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या प्रयत्नांस मिळणाऱ्या सकारात्मक प्रतिसादाचा हा पैलू ब्रिटनमधील या हल्ल्याच्या घटनेनंतर लक्षणीय ठरतो. कट्टरपंथीयांच्या दहशतवादाच्या झळा पोहोचण्याआधी त्याच्या विरोधात संघटितपणे उभे न राहिल्यास ते संकट कोणाच्याही दारात उभे राहू शकते, याची जाणीव जगाला झाली आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१७)

प्राचार्य प्र. श्री. डोरले

मागील काही लेखांकांमधून महाभारतातील अस्त्र विद्येबद्दल, त्यांतील अणुविज्ञानाबद्दल माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्यासंदर्भात दूरध्वनीवरून अनेक जिज्ञासू, या विषयात आवड असणारे तसेच वैज्ञानिकदृष्ट्या यात काही संशोधन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक बंधू आणि संशोधन कार्यात मग्न असलेल्या विदुषींचे फोन आलेत. त्यावर सविस्तर बोलणेही झाले. त्यातून त्यांच्या जिज्ञासेतून काही महत्त्वाच्या शंका वा अपेक्षा प्रकट झाल्यात. त्याचे स्वरूप सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे आढळले -

-भारतीयांची प्राचीन अस्त्रविद्या ही अणू विज्ञानावर आधारित होती. ते ज्ञान त्यांनी कशातून साध्य केले?

-त्या ज्ञानाची महती वा उपयोजन करणारी ग्रंथ संपदा अस्तित्वात आहे काय?

-अस्त्रांचा विनियोग जर मंत्र संहितेवर आधारित असेल तर ती सारी जरी काळाच्या ओघात नष्ट झाली असे गृहीत धरले, तरी त्यातील काहींचे तरी अस्तित्व असेल की नाही? आणि

- या सर्व ज्ञानाचा, अस्त्र विनियोग करण्याचा आधारभूत घटक कोणता होता? वा कशामुळे या ज्ञानाचा विनियोग सिद्ध झाला?

वरील प्रकट झालेल्या अपेक्षांची पूर्ती करण्याचा, मी माझ्या अल्प वाचिक ज्ञानातून प्राप्त माहितीच्या आधारे या लेखांद्वारे करण्याचा प्रयत्न करीत आहे. वाचकांनी, जिज्ञासूंनी तो गोड करून घ्यावा. या लेखाने महाभारतातील अस्त्र विज्ञान हा विषयांश (टॉपिक) पूर्ण करीत आहे.

चक्रवर्ती भरताचे नावाने आपल्या देशाचे नाव 'भारत' आहे, हे ऐतिहासिक सत्य आहे. त्याला कुणीही नाकारू शकत नाही. याच देशात ऋषिमुनींच्या दिव्य तपस्येतून, साधनेतून चिरंतन सत्यावर अधिष्ठित व निसर्गनियमांवर- ज्याला आजच्या परिभाषेत आपण 'कॉस्मिक लॉज' म्हणतो- आधारित एक जीवन पद्धती निर्माण झाली. जगात ती 'हिंदू संस्कृती' या नावाने परिचित आहे. संपूर्ण जगात ती पसरली होती. हे जगातील विविध देशांमध्ये चालू असलेल्या उत्खननातून प्रकट होणारे वर्तमानकालीन सत्य आहे. या संस्कृतीचे उन्नयन आणि विकास वेदांमधील ज्ञानामुळे झाला म्हणून हिला 'वैदिक संस्कृती' याही नावाने ओळखतात. आज सहस्रावधी वैदिक शाखांमधून काळाच्या ओघात बोटावर मोजण्याइतक्याच उपलब्ध आहेत, पण आधुनिकतम (लेटेस्ट) विज्ञानाची बीजभूत संकल्पना त्यात आढळून घेतात. जिज्ञासूंनी 'न्यूक्लिअर वैदिक गॉडसब' हा संशोधन ग्रंथ वाचावा. ग्रांथिक रूपाने हा पुरावाच आहे. रामायण, महाभारत या ग्रंथांमधील युद्धसर्ग वा युद्धपर्व हे चिकित्सेने, आधुनिक विज्ञानाच्या संदर्भात वाचले तर त्यातील समान सूत्र आपल्या सहजपणाने लक्षात येऊ शकते. ही सर्व अस्त्र संपदा मंत्राधिष्ठित होती. मंत्र म्हणजे ध्वनी; ध्वनीमधून नादलहरी निर्माण होतात.

नादांमधून कंपने निर्माण होतात, ते गतियुक्त असतात. त्या गतीतील कंपनांमध्ये संघटितपणे आघात करण्याचे सामर्थ्य असते. स्थूलापेक्षा सूक्ष्मात अधिक शक्ती असते. त्यामुळे विश्वातील अणू-रेणूंचे विघटन करण्याचे, त्यांना एकत्रित करण्याचे सामर्थ्य मंत्र साधनेमुळे त्या व्यक्तीत आलेले असते. त्यातून विविध अस्त्रांची रचना आणि उपयोजना ते करू शकतात. त्यासाठी किमान एक तप साधना करावी लागेल. त्यातून मंत्रसिद्धी आणि अस्त्रसिद्धी प्राप्त होत असे. त्यामुळे या गोष्टी कपोलकल्पित व कविकल्पना नाहीत तर भारतीयांना आधुनिक विज्ञानाधिष्ठित युद्ध विज्ञानाचे, प्रगत स्वरूपाचे ज्ञान होते; याच्या या पाऊलखुणा आहेत.

महाभारतातील अस्त्र विज्ञान अधिक प्रगत स्वरूपाचे होते. सर्व अस्त्रांमध्ये 'ब्रह्मास्त्र', 'ब्रह्मशिरसास्त्र', 'नारायणास्त्र' हे अतिभयानक मारक क्षमता, संहार क्षमता असणारी अस्त्रे होती. आधुनिक काळातील हॅड्रोजन बॉम्ब, अणुबॉम्ब, परमाणू बॉम्ब हे त्याचेच रूप आहे. वरील सर्व अस्त्रांना परास्त करणारे 'पाशुपतास्त्र' होते. ते प्राप्त करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला भगवान शिवाची आराधना करण्याचा आदेश दिला होता, तो त्याने पाळला. शिवाला प्रसन्न केले आणि पाशुपतास्त्र मिळविले. ते अर्जुनाला देताना भगवान शिवांनीच या अस्त्राचे सामर्थ्य वर्णन केले आहे. ते म्हणतात- हे अर्जुना! तुला मी हे माझे अत्यंत प्रिय असे पाशुपतास्त्र देतो आहे. महेन्द्र, यमधर्म, कुबेर, वरुण, वायू, यक्ष, किंनर, गंधर्व यांनाही हे अस्त्र माहीत नाही. मग मानवाची कथाच काय? या अस्त्राच्या प्रभावाने संपूर्ण जगाचा विनाश होऊ शकतो. या अस्त्राला सर्व त्रैलोक्यात अवध्य अशी कोणतीही शक्ती नाही. या अस्त्राचा प्रयोग केवळ धनुष्यबाणांनीच होतो असे नाही, तर नुसत्या मानसिक संकल्पाने, डोळ्यांनी, वाणीनेही याचा प्रयोग करता येऊ शकतो- मनसा, चक्षुषा वाचा धनुषाच निपातयेत - इतर अस्त्रांचे प्रक्षेपण, संधानासाठी धनुष्यबाणाचे म्हणजे 'जड' स्वरूपी माध्यमाची आवश्यकता होती. पाशुपतास्त्र हे त्यापेक्षा सूक्ष्म स्तरावर कार्यरत होणारे होते. त्यामुळे ते अधिक प्रभावी होते.

आपले विश्व हे कोट्यवधी वर्षांपूर्वी उत्पन्न झाले आहे. त्याचा उत्पत्तिक्रम आणि संहार क्रमाचे गणित भारतीय ऋषिमुनींनी लक्षावधी वर्षे आधीच मांडून ठेवले आहे. आजचे विज्ञान तेच सिद्ध करते आहे. स्टिफन हॉकिंग आधुनिक विज्ञान महर्षीचे स्पष्ट म्हणणे आहे की, 'ऑल द बॅचेस ऑफ द मॉडर्न सायन्सेस आर गोईंग टू प्रूव्ह द ओन्ली फॅक्ट, दॅट देअर इज अ वन्सेस इन द युनिव्हर्स.' भारतीय तत्त्वज्ञानाने यालाच 'पुरुष आणि प्रकृतीचे अद्वैत' म्हटले आहे. या अद्वैताचे पाच घटक भौतिक स्तरावर कार्यरत असणारे आहेत- पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश. हे पाचही घटक संख्यात्मकदृष्ट्या परस्परांशी निगडित आहेत. आबद्ध आहेत. अणूपासून उत्क्रांत मानवापर्यंत आणि मानवापासून तो ब्रह्मांड नायकापर्यंत सर्व एकरस, एकात्म (होमोजिनियस) आहे. त्यालाच तात्त्विक भाषेत 'पंचीकरण सिद्धांत' असे म्हटले. भारतीय अस्त्रविद्या ही या पंचीकरणावर आधारित आहे. संपूर्ण विश्वातील विविध पदार्थांचे नामरूपात्मक गणित, जसे 'पृथ्वी' १/२ उर्वरित आप, तेज, वायू, आकाश, प्रत्येकी १/८ तन्मात्रा = पृथ्वी - या प्रमाणे सर्व द्रव्यांमध्ये समजावे. या तन्मात्रांचे (मॉलिक्यूल्स) संघटन, विघटन, रूपांतरण आणि कॉम्बिनेशन करून संधान म्हणजे त्या त्या अस्त्राचे प्रक्षेपण केले जात असे. जसे पृथ्वी तत्त्वप्रधान अस्त्र- पर्वतास्त्र, आप तत्त्वप्रधान- पर्ज्यनास्त्र, तेज तत्त्वप्रधान- अग्निअस्त्र, वायू तत्त्वप्रधान- वायव्यास्त्र, आकाश तत्त्वप्रधान- अंतरिक्षास्त्र. कुरुक्षेत्रात ही सर्व अस्त्र वापरली गेली होती. पाशुपतास्त्राचे काम काही पडले नाही. कारण ते अधिक सूक्ष्म आणि मानसिक स्तरीय (मेंटल लेव्हल) होते.

आधुनिक काळात धृतराष्ट्री वृत्तीशी संघर्ष करण्यासाठी तर ते नियतीने राखून ठेवले नसेल ना...?

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# कृत्रिम बुद्धिमत्तेची उबाठा!

उद्धवराव, तुम्ही बाळासाहेबांचे वारस, दुभंगलेल्या शिवसेनेचे प्रमुख, माजी मुख्यमंत्री वगैर वगैरे. म्हणूनच तुम्हालाच म्हणून सांगतो, बरळले किंवा जीभ सैल झाली, हे शब्द संजय राऊत सारख्यांनाच लागू होतात. पण, तुम्ही बुधवारी सायंकाळी नाशकात जे काही बोललात न ते नळावर पाणी भरणाऱ्या महिला जशा भांडतात किंवा टोमणे मारतात; तसेच काहीसे जाणवले. बाळासाहेबांचे चिरंजीव म्हणण्यापेक्षा त्यांचे (विचाराचे नव्हे) राजकीय वारसदार म्हणून न त्या भाषणात नावीन्य नव्हते. तुम्ही जे म्हणताय न की भारतीय जनता पार्टीने मुख्यमंत्रिपदाचा शब्द फिरवला म्हणून आम्हाला फारकत घ्यावी लागली. त्या क्षणापासून तुम्ही आणि (राहुल गांधीसोबत बरोबरी करणारे) चिरंजीव आदित्य कोणताही कार्यक्रम असला तरी तेवढेच बोलता! त्यात थोडा बदल झाला तो शिंदेंनी शिवसेना फोडल्यानंतर! आता तर तुम्हा बापलेकांचे भाजपा, मोदी, शाह, फडणवीस आणि शिंदे यांच्या नावाचा उल्लेख केल्याशिवाय भाषणं संपतच नाही. कालही तेच टेप तुम्ही वाजवली. हळूहळू नागरिकांना अशी भाषणं मुखोद्गत् होतात बरं! पण, काल एक नावीन्य होते. एरवी तुम्ही पिताश्री, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांना आठवता आणि आठवलेच पाहिजे ते कर्तृत्ववान वडील होते. त्यांच्या एका हाकेवर महाराष्ट्र बंद होत होता. तुम्हीच नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्राने त्यांना स्मरलेच पाहिजे. नाशकात मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शिवसेना प्रमुख बाळासाहेबांचे आजच्या स्थितीला अनुसरून भाषण वाजवले. एका क्षणापर्यंत बाळासाहेबच बोलत असल्याचे जाणवले. त्यांचा तो रुबाबदार आवाज पुन्हा कानावर पडला, त्यांची वाक्य फेकण्याची ती ताकदही त्यात होती. परंतु, ते 'एआय' या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून! एखाद्या कार्यक्रमात बाळासाहेबांना आठवणे, त्यांना वंदन करणे, त्यांच्या आठवणींना उजाळा देणे, त्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठीचे आवाहन वगैरे उद्धवराव आम्ही समजू शकतो. परंतु, आजची परिस्थिती बाळासाहेबांच्या तोंडी घालून पुन्हा महाराष्ट्रातील लोकांना भावनिक साद घालण्याचा प्रयत्न नाशकात महानगर पालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर निर्धार मेळाव्यात झाल्याचे जाणवले. खरंच सांगतो राजे हो, एआयच्या माध्यमातून बाळासाहेबांचा आवाज ऐकायला मिळाला; हा पहिलाच प्रयोग होता. बाळासाहेब असते तर कसे बोलले असते हे एआयच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न तोडकाच ठरणार आहे. आयुष्यभर कोणतेही राजकीय पद घेणार नसण्याच्या शब्दावर कायम राहणारे बाळासाहेब देशातील सर्वच राजकीय पक्षांसाठी आदरणीय नव्हते तर त्यांच्या शब्दाला तेवढा मानही होता. पण, तुम्ही त्यांचे राजकीय वारस ठरलेले एका मुख्यमंत्रिपदासाठी आपल्या तीर्थरूपांच्या विचारांनाच तिलांजली दिली. तुम्ही तर मुख्यमंत्री, पुढे जाऊन पंतप्रधान करणाऱ्यांच्या रांगेत (रिमोट कंट्रोल) बसणारे व्हायला हवे होते. बाळासाहेबांनी नाही का पहिल्यांदा ब्राह्मण म्हणून मनोहरपंत जोशी यांना मुख्यमंत्री केले होते. एका चिठ्ठीवर त्यांना राजीनामा द्यायला लावून प्रखर शिवसेना नेते नारायण राणे यांना मुख्यमंत्री केले. तीच परंपरा तुम्ही चालवली असती तर बाळासाहेबांना वंदन करून तुम्हाला तुमची ताकद दाखवता आली असती कालच्या निर्धार मेळाव्यात. पण, पुन्हा तुम्हाला बाळासाहेबांचा आधार घ्यावा लागला. शिवसेनेमुळे भारतीय जनता पार्टी वाढल्याचे या मेळाव्यात पुन्हा उल्लेख झाला. पण, तुम्ही कमजोर पडलात म्हणून भाजपा वाढली. अजून एक गोष्ट, भाजपा कार्यकर्ते आणि हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्यांना भाजपाने वेगवेगळे लढावे, असे अनेक दिवसांपासून वाटत होते. खेड्यापाड्यात पाऱ्यावरही गप्पा रंगत होत्या. अनेकांनी ताकद तर अजमावा, असे देवेंद्र फडणवीसांना बोलून दाखवले होते. परंतु, त्यांनी आहे त्यांच्यासोबत लढू असे जाहीर केले होते. तुमच्याच सोबतचा विषय नाही तर एकनाथ शिंदे आणि नंतर सोबत आलेले अजित पवार यांनाही सोबत घेत ते महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा लढले हो! आणि तुम्ही तेच मुख्यमंत्रिपदाचे तुणतुणे घेऊन अजूनही फिरत आहात. याच मेळाव्यात तुम्ही काँग्रेसच्या वतीने बोलायला आलो नसल्याचे म्हणत राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली आणि दुसऱ्याच क्षणाला काँग्रेसचे कौतुकही केले. भाजपाचे बेगडी हिंदुत्व आपल्याला मान्य नसल्याचे तुम्ही म्हणालात. तुम्ही भाजपाचे कट्टर दुश्मन आम्ही समजू शकतो. पण, पुढे बसणाऱ्यांना मान्य नसल्याचे तुम्ही ठोकून दिले. त्यांना मान्य नाही हे तुम्ही कसे काय ठरवू शकता. बघा टाळ्यांनी हुरळून जात याच भाषणात आपण दुप्पट आमदार निवडून आणू शकतो, असे आविर्भावात बोलून गेलात. लगेच तुमच्याच मेंदूने तुम्हाला एवढे आमदार नाहीत, असे सुचवल्याने तुम्ही पुन्हा तेवढे आमदार नाहीत, अशी पुस्ती जोडली. आता भाजपावाले गोमूत्र वाटतात हे थोतांड असल्याचेही तुम्ही म्हणालात. उद्धवराव तुम्हाला शेवट 'जी' उपाधी लावत उद्धवजी असे म्हणावेसे वाटत होते. पण पुन्हा तुम्हाला 'जी' म्हणजे संघ, भाजपा, हिंदुत्व वाटले असते. पण, तुमची ही सर्व धडपड, आगपाखड जी काही सुरू आहे ती फक्त खुर्चीसाठीच ना! बरं, महाविकास आघाडीत तुमच्या मताला किती प्राधान्य आहे, याची कल्पना तुम्हाला आहेच. जनतेनेही तुम्हाला धूळ चारली आहे. आगामी मुंबई महानगर पालिकेच्या रणधुमाळीत तुमच्या गटाचा पालापाचोळा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाळासाहेबांच्या विचार पुन्हा व्यक्तिशः अंगीकारा. तुम्हाला एआयच्या माध्यमातून बाळासाहेबांच्या आवाजात साद घालण्याची वेळ येणार नाही. बाळासाहेब ये नामही काफी है उद्धवजी!

९८८१९०३७६५

## दखल

# ॲडव्हान्टेज देवेंद्र फडणवीस

मोरेश्वर बडगे

'एक अकेला देवेंद्र क्या करेगा' असे शरद पवारांच्या लाडक्या कन्या खासदार सुप्रिया सुळे मागे म्हणाल्या होत्या. एकटे देवेंद्र काय करू शकतात ते उभा महाराष्ट्रच नव्हे तर देश पाहतो आहे. भाजपासोबत निवडणूक युती करून नंतर शरद पवारांसोबत बसणाऱ्या उद्धव ठाकरे यांना देवेंद्र फडणवीसांनी मोठी अद्दल घडवली. स्वतःच्या राजकारणासाठी महाराष्ट्राला वेठीस धरणाऱ्या शरद पवारांची सद्दी संपवली. त्यांच्या जोरावर आत्मघात करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना घरी बसवले. त्यासाठी फडणवीसांनी त्याग केला. उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले. दुसरा असता तर रुसून बसला असता. फडणवीसांनी अडीच वर्षे कळ काढली. मोदी-शाहांनी पुन्हा त्यांच्याकडे महाराष्ट्राची सूत्रे दिली आणि आपण बघत आहोत. महाराष्ट्र पुन्हा विकासाची उड्डाणे घ्यायला सिद्ध झाला आहे. अमरावती विमानतळाचे उद्घाटन हा त्यातला एक नमुना आहे. विदर्भाने स्वप्नातही पाहिलं नसेल अशा गोष्टी विदर्भात घडत आहेत. अमरावतीला विमानतळ आलं आहे. पहिलं विमान घेऊन फडणवीस आपल्या सहकाऱ्यांसह अमरावतीला आले, हा ऐतिहासिक क्षण आहे. ही गोष्ट काँग्रेसवालेही करू शकले असते, परंतु केलं नाही. अमरावती हे विदर्भातले महत्त्वाचे शहर आहे. विभागीय आयुक्तांचे मुख्यालय आहे. संत्रा आणि कापूस यांचे मोठे मार्केट आहे. अमरावतीच्या अंबादेवीला ऐतिहासिक महत्त्व आहे. शिर्डी, मुंबई इथल्या देवदेवतांचे मार्केटिंग झाले. विदर्भ मात्र आपल्या देवांचे, देवासमान महापुरुषांचे मार्केटिंग करू शकला नाही. तुकडोजी महाराज, गाडगेबाबा इथेच होऊन गेले. त्यांची 'खंजिरी' आपणच विसरत चाललो. अमरावतीला थेट रेल्वे नाही. मुंबईला जायचे म्हणजे मोठी सर्कस आहे. मुंबई ही मायानगरी आहे. पुढे जायचे असेल तर मोठ्या शहरांशी थेट संपर्क असावा लागतो. मुंबईच्या संपर्कात राहिलेले छत्रपती संभाजीनगरसारखे शहर मोठी झेप घेऊ शकले; त्याचे रहस्य लक्षात येऊ शकते. २५ वर्षांपूर्वी संभाजीनगरात दोन पंचतारांकित हॉटेल होती, विमानतळ होते. पुणे, नाशिक, औरंगाबाद ही शहरे वाढली. कारण मुंबईशी थेट संपर्क साधता येत होता. कोल्हापूरचं उदाहरण घ्या. कोल्हापूरच्या विमानतळाचा विस्तार होताच त्या शहराचं महत्त्व कमालीचं वाढलं आहे. नागपूरची समस्या वेगळी आहे. विमानतळ असूनही नागपूर वाढू शकलं नाही. कारण इथल्या राजकीय नेत्यांना ती दूरदृष्टीच नव्हती. बलाढ्य इंडोरामा कंपनी नागपूरला आली तेव्हाची गोष्ट आहे. त्या कंपनीत जाताना वाटेत वाहतूक कोंडी व्हायची. 'उड्डाणपूल करून देत असाल तर मी दुसरे युनिट इथे आणतो' असे इंडोरामाच्या मालकाचे म्हणणे होते. पण त्याला कोणी प्रतिसाद दिला नाही. विदर्भाची ही मोठी शोकांतिका आहे. एवढी मोठी एमआयडीसी असतानाही विदर्भातल्या तरुणांना नोकरीसाठी मुंबई-



पुण्याला धावावे लागते. पोरं पुण्याला आणि म्हातारे आईवडील नागपुरात अशी अलिकडे नागपूरची ओळख होऊ लागली आहे. आता या गोष्टीला ब्रेक लागेल, असा विश्वास वाटतो. कारण व्हिजन असलेले नेतृत्व सत्तेत आले तर काय होते, याचा प्रत्यय आपल्याला देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने येतो आहे. राष्ट्रीय कीर्तीच्या संस्था तसेच कार्यालये आज नागपुरात दिसतात. नितीन गडकरी-देवेंद्र फडणवीस या नेतृत्वाच्या जोडीला आलेली ही विकासाची फळं आहेत. विदर्भाचे राज्य मिळाले असते, तरी आले नसते एवढे पैसे आज विदर्भात येऊ पाहत आहेत. गडचिरोलीचा 'स्टील हब' तर विदर्भाला 'हॉट स्टेशन' बनवणार आहे. फडणवीसांच्या रूपातला एक नेता किती उड्डाणं घेऊ शकतो, याचे हे ट्रेलर आहे. 'अभी तो पिक्चर बाकी है.'

अमरावतीला विमानतळ होणार ही गोष्ट आपण गेली कित्येक वर्षे ऐकतो आहोत. फडणवीसांनी ते मनावर घेतलं. २०१९ मध्ये काम सुरू झालं. अवघ्या पाच वर्षांत विमानतळ सज्ज आहे. सध्या आठवड्यातून तीन दिवस मुंबईची सेवा असणार आहे. पण हे वाढेल. लवकरच तुम्ही पाहाल. अनेक कंपन्या इथून आपली विमानं सोडतील. देशाच्या कुठल्याही कोपऱ्यात विमानाने जाता येईल. याचा फायदा केवळ प्रवाश्यांनाच होईल अशातला भाग नाही. उद्योगधंदेही वाढतील. मोठमोठे उद्योगपती आणि त्यांचे अधिकारी विमानाने जाणे पसंत करतात. इथे यावे असे अमरावतीमध्ये सारे काही आहे. फक्त विमानतळ नव्हते. आता साऱ्यांना यावे लागेल. कारण इथं संत्रा आणि कापूस. टेक्स्टाईल हबच्या माध्यमातून अमरावती मोठी झेप घेऊ शकते. महाआघाडीच्या राजकारणाने चुथडा केला. देवेंद्र सरकारचे प्रकल्प आणि योजना थांबवल्या. 'स्थगिती सरकार' म्हणूनच उद्धव यांना इतिहासात ओळखले जाईल. महायुतीची सत्ता येताच कुलुपं उघडणे सुरू झाले. विकासाच्या या वाटचालीत अमरावतीचे विमानतळ गेमचेंजर ठरणार आहे.

विकासाच्या आघाडीवर महायुतीचे सरकार नवनवी उड्डाणं घेत असताना राजकीय आघाडीवरही महायुतीची पकड घट्ट होताना दिसत आहे. काँग्रेस राष्ट्रीय पक्ष असला, तरी महाराष्ट्रात तो व्हेंटिलेटरवर आहे. भाजपाशी कसे लढायचे हेच काँग्रेसच्या नेत्यांना कळेनासे झाले आहे. त्या गडबडीत काँग्रेसवाले नको त्या चुका करीत चालले आहेत. काँग्रेसमध्ये इनकमिंग ठप्प आहे. ओसाडगावची पाटीलकी करायला कोण जाणार? शरद पवार थकले आहेत. मग उरले उद्धव ठाकरे आणि त्यांची उबाठा. महापालिकेच्या निवडणुका सुप्रीम कोर्टात रखडल्या आहेत. कोर्टाचा निकाल होऊन त्या कधीही लागू शकतात. त्यामुळे सारेच राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते हाय अलर्टवर आहेत. राजाचा प्राण कुण्या पोपटात होता अशी गोष्ट आपण ऐकतो. तसे उद्धव ठाकरे यांच्या 'शिल्लक सेने'चे प्राण मुंबई महापालिकेत आहेत. गेली कित्येक वर्षे मुंबई महापालिका ठाकरे सेनेच्या हातात आहे. गेल्या निवडणुकीत फडणवीस यांच्या कृपेमुळे ती कशीबशी ठाकरे यांच्या हातात राहिली. मात्र आता अवघड आहे. विधानसभेच्या निवडणुकीत उबाठाचे २० आमदार निवडून आले. त्यातले १० मुंबईतले आहेत. म्हणजे अजून धुगधुगी आहे. गेल्या लोकसभा-विधानसभा निवडणुकीत उद्धव 'हिरव्या आश्रया'ला गेले होते. त्याचा त्यांना फायदा झाला नाही. मात्र आता ते 'आपण हिंदुत्व सोडले नाही' असे वारंवार सांगत आहेत. महाविकास आघाडी तशीही केव्हाच मोडीत निघाली आहे. उद्धव यांचे आकर्षण संपले आहे. त्यांचेच लोक त्यांना सोडून जात आहेत. ही गळती थांबायचे नाव घेत नाही. शरद पवारच काय, काँग्रेसही उबाठासोबत आघाडीला तयार होईल, अशी हवा नाही. उद्धव यांची कोंडी झाली आहे. कोणाशी लढायचे? कोणाच्या जोरावर लढायचे? भाजपाशी लढायचे की शिंदे सेनेशी? की राज ठाकरे यांच्या मनसेशी? नियती पूर्ण हिशोब चुकता करायला निघाली आहे. मराठी टक्का मुंबईत आतापर्यंत ठाकरेंना वाचवत आला. मात्र आता तिथेही उद्धव यांचे पत्ते उलटे पडत आहेत. एकनाथ शिंदे हे राज ठाकरे यांच्या भेटीला गेल्याने वेगळ्याच युतीची चर्चा सुरू झाली आहे. महायुतीत चौथा भिडू घुसणार का? कुठल्याही परिस्थितीत भाजपाला यावेळी मुंबईत आपला महापौर बसवायचा आहे. त्यासाठी भाजपाला किमान निम्म्या जागा लढवाव्या लागतील. शिंदेंच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. मुंबईसोबत त्यांना ठाणेही जिंकायचे आहे. राज ठाकरे महायुतीत आले तर त्यांना किती जागा मिळतील? राजकारणात खूप काही घडणार आहे. पण एक पक्के. टार्गेट उद्धव हेच असतील.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### आई रागावते...!

दोन अल्पवयीन मुली आई अभ्यासासाठी रागावते म्हणून घरातून पळून गेल्या. रात्री एका दुकानाच्या बाजूला झोपल्या. सकाळी पुढे जाणार होत्या, परंतु पालकांची पोलिसात तक्रार व पोलिसांच्या सतर्कतेमुळे सापडल्या. रात्री कोणी गैरकृत्य किंवा गैरफायदा घेतला नाही हे नशीब. आईने तुम्हाला जन्म दिला. तुमच्या चांगल्यासाठी, वळण लावण्यासाठी रागवावे लागते. सासरी गेल्यावर आईचाच उद्धार होतो. पूर्वी लहान मुले अंगावर पिताना दूध थुंकत, चावा घेत. आईने रागवले की रडणे, परंतु लगेच आईची प्रेमाची मिठी. किती विलोभनीय क्षण असायचे. आता पती-पत्नी पोटाकरिता बाहेर जातात. मुलांना हवा तसा वेळ देऊ शकत नाही. त्यांची भरपाई अति लाडवणे. त्यामुळे त्यांना वाईट सवयी, न ऐकणे वगैरे गोष्टी घडतात. एखादे वेळी आई रागावली की त्यांना अपमान वाटतो व त्यातूनच आत्महत्या, पळून जाणे वगैरे घडते. 'छडी लागे छम-छम, विद्या येई घम-घम' अशी म्हण आहे. चटके देणे, उपाशी ठेवणे, कोंडून ठेवणे वगैरे अघोरी उपाय करू नये. तुम्ही मुलाला जन्म दिला. त्याला योग्य व्यक्ती बनविणे तुमचे कर्तव्य आहे. रागावल्यानंतर मायेने जवळ घेणे, त्यांची चूक शांतपणे समजून सांगणे महत्त्वाचे आहे. आई जीवनाचा पहिला गुरू आहे. ती तुमच्या भल्यासाठी करते, हे घरातील प्रत्येक व्यक्तीने समजून सांगावे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

●● ●●

### अमरावतीचे झाले; अकोला विमानतळाचे काय?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प आहे. विकसित भारताच्या निर्मितीसाठी देशभरात हवाई वाहतुकीची भूमिका महत्त्वाची असणार आहे. देशातील प्रत्येक शहराचा सर्वांगीण विकास झाला तरच विकसित भारताचे लक्ष्य साध्य करता येईल. अकोल्यात ब्रिटिश काळापासून विमानतळ अस्तित्वात आहे. गत अनेक वर्षांपासून धावपट्टी विस्तारीकरणाअभावी विमानसेवा सुरू होण्यासाठी विलंब होतोय. अमरावती विमानतळ सुरू झाले, पण अकोलेकरांच्या वाट्याला अद्याप निराशाच आहे. विमानसेवेद्वारे अकोला शहर मोठ्या शहरांना जोडले गेल्यास दळणवळण सुलभ होईल, शहरात मोठे उद्योग येतील, बेरोजगारी दूर होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विदर्भातील आहेत. काही काळ ते अकोल्याचे पालकमंत्री होते. अकोल्याच्या समस्या त्यांनी जवळून पाहिल्या आहेत. सरकारने स्वतः पुढाकार घेऊन अकोला विमानतळाचा प्रश्न लवकर निकाली काढावा.

**अखिल देशपांडे**/अकोला

●● ●●

## वाचक पत्रे

### सामाजिक अध:पतन

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानीच्या मंदिरातील ११ पुजारी ड्रग्ज व्यापारी असल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचली. ही बातमी जितकी धक्कादायक आहे तितकीच ती गंभीर आहे. देवीचा पुजारी ही आदरणीय व्यक्ती असते. भाविक त्याच्याकडे एक आदर्श म्हणून पाहत असतात. अशा व्यक्तीने आपल्या पदाला काळिमा फासत ड्रग्ज विक्रीसारख्या गंभीर गुन्ह्यात सहभागी होणे, ही गोष्ट लांच्छनास्पद आहे. देवीचे पुजारी ड्रग्जचा व्यवसाय करीत असतील तर ते एकप्रकारे सामाजिक अध:पतनच आहे. संबंधितांवर कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. तुळजापूरसारख्या छोट्या शहरात जर इतक्या राजरोसपणे ड्रग्जचा व्यवसाय चालत असेल तर काय म्हणावे? यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता आहे म्हणूनच या प्रकरणाची सखोल चौकशी व्हायला हवी.

**श्याम ठाणेकर**/९९२२५४६२९५

●● ●●

### अल्पसंख्यक शाळांचा घोळ

महाराष्ट्रात 'उर्दू' माध्यम शाळा अल्पसंख्यक दर्जा प्राप्त आहेत. न्यायालयाने या शाळांना रोस्टरमुक्त करून उर्दू माध्यम शिक्षक भरतीकरिता रीतसर परवानगी दिलेली आहे. परंतु 'मराठी' माध्यम शाळा ज्यांच्या स्थापनेपासून 'अल्पसंख्यक' दर्जा नसताना त्या मागील १०-१५ वर्षांत अल्पसंख्यक कशा झाल्या? यावर विधानसभेत आजपर्यंत प्रश्न उपस्थित का झाला नाही? हे सारे प्रश्न अनुत्तरित राहण्यास नागपूर शिक्षक भरती घोटाळा कारणीभूत ठरतो. यात तथाकथित अल्पसंख्यक शिक्षण संस्थाचालक, अधिकारी वर्ग आणि शिक्षण मंत्रालय जबाबदार आहेत. कारण अल्पसंख्यक दर्जा हा मुंबईतील सचिवालयातूनच प्राप्त झालेला असतो. 'पवित्र पोर्टल' हे शिक्षक भरती प्रक्रिया राबवित असताना शिक्षणाधिकारी आणि उपसंचालक मंडळींनी या नियुक्त्या करून कोट्यवधीचे घबाड कमवून संस्थाचालकांचेही उखळ पांढरे केले. प्रश्न आहे गरीब प्रशिक्षित शिक्षक उमेदवारांचा कारण त्यांच्याकडे लाखो रुपयांची तरतूद नाही. ते केवळ ११ महिन्यांकरिता वेठबिगारी करीत आहेत. महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदेच्या शाळांतील प्रशिक्षणार्थी शिक्षकांना ताबडतोब कायम करावे म्हणजे भरती घोटाळ्याला लगाम लागेल!

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बाबासाहेबांना अभिवादन...



### जय भारत शाळा

जय भारत प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत साबळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशालेचे प्राचार्य नरसिंह आसादे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले, सचिव दिपक फुले, मारुती माळगे, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते. प्रास्ताविक नीता फुले यांनी केले. सूत्रसंचालन किरण गाटे यांनी केले तर आभार नारायण सूर्यवंशी यांनी मानले.

### सिद्रामप्पा हत्तुरे शाळा

सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक सचिन जाधव, सुधाकर कामशेट्टी, बालअध्यक्ष शिवम चव्हाण यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सुनिता शेजाळे, परमेश्वर काळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मुसाअली मुल्ला यांनी केले. प्रास्ताविक सौंदर्या कल्लूरकर व आभार वैष्णवी वदुंळे हिने मानले.

### भारत मराठी विद्यालय

भारत मराठी विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.के. सरसंबे होते. सहशिक्षिका एन.झेड. सय्यद यांनी प्रास्ताविक केले. यावेळी अब्दुल हिरीपुरे, कावेरी पंजलो, रिजयाबानो शेख या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक एस.एम. ढाकणे यांनी देखील मनोगत व्यक्त केले. यावेळी टी.टी. वडावराव, जे.एच. हवालदार, मुस्कान मंगलूरे, सादीक पटेल उपस्थित होते. सूत्रसंचालन एच.ए. बागवान यांनी केले तर आभार एस.एम. शेख यांनी मानले.

### विद्यानिकेतन हायस्कूल

विद्यानिकेतन हायस्कूल व हिंगुलांबिका प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब ढगे अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक गोपीनाथ नवले यांनी केले. यावेळी अक्षया मादगुंडी, ईश्वरी हंचाटे, जैद पिरजादे, अनुष्का म्हेत्रे, ऐश्वर्या दंतकाळे, नंदिनी सीडगिड्डी, वेदांत इरावती, प्रगती तळभंडारे, लोकेश जेटगी, समृध्दी जानकर या विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानावर आधारित नाटक सादर केले. सूत्रसंचालन सहशिक्षिका रुपादेवी राजगे यांनी केले तर आभार शंकरगिरी यांनी मानले.

### विमल कन्या प्रशाला

मुरारजी पेठ, येथील शिवाजी मराठी विद्यालय व विमल कन्या प्रशालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे सचिव उज्वला ढमाळ यांनी प्रतिमेचे पूजन केले. यावेळी मुख्याध्यापक बिराजदार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### भारत उर्दू विद्यालय

भारत उर्दू विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शाहीन अत्तार होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस एस.ए. सय्यद यांनी प्रास्ताविक केले. म ान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आयेशा मुल्ला, जोया सातखेड या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक तस्कीन शेख यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन फरहतबानो कालेभाई यांनी केले तर आभार रिजवान शेख यांनी मानले.

### श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशाला

श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एम.डी. बिराजदार होते. यावेळी शिक्षिका जी.एस.काशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बी.ए.रायनी यांनी केले.

### मल्लिकार्जुन हायस्कूल

हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे होते. यावेळी धरेप्पा हत्तुरे, भारत राऊत यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अनिलकुमार गावडे, भारत राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, बसवराज कोरे, अण्णाराव तुप्पद, बाबुराव कलशेट्टी, प्रकाश चिवडशेट्टी, विद्याधर हुलगेरी, दत्तात्रय अगरखेड, संतोष हिरेमठ, परमेश्वर चांदोडे, गणेश कोरे, अमरनाथ कदारे, संतोष स्वामी, सुकेशनी गंगौडा उपस्थित होते. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले तर आभार रमेश आगवणे यांनी मानले.

### जिल्हा माहिती कार्यालय

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंती निमित्ताने जिल्हा माहिती कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यालयातील कर्मचारी संजय घोडके, लिपिक पंकज बर्दापूरकर, जेष्ठ पत्रकार बाळासाहेब वाघमोडे, पत्रकार चंद्रशेखर गायकवाड, साप्ताहिक सोलापूर दणका संपादक विश्वनाथ व्हनकोरे, दै. अग्रणीवार्ताचे संपादक योगेश तुरेराव, साप्ताहिक क्रांतीसिंगचे संपादक संतोष शेलार, साप्ताहिक संत दामाजी संपादक सुनील चेळेकर इत्यादी उपस्थित होते.



## साहित्य कला विकास प्रतिष्ठानचा पुरस्कार हा माझ्या संशोधन कार्याचा सार्थ सन्मान : डॉ. शिंदे

**सोलापूर :** गुरुवर्य प्रा. ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण यांच्या विद्यार्थ्यांनी साहित्य कला विकास प्रतिष्ठानची स्थापना करून आपल्या गुरूंच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. या प्रतिष्ठांनचा पुरस्कार म्हणजे माझ्या संशोधन कार्याचा आणि गुरुपरंपरेचा सार्थ सन्मान आहे' असे उद्गार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी काढले. सातारा येथील छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालयातील पाठक हॉल येथे ते साहित्य कला विकास प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण संशोधन पुरस्कार प्रदान सोहळ्यात बोलत होते. या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अशोक भोईटे यांच्या हस्ते डॉ. शिंदे तसेच सिने अभिनेते सयाजी शिंदे यांना 'ज्येष्ठ कलावंत', सूर्यकांत गुंजवटे यांना 'ग्रंथ शिक्षक' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# सोलापूरच्या समस्या आता 'ॲक्शन मोडवर' घ्या

## सोलापूर विकास मंचच्या बैठकीत आयुक्त ओंबासे यांच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या समवेत आज सोलापूर विकास मंचच्या शिष्टमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे, अतिरिक्त आयुक्त रवि पवार, उपायुक्त तैमुर मुलाणी, उपायुक्त आशिष लोकरे, नगररचना विभाग प्रमुख मनिष भुष्णुरकर, पाणीपुरवठा अधिकारी व्यंकटेश चौबे, सहाय्यक आयुक्त, सह्यायक अभियंता प्रकाश दिवाणजी, तपन डंके व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.



या बैठकीमध्ये शहराच्या विकासाशी निगडीत विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. त्यामध्ये अनेक वर्षांपासून प्रलंबित सोलापूर दुहेरी जलवाहिनी तथा नियमित पाणीपुरवठा,विजापूर रोड अतिक्रमण काढून सर्विस रोड करणे,महानगर पालिकेच्या गाळ्याचे भाडे करार नूतनीकरण, अलीकडील बांधकाम परवाना घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर दोषींवर कठोर कारवाई, अक्कलकोट एम.आय.डी.सी.म धील तथा होटगी रोड इंडस्ट्रीयल इस्टेट मधील पायाभूत सुविधा, संभाजी चौक ते सीएनएस हॉस्पिटल दरम्यानचा ५४ मीटर रस्ता, आणि शहरातील वाढती मटका, मावा, अनधिकृत बॅनर्स व मिरवणुकांची समस्या यांचा समावेश होता.

तर स्मार्ट सिटी प्रकल्पाचे ऑडिट, JNNURM² बस घोटाळ्याची चौकशी, महानगरपालिकेच्या जलतरण तलावांचे कंत्राटीकरण, ओपन स्पेसचा उत्पन्नक्षम उपयोग, महात्मा गांधी प्राणीसंग्रहालयाचा CSR निधीतून विकास, नवीन बांधकामांना झाडे लावण्याची सक्ती, रस्त्यांवरील अजोरा हटवणे, मृत पाळीव प्राण्यांसाठी अंत्यसंस्कार सुविधा, नवीन विकास आराखड्यावरील नागरिकांच्या सूचनांचा विचार व 'जुळे सोलापूर प्राधिकरण' स्थापनेचा प्रस्ताव या विषयांवरही शिष्टमंडळाने सविस्तर मांडणी केली.

आयुक्त डॉ. ओंबासे यांनी विकास मंचच्या वतीने मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न होत असल्याचेही यावेळी सांगितले. या बैठकीमुळे शहराच्या अनेक समस्यांवर प्रभावी पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सोलापूर विकास मंचने प्रशासनाला यापुढेही पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सोलापूर विकास मंचचे मिलिंद भोसले, केतन शहा, विजय कुंदन जाधव, सुहास भोसले, प्रशांत भोसले, प्रसन्न नाझरे, इक्बाल हुंडेकरी, आनंद पाटील, आरती अरगडे, भारत पाटील, शुभदा पाटील आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.



## वीरशैव लिंगायत जंगम अर्चक पुरोहित अध्यक्षपदी डॉ. होळीमठ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत जंगम अर्चक पुरोहित या संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ. शिवयोगी शास्त्री होळीमठ यांची निवड करण्यात आली.

संस्थेचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, अध्यात्मिक विकास व्हावा तसेच संपूर्ण महाराष्ट्रभरात पूजा विधी एकसूत्रीपणा येण्यासाठी त्याचबरोबर संपूर्ण समाजाने एकत्रित येण्यासाठी काल सोलापूर येथे झालेल्या महत्त्वपूर्ण महासभेत अखिल वीरशैव लिंगायत जंगम अर्चक पुरोहित महासभेचे महाराष्ट्र धर्मदाय सरकारी मान्यता मिळाली आहे. यावेळी राज्यस्तरीय नूतन पदाधिकारी कार्यकारणी निवड करण्यात आली आहे. त्यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार शेगावचे संगय्या स्वामी यांनी केला.

**अन्य पदाधिकारी :** उपाध्यक्ष राजपुरोहित प्रकाश स्वामी जंगम (रायगड), सचिव महेश कुगावकर (पुणे), सहसचिव ईश्वर स्वामी होळीमठ (सोलापूर), खजिनदार राजशेखर स्वामी (आहेरवाडी), संचालक-त्र्यंबकअप्पा पटवेकर स्वामी (नांदेड), राहुल जंगम (सातारा), विजयकुमार स्वामी (उदगीर), अनाजी जंगम (मुंबई).



## वालचंद कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

वालचंद कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीचा निकाल १५ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आला. यावर्षी अकरावी कला व विज्ञान शाखेत इयत्ता निहाय गुणानुक्रमे प्रथम तीन विद्यार्थ्यांचा हृद्य सत्कार सोहळा शिक्षक व विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी होते. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. राजशेखर हिप्परगी, गुणवंत विद्यार्थी व पालक शिक्षक वृंद उपस्थित होते. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनुप म्हेत्रे यांनी केले. उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शैक्षणिक साहित्य,वाचनासाठी उपयुक्त पुस्तक व पेढा भरवून वर्गशिक्षक व शिक्षकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित पालकांपैकी सौ. खंडेलवाल व सौ. बेल पवार या पालकांनी महाविद्यालयाच्या उपक्रमांचे कौतुक करून, अभ्यास व अभ्यास पूरक उपक्रमांसाठी महाविद्यालय नेहमी पूरक वातावरण उपलब्ध करून दिल्याबद्दल शिक्षकांचे व संस्थेचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन तुपकर यांनी केले. चंद्रशेखर कस्तुरे यांनी आभार मानले.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचे ब्रँड अँबेसिडर यशवंत कन्हेरे यांनी साधला संवाद

### महापालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिले धडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील ब्रँड अँबेसिडर (स्वच्छता विभाग) यशवंत कन्हेरे यांनी सोलापूर महापालिकेतील स्वच्छता कर्मचा-यांना मार्गदर्शन केले.



सोलापूर महानगरपलिकेच्या वतीने दि. ३ ते १७ एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये आयुक्त यांच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील झाडूवाला,बिगारी, सफाई कामगार यांची क्षमता बांधणी कार्यशाळा झाली. त्या अनुषंगाने मंगळवारी विभागीय कार्यालय क्र.६ कडील सर्व चतुर्थ श्रेणी सफाई कर्मचारी यांची आरोग्य निरीक्षक व मुख्य आरोग्य निरीक्षक यांच्यासाठी कार्यशाळा झाली.यावेळी मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिक्षक अनिल चराटे व संबंधित झोनचे मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक त्यांच्या कर्मचा-यांसह उपस्थित होते. याच कार्यशाळेप्रसंगी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कडील ब्रँड अँबेसिडर (स्वच्छता विभाग) यशवंत कन्हेरे उपस्थित होते. यशवंत कन्हेरे, हे त्यांचे दुचाकीवरून स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत ३६ जिल्ह्यांतर्गत प्रवास करीत आहेत. आज त्यांनी या कार्यशाळेत त्यांनी उपस्थित राहून सर्व कर्मचा-यांशी संवाद साधला. या वेळेस त्यांनी कर्मचा-यांना चांगले आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, रोजच्या कामामधील सामाजिक बांधिलकी, सुयोग्य वर्तन, वरिष्ठाचा सन्मान, व्यसनधिनता याबाबत मार्गदर्शन केले.

## श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय येथे 'छात्रार्पण सोहळा' संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ म हाविद्यालय,हत्तुरे नगर,सोलापूर येथे 'छात्रार्पण सोहळा' मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय सिद्धपा वरनाळ गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

ब्लॅक अँड व्हिच प्रायवेट लिमिटेड कंपनी व सेवा सहयोग फाउंडेशन, मुंबई यांच्या माध्यमातून प्रशालेस सोलार,ग्रीन बोर्ड, विज्ञान साहित्य,स्मार्ट टी.व्ही.इ.साहित्य देण्यात आले. याप्रसंगी ब्लॅक अँड व्हिच प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे पायपिंग इंजिनियर अभिजीत तपिसे,प्रोजेक्ट इंजिनियर श्रीशैल कापसे,उ.सोलापूरचे शिक्षण विस्तार अधिकारी आदरणीय बापूराव जमादार साहेब यांच्या उपस्थितीत सेवा सहयोग फाउंडेशन,मुंबईचे प्रोजेक्ट हेड राम रोकडे,अनिकेत गमरे,राजेश मोरे, विनोद सुरवसे, प्रशांत



कापसे,आनंद गायकवाड,प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे सर,उपक्रम प्रमुख धरेप्पा हत्तुरे सर,पर्यवेक्षक रमेश दिंडोरे यांच्या शुभहस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व सोलार, ग्रीन बोर्ड, विज्ञान साहित्य व स्मार्ट टी.व्ही.चे उद्घाटन करण्यात आले.

प्रमुख अतिथींचे मान्यवरांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी पायपिंग इंजिनियर अभिजीत तपिसे यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साधनांचा वापर करून ज्ञान वाढवावे असे सांगितले व ब्लॅक अँड व्हिच कंपनी सी.एस. आर.फंडातून गरजवंतांना मदत कशी करते याविषयी माहिती दिली.प्रोजेक्ट इंजिनियर श्रीशैल कापसे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावे व शाळेचे,आई-वडिलांचे नाव मोठे करावे असे म्हटले. राम रोकडे यांनी सेवा सहयोग फाउंडेशनच्या अभ्यासिका,किशोरी प्रशिक्षण,क्रीडा विकास यासारख्या विविध उपक्रमाविषयी माहिती सांगत या शैक्षणिक साधनांचा आवर्जून वापर करा असे सांगितले. तसेच विनोद सुरवसे यांनी गीत सादर केले. प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे यांनी मनोगत व्यत्क केले. तसेच शिक्षण विस्तार अधिकारी बाबुराव जमादार साहेब यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले, तर सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले. रमेश आगवणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.


## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग
इंद्रभुवन रेल्वे लाईन्स, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, सोलापूर-४१३००१
ई मेल - drainsmac@gmail.com टेलिफोन नं. ०२१७-२७४०३५०

**- जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा -**

सार्व. आरोग्य अभियंता/जावक क्र./साआअ/जनि. १४८ दि. १७/४/२०२५

सोलापूर महानगरपालिका सार्व आरोग्य अभियंता कार्यालयाकडील ड्रेनेज विभागाकडील खाली नमूद कामाचे ई-निवेदनाबाबत.

1. Tender ID-2025_SMC_1171262_1
2. Tender ID-2025_SMC_1171250_1

या कामाचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. १७/०४/२०२५ पासून सकाळी १०.०० पासून पाहण्यास उपलब्ध आहे. कळावे दि. १७/०४/२०२५

सही/-
सहा. अभियंता ड्रेनेज
सोलापूर महानगरपालिका

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस या सावधनतेची जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- अ) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे बाळे येथील शेतजमीन गट नं.१७/१ यांसी क्षेत्र ३ हे. ०२ आर. यांसी आकार रु.१४-६२ पैसे. यांसी चतुःसिमाः-पुर्वेस-गट क्र.१७/२, दक्षिणेस-गट क्र.१८, पश्चिमेस जय मल्हार नगर, उत्तरेस-गट क्र.१६. ब) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे बाळे येथील शेतजमीन गट नं. १७/२ यांसी क्षेत्र २ हे. ७७ आर. यांसी आकार रु.१३-४४ पैसे. यांमी चतुः सिमाः-पुर्वेस-सोलापूर-कारंबा रस्ता, दक्षिणेस-गट क्र.१८, पश्चिमेस गट क्र.१७/१, उत्तरेस-गट क्र.१६.

वरील नमूद मिळकत ही १) श्री. मोहन शामराव सुरवसे, २) श्री. विकास हरीदास सुरवसे. ३) ऋषिका हरीदास सुरवसे, ४) पुजा हरीदास सुरवसे उर्फ पुजा प्रसाद निकम, ५) सुरेश शामराव सुरवसे व ६) सुरेखा जयंत सर्जेराव यांनी अविभक्त मालकी व कब्जे वहिवाटीची असून, त्यांनी सदरची मिळकत ही आमचे अशिल-१) अनंता नागनाथ सुभेदार व २) रुपेश प्रभाकर जक्कल, यांना कायम खुशखरेदी देण्याची बोलणी करून आमचे अशिलांकडून सदरच्या खरेदी-विक्री व्यवहारापोटी अंशतः पुर्तता म्हणून इसारा रक्कम स्विकारून आमचे अशिलांच्या नावाने दि.०७/०९/२०२४ रोजी करारपत्र लिहून दिलेली आहे व सदरची मिळकत आमचे अशिलांना नोंदणीकृत खरेदीखताव्दारे विकण्याचे मान्य व कबूल केले आहे. येणेप्रमाणे आमचे अशिल सदरची वर नमूद मिळकत खरेदी करणार आहेत. असे असतांना, सदरची वर नमूद मिळकत ही १) श्री. मोहन शामराव सुरवसे-वगैरे हे त्रयस्त व्यक्तींसोबत व्यवहार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे खात्रीलायक माहिती आमचे अशिलांना नुकतेच समजलेले आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे हक्क व अधिकार असल्याने कोणीही खरेदी-विक्री अथवा त्रयस्त व्यक्तींचे हक्क निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करु नये. तसे केल्यास आमचे अशिलांवर मुळीच बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही फसगत होवू नये म्हणून सदरची सावधानतेची जाहीर नोटीस दिलीआहे.

ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली ता. १७/०४/२०२५.

सही/-
ॲड. संदीप सातलगाव
ऑफिस- चेंबर नं. २८, जिल्हा न्यायालय आवार,
सोलापूर मो.नं.९६६५४९०१४३
अशिलातर्फे ॲडव्होकेट

## मध्य रेल्वे

सोलापूर विभाग
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सीपीएम, गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-टेंडर मागवत आहे. **ई-टेंडर सूचना क्रमांकः 01-2025-जीएसयू-सिव्हिल, दिनांकः 15.04.2025. कामाचे नावः (अ)** सोलापूर विभागातील अमृत स्टेशन योजनेअंतर्गत अक्कलकोट रोड स्टेशनवर दिव्यांगजनांसाठी एफओबीसाठी रॅम्पची तरतूद. **(ब)** सोलापूर विभागातील अमृत स्टेशन योजनेअंतर्गत अक्कलकोट रोड स्टेशनवर लिफ्टची तरतूद. (क) येथे पार्सल आणि गुड्स शेडशी संबंधित सुविधांची तरतूद **(1) सोलापूरः** सीजीएस कार्यालय आणि पार्सल कार्यालयाची तरतूद **(2) कलबुर्गी :** पार्सल कार्यालयाची तरतूद. **(3) कुर्डुवाडीः** हमाल कक्ष आणि सीजीएस कार्यालयाची तरतूद. **(4)** वडलः पार्सल कार्यालय आणि स्टोअर रूमची तरतूद. **(v)** पंढरपूरः हमाल खोलीची तरतूद. **(ड) वडळ** - वाडी स्टेशनच्या पीएफ **1/2** आणि **3/4** चे पुनर्बांधणी आणि इतर सुधारणा कामे. **कामाची अंदाजे किंमतः** रु. **21,31,91,771.00. बकाया रक्कमः** रु. **12,16,000.00.** काम **पूर्ण करण्याचा कालावधीः 12** (बारा) महिने. **देखभाल कालावधीः 6** महिने किंवा एक पावसाळा यापैकी जे नंतर असेल. **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ 09.05.2025** रोजी दुपारी **3.00** वाजेपर्यंत. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ **09.05.2025** रोजी दुपारी **3.30** वाजेनंतर. **वेबसाइट तपशीलः www.ireps.gov.in टीपः** संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईलः **www.ireps.gov.in**

सहाय्यक विभागीय अभियंता (GSU), मध्य रेल्वे, सोलापूर.
Akar/Sur- 40
धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

पुढील नेमली ता.१०/८/२०२५
दि.कि.अ.नं. ५४/२०२५
नि.५

## जाहीर प्रसिध्दीकरण

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

१) **भास्कर वैजिनाथ शेळके**, वय ६७ वर्षे,
२) **प्रभाकर वैजिनाथ शेळके**, वय ६३ वर्षे,
३) **पद्माकर वैजिनाथ शेळके**, वय ५५ वर्षे,
सर्वाचा धंदा-शेती, रा. सर्व सुर्डी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं.१ ते ३ हे एकमेकाचे सख्खे भाऊ असून अर्जदाराची आई कमल वैजिनाथ शेळके ही होती ती दि.२९/१०/२०२४ रोजी मौजे सुर्डी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेली आहे. यातील अर्जदाराना त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता, शासनाचे घरकुल योजनेचा लाभ घेणेकरीता हेअरशिप (वारस) प्रमाणपत्राची गरज भासली असे कथन करुन अर्जदारानी या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्राकरीता अर्ज केलेला आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कात कांही दस्त असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख १०/६/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता.१५/४/२०२५

**सही/-** **लिपीक** **दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी**

## Truhome FINANCE
## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

### मागणी सूचना

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे. कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **श्री.अमितकुमार नानासाहेब मोटे (कर्जदार)**<br>**श्रीमती प्रगती अमितकुमार मोटे (सह-कर्जदार)**<br>**सौ.रंजना नानासाहेब मोटे (सह-कर्जदार)**<br>**निवासाचा पत्ता : पोस्ट रुक्मिणी निवास ना, पंढरपूर रोड, दिवाणी न्यायालयाजवळ,बाजारपेठ, मोहोळ, महाराष्ट्र- ४१३२१३.**<br>**तसेच येथे: ग्रामपंचायत घर, क्रमांक २८४२ मोहोळ, घर क्रमांक १२५ ४ २ब २अ २१, मोहोळ महाराष्ट्र ४१३२४८**<br>**कर्जाची रक्कम – रु.३३,८३,७६३/-**<br>**लॅन क्रमांक - SLPHSOLR0000433**<br>**एनपीए तारीख – ०५/०४/२०२५** | एन.ए. गॅट क्रमांक १२५४/२बी/२ए/२१ असलेले, मोजमाप ०१.१०.६६, ग्रामपंचायत घर क्रमांक २८४२, मोहोळ, तालुका मोहोळ, जिल्हा - सोलापूर येथे स्थित आणि खालीलप्रमाणे सीमा: (तांत्रिक प्रमाणे) पूर्व: प्लॉट क्रमांक २२ दक्षिण: प्लॉट क्रमांक १६ पश्चिम: रस्ता उत्तर: रस्ता | मागणी सूचना तारीख: ११-०४-२०२५<br>दिनांक ०९-०४-२०२५ रोजी कर्ज खाते क्र. SLPHSOLR0000433 अंतर्गत रु.३६,४७,७५२/- (रुपये छत्तीस लाख सत्तेचाळीस हजार सातशे बावन्न फक्त) नुसार नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि आकस्मिक खर्च, किंमत इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - सोलापूर
दिनांक - १८.०४.२०२५
स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### नाडाची स्वच्छ क्रीडा परिसंस्था निर्माण करण्यावर राष्ट्रीय परिषद

**नवी दिल्ली :** भारतीय राष्ट्रीय डोपिंग विरोधी एजन्सीने (नाडा इंडिया) ने बुधवारी नवी दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे एकत्रितपणे स्वच्छ क्रीडा परिसंस्था निर्माण करणे या विषयावर एक परिषद यशस्वीरित्या आयोजित केली. भारत २०३६ उन्हाळी ऑलिम्पिकचे आयोजन करण्यासाठी बोली लावत असताना, निष्पक्षता, अखंडता व स्वच्छ खेळासाठी वचनबद्धता सुनिश्चित करण्यासाठी देशाने आपली क्रीडा महत्त्वाकांक्षा एका मजबूत डोपिंग विरोधी प्रणालीसह पूर्ण केली पाहिजे, असे प्रतिपादन क्रीडा विभागाच्या सचिव सुजाता चतुर्वेदी यांनी परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी केले. प्ले ट्रू वीक २०२५ चा भाग म्हणून आयोजित या कार्यक्रमाने भारतात स्वच्छ, निष्पक्ष आणि मूल्यांवर आधारित क्रीडा वातावरण निर्माण करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या विविध भागधारकांना एकत्र आणले, असे त्यांनी यावेळी सांगितले. जागतिक डोपिंग विरोधी एजन्सीच्या (वाडा) आशिया/ओशनिया कार्यालयाच्या संचालक डॉ. मयुमी याया यामामोतो यांनी या वर्षीच्या जागतिक प्ले ट्रू मोहिमेत नाडा इंडिया आणि राष्ट्रीय भागधारकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. यावेळी दहा वेगवेगळ्या प्रादेशिक भाषांमध्ये नाडा इंडियाज फेअर प्ले गाईडचे अनावरण करण्यात आले. परिषदेत डोपिंग विरोधी धोरण, शिक्षण आणि चाचणी वाढवणे आणि खेळाडूंचे हक्क आणि जबाबदाऱ्यांबद्दल जागरूकता वाढवणे, विशेषतः उपचारात्मक वापर सवलतीच्या संदर्भात, यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर आकर्षक पॅनेल चर्चा झाली. राष्ट्रीय क्रीडा महासंघ, वैद्यकीय संस्था आणि आंतरराष्ट्रीय संघटनांमधील तज्ज्ञांनी भारताची डोपिंग विरोधी प्रणाली मजबूत करण्यासाठी व्यावहारिक अंतर्दृष्टी व कृतीयोग्य धोरणे सामायिक केली.

# बंगळुरूसमोर पंजाबचे आव्हान

**बंगळुरू, १७ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. या हंगामात घरच्या मैदानावर पहिला विजय मिळवण्यासाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसमोर पंजाब किंग्जच्या फिरकी गोलंदाजीचे आव्हान असणार आहे. तेव्हा आरसीबीचे यश, हे त्यांचे फलंदाज युझवेंद्र चहलच्या फिरकीवर कसे नियंत्रण ठेवतात, यावर अवलंबून असेल.

सध्या आयपीएल गुणतालिकेत आरसीबी व पंजाबचे सहा सामन्यात चार विजय आहे व ते प्रत्येकी ८ गुणांसह अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या स्थानावर आहेत. हे दोन्ही संघ आपले अव्वल चार क्रमांकात आपले स्थान मजबूत करण्यास उत्सुक आहे.

अलीकडेच मुल्लानपूर येथे झालेल्या केकेआरविरुद्धच्या सामन्यात युझवेंद्र चहल व ग्लेन मॅक्सवेलने आपल्या जादुई फिरकीने पंजाब किंग्जच्या १११ धावांचा बचाव केला. चहल व मॅक्सवेल व वेगवान गोलंदाज मार्को जॅन्सेनने प्रभावी मारा करत केकेआरला ९५ धावांतच गुंडाळले. केकेआरविरुद्ध चार बळी टिपून चहल आपल्या फॉर्ममध्ये परतला आहे. चहल जादूच्या चेंडूंपेक्षा लांबीच्या चेंडूंमध्ये निपूण आहे. लेग-स्पिनर ऑफ-स्टंपच्या बाहेरून चेंडू टाकून त्याला आकर्षित करतो व फलंदाजांना मोठे फटके मारण्यासाठी चेंडूपर्यंत पोहोचावे लागते, त्यामुळे अनेकदा खोलवर झेल घेतले जातात.



तो त्याच्या गोलंदाजीचा वेगही खूप हुशारीने बदलतो व जर त्याला षट्कार मारायचे असतील, तर फलंदाजांना अतिरिक्त मेहनत घ्यावी लागते. मॅक्सवेल सुद्धा असाच एक फिरकीपटू आहे व तो मोठे वळणे किंवा डिपरऐवजी नियंत्रणावर अवलंबून असतो. त्याची ही कौशल्यपूर्ण गोलंदाजी पंजाबसाठी उपयोगी पडू शकते.

आरसीबीकडे कृणाल पांड्या व सुयश शर्मासारखे फिरकी गोलंदाज आहेत. त्यामुळे यजमान संघाला दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

पंजाब संघाकडे अर्शदीप सिंग व मार्को जानसेन यांच्यासारखे सक्षम वेगवान गोलंदाज आहेत, जरी ते विरोधी संघात जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांच्याइतके सुशोभित नाहीत.

**कर्णधार रजत विरुद्ध कर्णधार श्रेयस**

दुसरीकडे, रजत पाटीदार आणि श्रेयस अय्यर यांच्यात फारसे साम्य नाही. अय्यरने आपली क्षमता सिद्ध केली आहे, तो आयपीएल विजेता कर्णधार आहे आणि या स्पर्धेत फलंदाज म्हणून त्याचा उत्कृष्ट रेकॉर्ड आहे. पाटीदार हा आयपीएलमध्ये पहिल्यांदाच कर्णधार झाला आहे, पण त्याच्याकडे समकक्ष फलंदाज म्हणून चमकदार कामगिरी नाही. निकालांची पर्वा न करता त्याने संघाचे नेतृत्व करताना एक आश्वासक संयम दाखवला आहे.



विराट कोहली व हेझलवूड सारख्या सुपरस्टार्सनी भरलेल्या संघाचे नेतृत्व करताना पाटीदारने दबदबा निर्माण न करता अधिकृत भूमिका बजावली आहे. त्याला एका बहुमुखी प्रतिस्पर्ध्याविरुद्ध त्याच्या रणनीतिक व व्यवस्थापकीय सर्वोत्तम कामगिरीचा अनुभव घ्यावा लागेल.

जर एम. चिन्नास्वामीच्या खेळपट्टीने संथगतीचा खेळ कायम ठेवला तर पाटीदार हा एक उत्कृष्ट फिरकीपटू आहे. त्याला चहल व मॅक्सवेलच्या दुहेरी धोक्यालाही नामोहरम करण्याची जबाबदारी स्वतःवर घ्यावी लागेल. अय्यर हा सुद्धा फिरकीच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक आहे, आरसीबीच्या कृणाल व सुयशचा सामना करण्यासाठी पंजाबच्या संघात तो सर्वोत्तम सुसज्ज आहे.

अलिकडेच झालेल्या कमी धावसंख्येच्या रोमांचक सामन्यात केकेआरवर १६ धावांनी विजय मिळवल्यानंतर एक संघ म्हणून पंजाबचा आत्मविश्वास उंचावलेला असेल. पण फलंदाजी आणि गोलंदाजीत मजबूत असलेल्या आरसीबीला पराभूत करणे कठीण प्रतिस्पर्ध्याचे काम असेल, याची पंजाबला चांगली जाणीव असेल. (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**पंजाब किंग्ज वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ :** एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# सुरुची-सौरभ जोडीचा सुवर्णभेद

## नेमबाजी विश्वचषक



सुवर्णपदक विजेते सुरुची सिंग व सौरभ चौधरी

**लिमा, १७ एप्रिल**

पेरूमधील लिमा येथे आयोजित आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघ (आयएसएसएफ) विश्वचषक रायफल/पिस्तूल/शॉटगन स्पर्धेत सुरुची व सौरभ चौधरी या भारतीय जोडीने १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. या भारतीय जोडीने अंतिम फेरीत याओ कियानक्सुन व हू काई या चीनच्या जोडीला १७-९ असे पराभूत केले. किशोरवयीन सुरुचीचे हे तिसरे विश्वचषक सुवर्ण व सौरभचे नववे पदक आहे. यात मिश्र सांघिक विश्वचषकातील त्याचे पाचवे मिश्र सांघिक सुवर्णपदक व रौप्यपदकाचा समावेश आहे.

लास पाल्मास रेंजमध्ये पात्रता फेरीत या भारतीय जोडीने एकत्रित ५८० गुणांसह सुवर्णपदकाची लढत जिंकली. सुरुचीने सौरभला दोन गुणांनी मागे टाकले. चीनच्या जोडीने ५८५ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. निर्णायक सामन्यातही चीनच्या जोडीने २-६ व ४-८ अशी आघाडी घेतली, त्यानंतर भारतीय प्रशिक्षक समरेश जंग यांनी बोलावलेल्या टाइमआउटमुळे सामन्याच्या गतीत बदल झाला.

सुरुचीने संपूर्ण सामन्यात उत्कृष्टपणे लक्ष्य साधले व दरम्यान काही वेळा ती १०-रिंग चुकली. तिच्या टोकियो ऑलिम्पियन जोडीदाराने उच्च १० गुणांसह कामगिरी केली.

या जोडीने दहाव्या मालिकेत एकेरी शॉट्सच्या पहिल्या मालिकेनंतर गमावलेली आघाडी पुन्हा मिळवली. आठव्या मालिकेत बरोबरी झाल्यानंतर त्यांनी ११-९ अशी आघाडी घेतली. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. चीनच्या खेळाडूंनी दबावाखाली खेळत प्रथमच चुकीचा खेळ केला. शेवटी सुरुचीने १०.६ अशी, तर सौरभने १०.५ अशी कामगिरी केली, तर चीनचे दोन्ही खेळाडू १०-रिंग मारू शकले नाहीत. यापूर्वी, मनू भाकर व रविंदर सिंग या दुसऱ्या भारतीय जोडीला कांस्यपदकाच्या सामन्यात दुसरी चीनची जोडी- झांग यिफान/मा कियान्के यांच्याकडून ६-१६ असा पराभव पत्करावा लागला. यानंतर मनू भाकर व रविंदर सिंग या दुसऱ्या भारतीय जोडीने चौथे स्थान पटकावले. पात्रता फेरीतही ते ५७९ च्या एकत्रित प्रयत्नांसह चौथ्या स्थानावर होते.

यापूर्वी सुरुचीने सलग दोन विश्वचषक सुवर्णपदके जिंकताना दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकरवर मात केली. मनूला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. (वृत्तसंस्था)

# दक्षिण आफ्रिकेत नीरज चोप्राची दमदार सुरुवात

## ८४.५२ मीटरची कामगिरी

**नवी दिल्ली, १७ एप्रिल**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राने दक्षिण आफ्रिकेतील पॉचेफस्ट्रूम येथे झालेल्या पॉच इन्व्हिटेशनल ट्रॅक स्पर्धेत विजय मिळवून आपल्या हंगामाची सुरुवात शानदारपणे केली. वर्ल्ड अॅथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर चॅलेंजर स्पर्धेत चोप्राने ८४.५२ मीटर अंतरावर भाला फेकून सहा जणांच्या क्षेत्रात अव्वल स्थान पटकावले.

भारतीय स्टारने दक्षिण आफ्रिकेच्या २५ वर्षीय डाऊ स्मिथच्या सर्वोत्तम ८२.४४ मीटरच्या कामगिरीला मागे टाकले. पण चोप्राचा प्रयत्न त्याच्या ८९.९४ मीटरच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीपेक्षा कमी होता, तर डाऊ त्याच्या ८३.२९ मीटरच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीच्या जवळ पोहोचला.



या स्पर्धेत ८० मीटरचा टप्पा ओलांडणारे नीरज व स्मित हे दोनच खेळाडू होते. दक्षिण आफ्रिकेचा आणखी एक अॅथ्लिट डंकन रॉबर्टसन ७१.२२ मीटरच्या प्रयत्नासह तिसऱ्या स्थानावर राहिला.चोप्रा त्याचे नवीन प्रशिक्षक झेक प्रजासत्ताकचे जान झेलेझनी यांच्या मार्गदर्शनाखाली पॉचेफस्ट्रूममध्ये प्रशिक्षण घेत आहेत. झेलेझनी हे तीन वेळचे ऑलिम्पिक विजेते व विश्वविक्रमधारक आहेत.२७ वर्षीय नीरज चोप्रा गत वर्षी आपल्या दीर्घकाळचे जर्मन प्रशिक्षक क्लॉस बार्टोनिएझ यांच्यापासून वेगळा झाला. आता नीरज १६ मे रोजी दोहा डायमंड लीगमध्ये आपल्या एलिट-लेव्हल मोहिमेला सुरुवात करणार आहेत.

त्याने २०२० च्या टोकियो (सुवर्ण) आणि २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिक (रौप्य) मध्ये सलग दोन ऑलिम्पिक पदके जिंकलीत. २०२२ मध्ये त्याची ८९.९४ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी झाली आणि तो बराच काळ ९० मीटरचा टप्पा ओलांडण्याचा प्रयत्न करत आहे. (वृत्तसंस्था)

# इंग्लंड दौऱ्यात कडवे आव्हान असेल : रोहित शर्मा

**नवी दिल्ली, १७ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग-२०२५ (आयपीएल) हंगामाच्या समाप्तीनंतर इंग्लंड दौऱ्यामध्ये भारतीय संघासमोर चांगले आव्हान असेल व संघाला या आव्हानाची उत्सुकता आहे, असे कर्णधार रोहित शर्मा म्हणाला.



२० जूनपासून हेडिंग्ले क्रिकेट मैदानावर सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी भारत थ्री लायन्सचा दौरा करणार आहे. हेडिंग्ले येथे भारती संघ २००७ नंतर देशात त्यांची पहिली कसोटी मालिका जिंकण्याची आशा बाळगत आहे.

नक्कीच, गेल्या वेळी आम्ही या खेळाडूंशी खेळलो होतो तेव्हा मालिकेत २-२ अशी आघाडी होती. हो, आम्हाला यापैकी काही खेळाडूंना शंभर टक्के तंदुरुस्त राहण्याची आवश्यकता आहे. आमची मालिका उत्तम असेल आणि मला माहिती आहे की हे खेळाडू आजकाल कोणत्या प्रकारचे क्रिकेट खेळत आहेत. आमच्यासाठी हे निश्चितच एक चांगले आव्हान असेल, असेही तो म्हणाला.

इंग्लंड मालिकेदरम्यान भारतीय कर्णधारावर निश्चितच टीका होईल, विशेषतः २०२४-२५ च्या बॉर्डर गावस्कर चषक मालिकेत भारताच्या शेवटच्या कसोटी सामन्यात, जेव्हा कर्णधाराने पाच सामन्यांच्या मालिकेत केवळ ३१ धावा केल्या होत्या. रोहितने पहिली कसोटी गमावली होती आणि त्याच्या वाईट फॉर्ममुळे पाचव्या आणि मालिकेतील निर्णायक सामन्यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. रोहितच्या जागी शुभमन गिलला संधी मिळाली, यात त्यांना सहा गड्यांनी पराभव पत्करावा लागला.

मला स्वतःशी प्रामाणिक राहावे लागले. मी चेंडू चांगला मारत नव्हतो. इतर काही खेळाडू देखील संघर्ष करत होते आणि आम्हाला खरोखर गिलने खेळावे अशी इच्छा होती. तो खूप चांगला खेळाडू आहे आणि त्याने मागील कसोटी गमावली होती, म्हणून आम्हाला वाटले की तो संधीला पात्र आहे, असे तो म्हणाला.

तुम्ही संघाला प्रथम स्थान देण्याचा प्रयत्न करता, संघाला काय हवे आहे ते पाहता व त्यानुसार निर्णय घेता. कधीकधी ते कार्य करते, कधीकधी ते होत नाही, ते असेच चालते. तुम्ही घेतलेला प्रत्येक निर्णय यशस्वी होण्याची किंवा तो योग्य असेल याची कोणतीही हमी नसते. तुम्ही केवळ संघासाठी जे चांगले वाटते तेच करता, असे रोहितने सांगितले. (वृत्तसंस्था)



# सूर्यनमस्कार स्पर्धेत लोकमंगल प्रशालेच्या तिघींची कामगिरी

## प्रणाली चव्हाण प्रथम तर वैष्णवी, अस्मिता द्वितीय व तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

राणी कित्तूर चन्नम्मा स्मारक भवन समिती सोलापूर यांच्या वतीने नूमवि शाळा डफरीन चौक येथे झालेल्या वैयक्तिक सूर्यनमस्कार स्पर्धेत लोकमंगल माध्यमिक प्रशालेच्या तिघींनी उल्लेखनीय कामगिरी केली.

आठवी ते दहावीच्या वयोगटात ४०० सूर्यनमस्कार घालत प्रणाली संतोष चव्हाण हिने प्रथम क्रमांक पटकाविला. पाचवी ते सातवीच्या वयोगटातून वैष्णवी संतोष चव्हाण हिने ३०० सूर्यनमस्कार घालत दुसरा तर अस्मिता मोरेने ४०० सूर्यनमस्कार घालत तृतीय क्रमांक पटकाविला. या खेळाडूंना रतिकांत म्हमाणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे लोकमंगल समूहाचे अध्यक्ष सुभाषबापू देशमुख, अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे, कार्यकारी संचालक अभयसिंह साठे, मुख्याध्यापिका शुभांगी साठे व शिक्षक वृंदांनी अभिनंदन केले.

# सोलापूर महिला क्रिकेट संघ उपांत्य फेरीत दाखल

## पुण्याच्या दिलीप वेंगसरकर संघाशी आज लढत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १९ वर्षाखालील महिलांच्या क्रिकेट स्पर्धेत सोलापूर जिल्हा संघाने सलग तिसऱ्या विजयासह उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत त्यांची लढत शुक्रवारी पुण्याच्या दिलीप वेंगसरकर संघाशी पडेल.



आर्या उमाप



पूनम माशाळे

पुणे येथे सुपर लीग पद्धतीने सुरू असलेल्या या स्पर्धेत गुरुवारी सोलापूरने परभणी संघावर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला. पूनम माशाळे हिच्या माऱ्यांसमोर परभणीचा डाव ७१ धावात गडगडला. पूनम माशाळे ५ बळी टिपले, भक्ती पवार, विभावरी देवकते प्रतीक्षा नंदर्गी व साक्षी लामकाने यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. विजयी ७२ धावांचे लक्ष्य सोलापूरच्या आर्या उमाप हिने (नाबाद ४९) व भक्ती पवार (नाबाद १६) यांनी गाठले.

सोलापूरला स्नेहल जाधव, किरण मणियार, मानसी जाधव, सारिका कुरुलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

संघास सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, संयुक्त सचिव धैर्यशिल मोहिते पाटील व चंद्रकांत रेंबर्सू यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# मॅकगर्क सामन्याला कलाटणी देणारा खेळाडू : अक्षर पटेल

**नवी दिल्ली, १७ एप्रिल**

जॅक फ्रेझर-मॅकगर्कने या हंगामात अद्याप चांगली कामगिरी केलेली नाही, परंतु एकदा तो लयीत आला की तो सामन्याला कलाटणी देणारा खेळाडू ठरेल, असा विश्वास दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने व्यक्त केला.

दिल्ली कॅपिटल्स संघाला डळमळीत सुरुवातीचा सामना करावा लागला आहे. गत वर्षी आपल्या पहिल्याच हंगामात आपल्या पॉवर-हिटिंगने स्पर्धेत चमक दाखवणारा २३ वर्षीय सलामीवीराची बॅट या आवृत्तीत तळपली नाही.

राजस्थान रॉयल्सविरुद्ध दिल्ली कॅपिटल्सच्या नाट्यमय सुपर ओव्हर विजयातही मॅकगर्कचा वरच्या स्थानावरील संघर्ष सुरूच राहिला. कारण या हंगामात तो पाचव्यांदा पॉवरप्लेमध्येच बाद झाला.

माझे मत वेगळे आहे. जर तुम्ही चांगली सुरुवात केली नाही, तरी आम्ही अजूनही चांगली कामगिरी करत आहोत. त्यामुळे एकाच संघातून खेळण्याची संधी आहे, असे अक्षर म्हणाला.

मॅकगर्क इतका चांगला खेळाडू आहे की ज्या दिवशी तो खेळायला सुरुवात करेल तेव्हा तो सामन्याला कलाटणी देईल, असा त्याने पुनरुच्चार केला. (वृत्तसंस्था)

### स्वतःच्या कर्णधारपदावर अक्षर खुश



आयपीएल अर्ध्या टप्प्यात पोहोचत असताना अक्षर पटेल हा आनंदी अष्टपैलू खेळाडू स्पर्धेतील सर्वात यशस्वी कर्णधार म्हणून उदयास आला आहे. त्याने सहा सामन्यांपैकी पाच सामन्यांमध्ये आपल्या संघाला विजय मिळवून दिला आहे. मी राज्य क्रिकेटसाठी कर्णधार होतो, मला काय करायचे आणि काय करू नये हे माहित आहे. जेव्हा तुम्हाला तुमच्या मनाप्रमाणे संघ चालवण्याची आणि तुम्हाला हवे तसे खेळण्याची संधी मिळते तेव्हा संधीचा फायदा का घेऊ नये, असे अक्षर म्हणाला.

# महाराष्ट्र विद्यालयातील जलतरणपटूंची ऐतिहासिक कामगिरी



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ एप्रिल -**

१४ वर्षाखालील इयत्ता आठवीमधील स्वराज्य डोईफोडे, जयसिंह शिंदे, माधव शिंदे या जलतरणपटूंनी श्रीलंकेपासून भारतापर्यंत पाल्क समुद्रधुनी ३० किलोमीटर खुल्या समुद्रात पोहण्याचा ऐतिहासिक विक्रम केला आहे.

या आधी विजयदुर्ग, मालवण, पोरबंदर आणि कोची येथे सागरी जलतरणात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. तसेच शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये देखील चमकदार कामगिरी केली आहे.

या ऐतिहासिक कामगिरीबद्दल विद्यालयाच्यावतीने खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. या खेळाडूंना पी.डी. पाटील, योगेश उपळकर व विकास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व खेळाडूंना संस्थेचा कर्मवीर जलतरण तलाव सरावसाठी नेहमी उपलब्ध होता.

या यशाबद्दल सर्व जलतरणपटूंचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी.पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ मिराताई यादव, एस.बी. शेळवणे, संस्था सदस्य, विद्यालयाच्या प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.




# मारिया क्लब व परेल वर्कशॉप उपांत्य फेरीत

## रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

मध्य रेल्वे इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मारिया क्रिकेट क्लब व परेल वर्कशॉप मुंबईने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात गुरुवारी झालेल्या सामन्यात मारिया क्रिकेट क्लबने हैदराबाद कर्नाटका क्रिकेट क्लबला ८ धावांनी नमविले. अष्टपैलू कामगिरी करणारा ब्रिजेश कुमार (८१ धावा व ३ बळी) सामन्याचा मानकरी ठरला.

दुसऱ्या सामन्यात परेल वर्कशॉप मुंबईने मध्य रेल्वे सोलापूर ब संघाचा २ गडी राखून पराभव केला. रोशन परते (२५ धावा व २ बळी) सामनावीर ठरला. हे पुरस्कार पंच असोसिएशनचे अध्यक्ष नंदकुमार टेळे व परेल वर्कशॉपचे रमेश ढाले यांच्या हस्ते देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून सचिन गायकवाड व मजहर मंगोली आणि नंदकुमार टेळे व नवीन माने तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक:**

**मारिया क्रिकेट क्लब:** २० षटकांत ९ बाद १४० (ब्रिजेश कुमार ८१, शहजाद शाह २४, देवा ठाकूर १६, व्ही. नितीश ४ बळी, एमडी खदिर, नागराज व रोहन राठोड प्रत्येकी १ बळी) वि. वि. **एच.के.सी.सी. :** १९.३ षटकांत सर्व बाद १३२ (व्ही. नितीश २८, सी. मारुती २८, एल. इनित २१, ब्रिजेश कुमार ३ बळी, एस रजपांडी, रवींद्र राय व देवा ठाकूर प्रत्येकी २ बळी). **सेंट्रल रेल्वे (ब) :** २० षटकांत ६ बाद १४४ (समीर शेख ४९, श्रीकांत खोत ४८, मनीष द्रुव नाबाद १५, रोशन परते २ बळी, अभिषेक सिंग व रिशब शर्मा १ बळी) पराभूत विरुद्ध **परेल वर्कशॉप, मुंबई :** १९.३ षटकांत ८ बाद १४७ (रुपेश अंबोकर ३६, रोशन परते २५, राहुल सावंत व रवींदर सिंग प्रत्येकी १९ धावा, समीर शेख ३ बळी, मनीष द्रुव २ बळी, दिगंबर माने व संभाजी चौधरी प्रत्येकी १ बळी).

**आजचे उपांत्य सामने**

१) साऊथ सोलापूर ओल्ड विरुद्ध परेल वर्कशॉप मुंबई

२) के.बी.एन.सी.ए. विरुद्ध मारिया क्रिकेट क्लब

## महत्वाचे...

### तरुणाबरोबर झालेल्या तक्रारीतून तरुणीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** तरुणाबरोबर झालेल्या तक्रारीनंतर संतापलेल्या तरुणीने सडा मारण्याचा पिवळा रंग प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार बुधवारी १६ एप्रिल रोजी घडला.लक्ष्मी नागराज पेनगोंडा (वय २९, रा. लक्ष्मी चौक, जुना विडी घरकुल) असे तरुणीचे नाव आहे. बुधवारी सकाळच्या सुमारास लक्ष्मी हिची शेखर नावाच्या तरुणाबरोबर तक्रार झाली होती. या तक्रारीनंतर संतापलेल्या लक्ष्मी हिने अक्कलकोट रोडवरील पाणी टाकी जवळील स्मशानभूमी येथे दारात सडा मारण्याचा पिवळा रंग प्राशन केला. यात तिला त्रास होऊ लागल्याने आई पद्मा यांनी दुपारी ४.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### स्वत:च हातावर अन् गळ्यावर करून घेतल्या जखमा

**सोलापूर :** अज्ञात कारणातून स्वत:ला चाकूने गळ्यावर आणि हातावर मारून घेऊन जखमी करून घेतले. हा प्रकार कुमठा नाका परिसरातील पंचशिल नगरात बुधवारी रात्री ८ वाजता घडला.सचिन मनोहर साठे (वय ३१) असे तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री पांडुरंग सोनवणे (वय ३१) असे तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री राहत्या घरात असताना अचानकपणे दिपक याने त्याच्याकडील चाकूने गळ्यावर आणि हातावर वार करून घेऊन स्वत:ला जखमी केले. यात त्रास होऊ लागल्याने भाऊ सागर याने रात्री ९.२० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरल्याने माळशिरस येथील दोघे जखमी

**सोलापूर :** दुचाकीवरून वेळापूर ते खंडाळी असे जाताना दुचाकी घसरून झालेल्या अपघातात माळशिरस येथील दोघे जखमी झाले. हा अपघात बुधवार १६ रोजी रात्री १० वाजता घडला. सचिन मनोहर साठे (वय २८) व तात्या बिटू खंडागळे (वय ३५, दोघे रा. माळशिरस) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. सचिन आणि तात्या हे दोघे बुधवारी रात्री १० च्या सुमारास वेळापूर ते खंडाळी असे दुचाकीवरून जाताना, वेळापूरजवळ ते जात असलेली दुचाकी स्ल्यावर घसरली. यात खाली पडल्याने सचिनच्या चेह-याला खरचटले तर डोक्याला मुकामार लागला. तर तात्याच्या उजव्या कानाला जखम झाली तसेच डाव्या हाताला मार लागल्याने अकलूज येथे उपचार करून ते दोघे शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कासेगाव यात्रेत हलगी वाजवण्याच्या कारणावरून पाच जणांना मारहाण

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे शंभु महादेव यात्रेत हलगी वाजवण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून पाच जणांना बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार बुधवारी रात्री



११.५० वाजता घडला. प्रसाद प्रभाकर गायकवाड ( वय २३), सौरभ महालिंग गायकवाड (वय २३ , रा. कासेगाव ता. द. सोलापूर), समर्थ कोडिबा गायकवाड (वय १९ , रा. नेहरू नगर, सोलापूर), सूर्यभान महादेव गायकवाड (वय १९) व ओंकार लक्ष्मण गायकवाड (वय १७, रा. कासेगाव ता. द. सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. कासेगावात बुधवारी शंभुमहादेवाची यात्रा होती. त्यादिवशी रात्री ११.५० वाजता हलगी वाजवण्याच्या कारणावरून त्यांचा वाद झाल्याने त्यांना अमोल बबन जाधव, तुषार जाधव व इतर १५ ते २० जणाच्या जमावाने लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात पाच जणांना सर्वांगास मुकामार लागल्याने मध्यरात्री २.४० वाजता येथे उपचारासाठी दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### ढोकबाभुळगावात तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** मोहोळ तालुक्यातील ढोकबाभुळगाव येथे अज्ञात कारणातून तरुणाने कोणत्यातरी गोळ्या खावून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार बुधवारी रात्री १० वाजता घडला.महेश अशोक पवार (वय २८) असे तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री १० वाजता घरी असताना महेश याने अज्ञात कारणातून कोणत्या तरी २० गोळ्या खाल्ल्या. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन रात्री १२.५० वाजता भाऊ बापू पवार याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## निधन वृत्त...



### चंद्रकांत मंद्रुपकर

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**


पोलिस खात्यातील जुने अधिकारी कर्णिक नगरमधील रहिवासी कै. चंद्रकांत चनबसप्पा मंद्रुपकर (स्वामी) वय वर्ष (८७) यांचे दीर्घ आजाराने ८ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, सुना व एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



### सैफन जमादार

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

येथील सैफन बाशासाब जमादार (वय ७९, वर्ष, रा. आपना नगर, नई जिंदगी, मजरेवाडी, सोलापूर, मूळ राहणार हैद्रा, ता.अक्कलकोट) यांचे दि. १६ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता राहत्या घरी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सात रस्ता येथील मोदी मुस्लिम कब्रस्तान मध्ये दफनविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर आरटीओ कार्यालयातील लिपिक महीबूब जमादार यांचे ते वडील होत.



### शैलेंद्र माने

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

बी.बी सोनी नगर सोरेगाव येथील शैलेंद्र माने यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक सून असा परिवार आहे. ते जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून सेवेत होते.

# मंद्रूप-सोलापूर बस सेवेचा प्रश्न ऐरणीवर

## संध्याकाळच्या वेळेस एसटी बस सुरु करण्याची शिवसेनेची (उबाठा) मागणी; सामाजिक कार्यकर्तेही सक्रिय

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**

**मंद्रूप, दि. १७ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप हे एक मोठं बाजारपेठेचं गाव असून, परिसरातील भंडारकवठा, लवंगी, निंबर्गी, सादेपूर, विंचूर, कुसूर, येळेगाव, कंदलगाव या गावांचे शैक्षणिक, वैद्यकीय आणि दैनंदिन व्यवहार मंद्रूपमार्गे सोलापूर शहरात होतात. मात्र, मंद्रूपहून सोलापूरकडे संध्याकाळच्या वेळेस सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला, विद्यार्थ्यांना आणि आजारी नागरिकांना रात्रीच्या वेळेस परतीची बस नसल्यामुळे अडचणी निर्माण



होत आहेत.

या पार्श्वभूमीवर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सोलापूर एसटी आगारप्रमुख यांना निवेदन देण्यात आलं. संध्याकाळी आठ ते दहा या वेळेत मंद्रूपमार्गे सोलापूरसाठी एसटी बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे



रस्ता हरवलेली व्यवस्था
भाग-३

जिल्हाप्रमुख संतोष पाटील, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले, उपजिल्हाप्रमुख रविकांत कांबळे, युवासेना उपजिल्हाप्रमुख खंडू सलगरकर, उपशहर प्रमुख संतोष घोडके, रोहित तळवळकर, विक्री खंडागळे, शिवा नाईक उपस्थित होते.

मंद्रूप हे अनेक गावांसाठी केंद्रबिंदू आहे. येथून दररोज शेकडो नागरिक सोलापूरला प्रवास करतात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी संध्याकाळची बस सेवा अत्यंत आवश्यक आहे. राजकीय पक्षांनी पुढाकार घेतला आहे, आता प्रशासनानेही गांभीर्याने पावलं उचलावीत. नागरिकांना होणाऱ्या गैरसोयी पाहता लवकरात लवकर ठोस उपाययोजना कराव्यात. लवकरात लवकर मंद्रूप ते सोलापूर आणि मंद्रूप ते सोलापूर संध्याकाळची बस सेवा सुरू करण्यात यावी

**- अनमोल केवटे, सामाजिक कार्यकर्ते**

जिल्ह्यातील इतर तालुक्यांशी तुलना केली असता, दक्षिण सोलापूरकडे फारच कमी एसटी बस सेवा आहे. मंद्रूपला उशिरापर्यंत सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध झाल्यास औराद, होनमुर्गी, बसवनगर, वडकबाळ, वांगीसह परिसरातील अनेक छोट्या गावांतील प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. संध्याकाळी आठ ते दहा या वेळेमध्ये एसटी बससेवा सुरू झाल्यास व्यापारी वर्गालाही चालना मिळेल.

**- सुरज खडाखडे, सामाजिक कार्यकर्ते**

## अन्नछत्र मंडळाचे महाप्रसाद सेवेसह मोठे कार्य

### मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**अक्कलकोट, दि. १७ एप्रिल-**

राज्यातील एक अग्रगण्य संस्था असलेल्या स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात महाप्रसाद सेवेसह सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातील कार्य महत्वाचे असल्याचे मनोगत राज्याचे मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केले. त्यांच्या सम वेत आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजीभाऊ पवार हे उपस्थित होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली



व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून हे कार्य राज्यातील एक आदर्श असल्याचे ते म्हणाले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत अमोलराजे भोसले यांच्या हस्ते मंत्री राणे व आमदार पडळकर यांचा श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, पुष्पहार श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. आमदार पडळकर यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने गेल्या ३८ वर्षात दिव्यांग व निराधारांना समर्थ महाप्रसादसेवा तसेच शहर व तालुक्यातील कुस्तीगीरांसाठी प्रसादरुपी खुराक दिल्याबद्दल कौतुक केले. यावेळी गोरक्षक सुधीर बहिरगोंडे, ओम साई प्रतिष्ठानचे शिवराज गायकवाड, मिलन कल्याणशेट्टी, अभिषेक लोकापुरे, कांतु धानशेट्टी, सुनिल कटके, प्रथमेश पवार, राजेंद्र बंदीछोडे, बाबुराव जानकर, अम ोल कारंडे, माऊली हळणकर, उम ेश पांढरे, महेश कोकरे, सिद्धेश्वर जाधव, नागेश कलशेट्टी, सिद्धेश्वर माळी, प्रथमेश जोजन, योगेश कटारे, राहुल जोजन, न्यासाचे सचिव शामराव मोरे काका, सौरभ मोरे, मनोज निकम, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, उपस्थित होते.

## राष्ट्रवादीच्या एकीकरणाचे काहीही मागितले नाही

### प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे : पंढरपूरात सहकुटूंब घेतले विठ्ठल दर्शन

**तभा वृत्तसेवा,**

**पंढरपूर ,दि.१७ एप्रिल -**

राष्ट्रवादीच्याएकीकरणासंदर्भात अजित पवार व शरद पवार यांची राष्ट्रवादी पुन्हा एकत्र यावी यासाठी मी विठुरायाला कोणतेही मागणे घातलेले नाही आणि ते घालण्याचे कोणतेही कारण नाही असे मोठे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज पंढरपूर येथे केले.

श्री. तटकरे गुरुवारी सहकुटुंब विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी पंढरपुरात आले होते. दर्शनानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. आमचे नेते अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली मी, छगन भुजबळ,



प्रफुल्ल पटेल आदींनी मिळून एनडीए सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय आहे. उद्याच्या राजकीय भविष्यासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे. त्यात आम्हाला यश मिळत राहो. या विचारांशी जे असतील त्यांच्या सोबत आम्ही आहोत असेही त्यांनी सांगितले. श्री. तटकरे यांच्या विधानामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील अशी शक्यता कमी असल्याची चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान तटकरे यांच्या बरोबर दीपक साळुंखे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा रत्नमाला गायकवाड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्री. तटकरे यांचा सत्कार केला.

## श्री.वटवृक्ष स्वामी देवस्थान राणे कुटुंबीयांचे श्रद्धास्थान

### मंत्री नितेश राणे : अक्कलकोट मंदिरात घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा**

**अक्कलकोट दि.१७ एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे श्री स्वामी समर्थांचे म ूळस्थान आम्हा राणे कुटुंबीयांचे मुख्य श्रद्धास्थान असल्याचे मनोगत महाराष्ट्र राज्याचे मत्स्य उद्योग व बंदरे विकास मंत्री व सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केले. ते आज येथील श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेल्या श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी ना.नितेश राणे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी ना.राणे बोलत होते. पुढे बोलताना ना.राणे यांनी

श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन मला आनंद तर झालेला आहेच, परंतू



वयोवृद्ध, ज्येष्ठ, दिव्यांग भाविकांसाठी मंदिरात असलेली स्वतंत्र दर्शन व्यवस्था पाहून मन प्रसन्न झाले असल्याचे सांगून मंदिर समितीचे हे कार्य अत्यंत पुण्याईचे असल्याचे मनोगत व्यक्त करून श्री.स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमीत मंदिर समितीच्या वतीने घेण्यात येत असलेल्या धार्मिक कार्यक्रमांबद्दल जाणून घेवून मंदिर समितीचे उपक्रम गौरवास्पद असल्याचे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजीभाऊ पवार, पो.नि. राजेंद्र टाकणे, गोरक्षक सुधीर बहिरगोंडे, मंदिर समीतीचे सचिव आत्म ाराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथम ेश इंगळे, ओम साई प्रतिष्ठानचे शिवराज गायकवाड, मिलन कल्याणशेट्टी, अभिषेक लोकापुरे, कांतु धनशेट्टी, सुनिल कटके, प्रथमेश पवार, राजेंद्र बंदीछोडे, बाबुराव जानकर, अमोल कारंडे, माऊली हळणकर, उमेश पांढरे, महेश कोकरे, सिद्धेश्वर जाधव, नागेश कलशेट्टी, सिद्धेश्वर माळी, प्रथमेश जोजन, योगेश कटारे, राहुल जोजन, श्रीशैल गवंडी आदी उपस्थित होते.

## पोलीस उपनिरिक्षक अजीम शेख यांचा उत्तम सेवेबद्दल सत्कार

**श्रीपूर, दि. १७ एप्रिल-**

कोंढारपट्टा- नेवरे (ता. माळशिरस) येथील रहिवाशी व सध्या मुंबई येथे पोलीस उपनिरीक्षक असलेले अजीम शेख यांनी ३२ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस कर्नाटकातील मंगलोर येथून शिताफीने अटक केल्याबद्दल मुंबईचे पोलीस सहआयुक्त सत्यनारायण यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांना गौरवण्यात आले.

पोलीस उपनिरीक्षक शेख हे सध्या म ुंबईमध्ये डॉ.डी.बी. मार्ग पोलीस ठाण्यात सेवा बजावत आहेत. त्यांच्या कार्यक्षेत्रातील संजीवा मुतू शेट्टी हा आरोपी ३२ वर्षांपासून फरार होता. त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी विशेष पथक नियुक्त केले होते. त्याचे नेतृत्व पोलीस उपनिरीक्षक शेख यांच्याकडे होते. पोलीस उपायुक्त डॉ. मोहितकुमार गर्ग, सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर वाघ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड, पोलीस निरीक्षक विलास भोसले व जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेख, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश बागल, पोलीस हवालदार विनोद म्हात्रे, पोलीस कॉन्स्टेबल प्रवीण राठोड व सागर दिवटे यांच्या



पथकाने आरोपी शेट्टी याचा सायबर तंत्रज्ञाने व आपल्या गोपनीय बातमीदारांमार्फत सुगावा लावून त्याला मंगलोर येथील उलाल पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सापळा रचून अटक केली. त्यामुळे ३२ वर्षांपासून मुंबई पोलिसांना हवा असलेला आरोपी सापडला आहे. पोलीस उपनिरीक्षक शेख यांच्या नेतृत्वाखालील पोलीस पथकाने ही कामगिरी यशस्वी केल्यामुळे शेख व त्यांच्या सहकाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले आहे.

## मानसिक त्रासाला कंटाळून एकाची आत्महत्या

### अनगरमधील घटना; १३ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**मोहोळ,दि.१७ एप्रिल-**

शेतीच्या वादामुळे होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचा मेसेज टाकून एकाने आत्महत्या केली असल्याने आई, वडील, भाऊ, वहीणीसह १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजण्यापूर्वी घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार अनगर( ता. मोहोळ) येथील सिद्धेश्वर सत्यवान गुंड (वय ३५ ) यांने शेताचे वादावरून होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून हे पाऊल टाकत आहे असे मेसेजद्वारे कळवुन गळफास घेतला. याबाबत घरातील लोकांनी माझ्या जावयास आत्म हत्येस प्रवृत्त केल्यामुळे माझ्या जावयाने स्वतःचे शेतातील जांभळाच्या झाडाला गळफास घेवून आत्म हत्या केली आहे. अशा आशयाची फिर्याद शिवाजी सुर्यभान सालगुडे (रा. कुरणवाडी) यांनी मोहोळ पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. त्यामुळे वडील सत्यवान गुंड, आई इंदु, भाऊ बळीराम उर्फ दादा गुंड, वहीनी बनिता (चौघे रा.अनगर, ता. मोहोळ) बहीण सुरेखा लटके, नंदवा अंकुश लटके (रा. अंजनगाव (खे), ता. माढा), भाऊ बळीराम याचे मसाला संतोष शेंबडे (रा. कोन्हेरी, ता. मोहोळ), भाऊ बळीराम याचे मावस सासु प्रमिला सगरे (रा. अनगर, ता. मोहोळ), मामा हनुमंत पवार (रा.बिटले, ता. मोहोळ), शेजारी ज्ञानदेव सरक (रा.अनगर, ता. मोहोळ), चुलत भाऊ गजानन गुंड व दत्तात्रय मुहुरा. दिवाण (रा. भोसे, ता. पंढरपूर), चुलत बहीण रेणुका डोके (रा. सोलापूर) या तेरा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पीएसआय करणेवाड करित आहेत.

## शेटफळ येथे शॉक लागून एकाचा मृत्यू तर दोघे जखमी

### तीन अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**

**मोहोळ,दि.१७ एप्रिल-**

तुटन पडलेल्या तारेचा शॉक लागून एकाचा मृत्यू तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना शेटफळ येथे घडली असून याबाबत एमएसईबीच्या तीन अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहितीनुसार शेटफळ येथील एमएसईबी डी पी जवळ शेती गट नंबर १३ लगत असलेल्या एमएसईबी डीपीला आग लागले असल्याने ते विझवण्यासाठी मनोज



विलास डंके, आबासाहेब नामदेव खडके, नामदेव चंद्रकांत खडके व सिद्धू खडके तेथे गेले होते. आग विझवून परत येत असताना मनोज डंके हा तुटून पडलेल्या तारेचा शॉक लागून खाली पडला. त्यास नामदेव खडके व अरुण भोसले यांनी पकडल्याने त्यांनाही शॉक लागून ते जखमी झाले. आबा खडके यांनी धावत जाऊन डीपीतील फ्युज काढले आणि म नोज डंके यास उपचारास दाखल केले असता उपचारा पूर्वी मयत झाला. ही घटना १५ एप्रील रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत मोहोळ पोलिस ठाण्यात अरुण अर्जुन भोसले यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार मनोज डंके याच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या एमएसईबीचे अधिकारी कलशेट्टी नेमणूक तालुका अधिकारी मोहोळ, पुरुषोत्तम ढेरे नेमणूक सहाय्यक अभियंता सब शाखा शेटफळ कार्यालय, राठोड उपविभागीय कार्यालय अभियंता सोलापूर यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पीएसआय चव्हाण हे करित आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत



## 'उत्तर' मधील ग्रामपंचायत सरपंच पदाची २२ एप्रिलला आरक्षण सोडत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ एप्रिल-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील सन २०२५ ते सन २०३० या कालावधीमध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी दुपारी १२.०० वाजता बहुउद्देशिय सभागृह जुने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सन २०२५ ते सन २०३० या कालावधीमध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी महाराष्ट्र ग्राम पंचायत (सरपंच/उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मध्ये सरपंच पदाच्या आरक्षणबाबत तरतुदी निश्चित केल्या आहेत. सदर नियमान्वये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग, खुला व महिला (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरीकांचा मागास प्रवर्गाच्या स्त्रीयांसह ) सरपंच पदे निश्चित करावयाची आहेत. तालुक्यातील पदाधिकारी व नागरिकांनी ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडत कार्यक्रमास निश्चित केलेल्या दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन तहसिलदार, उत्तर सोलापूर यांनी केले आहे.







# रेशन दुकानदारांची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी घेतली झडती



### सुनावणीत १६५ दुकानदारांचे म्हणणे घेतले जाणून

### २४ एप्रिलपर्यंत ई-केवायसी वाढविण्याची दिली डेडलाईन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांची ई-केवायसी करायच्या कामात हयगय केलेल्या ११ तालुक्यातील तब्बल १६५ राशन दुकानदारांना बोलावून ई-केवायसीबाबत जाब विचारत जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी आज (दि. १८) या धान्य दुकानदारांची चांगलीच झडती घेतल्याची माहिती अधिकृत सुत्राकडून देण्यात आली.

याबाबतचे अधिक वृत्त असे की, शासन जीआरप्रमाणे गेल्या ३ ते ४ महिन्यापासून शहर आणि जिल्ह्यातील राशन दुकानांतून शिधापत्रिकाधारकांसाठी ई-केवायसी करण्याची मोहीम चालू आहे. ही मोहीम पूर्ण करण्यासाठी ३० एप्रिल अंतिम मुदत आहे. इतका मोठा कालावधी मिळूनही जिल्ह्यातील तब्बल १६५ राशन दुकानदारांनी त्यांच्या दुकानातून ३० ते ५० टक्केपर्यंतच ई-केवायसी पूर्ण केली आहे. यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी अशा दुकानदारांना नोटिसा पाठवून आज गुरूवारी सुनावणीसाठी बोलावले होते. यावेळी सरडे यांनी प्रत्येक दुकानदारांचे म्हणणे ऐकून घेवून त्यांना येत्या २४ तारखेपर्यंत राहिलेली ई-केवायसी पूर्ण करण्याची मुदत दिली आहे. यावेळी काही दुकानदारांनी आपल्या भावना पुरवठा अधिकाऱ्यांकडे मांडल्या. आम्ही फोन करून कार्डधारकांना बोलावतो मात्र ते येत नाहीत, काही ग्राहकांचे अंगठे पॉस मशीन घेत नाही, घरी जावून आलो तरी त्यांची भेट होत नाही...अशाही तक्रारी मांडल्या.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी या सप्ताहात पुन्हा एकदा ई-केवायसीसाठी प्रयत्न करा आणि ज्या ग्राहकांचे जसे अनुभव आले तसेच रेकॉर्डवर घ्या आणि हे रेकॉर्ड २४ एप्रिलला माझ्याकडे घेवून या असा आदेश दिला आहे.

कारण आपल्या जिल्ह्यात आजतागायत ७५ टक्केच ई-केवायसी झाली आहे. यामुळे या दुकानदारांना पुन्हा २४ एप्रिलला पुढील सुनावणीसाठी सोलापूरची वारी करावी लागणार आहे. दरम्यान, ई-केवायसीमध्ये हयगय करणाऱ्या दुकानदारांना आज नोटिसा देवून बोलावून घेताच काही माजी आमदार, आमदार आणि इतर काही नेत्यांचे फोनही जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना आले आणि दुकानदारांवर कारवाई करू नका, अशा सुचनाही आल्या.

#### नोटीस देवूनही न आलेल्यांना २४ तारखेची दुसरी नोटीस

आजच्या सुनावणीसाठी नोटीस देवूनही जे दुकानदार उपस्थित राहिले नाहीत त्यांना पुन्हा दुसरी नोटीस पाठविली आहे. यावेळी त्यांना आजच्या झालेल्या बैठकीची माहिती दिली असून, त्यांना या आठवड्यात ई-केवायसीमध्ये सुधारणा करून दप्तर घेवून येण्यास सांगितले आहे. जर पुढील तारखेला पुन्हा ई-केवायसीबाबत दिलेल्या सुचनानुसार काम न केल्यास संबंधित दुकानदारांवरही कारवाई करण्याचा इशारा सरडे यांनी दिला आहे.

#### कॉल सेंटरवर येणाऱ्या तक्रारींचीही घेणार दखल

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात एआय कॉल सेंटर सुरू केले आहे. या कॉल सेंटरवरून रोज २ हजारांहून अधिक लोकाना रोजच कॉल जात असून, याद्वारे रेशन दुकानात मिळणाऱ्या स्वस्त धान्याबाबत माहिती संकलीत केली जात आहे. नागरिकांच्या तक्रारी, सुचना, लाडकी बहीण योजना आदींची माहिती घेतली जात आहे. दरम्यान, या कॉल सेंटरवर नोंदल्या गेलेल्या राशन दुकानदारांच्या तक्रारींचा पाठपुरावा करून दुकानदार दोषी आढळल्यास कारवाई करणार असल्याच्या सुचनाही जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिल्या आहेत. दरम्यान, या 'एआय' योजनेमुळे धान्य वितरणात अधिक पारदर्शकता येणार आहे.

## विकास बँक बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या चेअरमनपदी सीए राज मिणियार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

विकास सहकारी बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटला रिझर्व बँक ऑफ इंडियाची मान्यता मिळाली असून त्याच्या चेअरमनपदी सीए राज मिणियार यांची निवड करण्यात आली.

सीए सुनील माहेश्वरी, सीए सुभाष महेश, प्रा. प्रवीण बजाज, बँकेचे चेअरमन कमलकिशोर राठी व संचालक मनीष बलदवा असे इतर या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य असतील. या निवडीबद्दल संचालक मंडळात सर्व सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. मार्च २०२५ अखेरपर्यंत बँकेच्या



एकूण ठेवी ३५१ कोटी आहेत. कर्ज व्यवहार २०८ कोटी असून बँकेस ढोबळ नफा एकूण रुपये ५ कोटी ८२ लाख झालेला आहे. सतत ४ वर्षापासून बँकेचे नेट एनपीए प्रमाण ०% आहे. या प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष राजगोपाल चंडक ,संचालक मंडळाचे इतर सभासद व मॅनेजर पांडुरंग मंत्री उपस्थित होते.


## पायऱ्या उतरताना पडून एकजण जखमी

**सोलापूर :** घरातील पायऱ्या उतरताना तोल जाऊन पडल्याने एकजण जख्मी झाला. हा प्रकार कमला नगरात बुधवारी दुपारी चारच्या सुमारास घडला. जगदीश बाबू बागडी (वय ३४) असे जखमीचे नाव आहे. बुधवारी दुपारी चारच्या सुमारास जगदीश हा घरातील पाय-या उतरत होता. त्यावेळी तोल जाऊन खाली पडल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली. त्याला उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)


सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भाऊसाहेब गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त इंद्रजीत देशमुख यांचे २४ एप्रिलला व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
वालचंद शिक्षण समूहाच्या वतीने स्वर्गीय भाऊसाहेब गांधी यांच्या २३व्या स्मृतिदिनानिमित्त इंद्रजीत देशमुख (संस्थापक - शिवम प्रतिष्ठान, घारेवाडी, ता. कराड, जि. सातारा) यांचे 'सेवा-भाव समर्पण' या विषयावर व्याख्यान २४ एप्रिल रोजी सकाळी ९.५० वाजता वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या सिव्हील-मेकेनिकल विभागाच्या सभागृहात होणार आहे.

वालचंद शिक्षण समूहातील कार्याचा आढावा सुसंस्कृत, सौम्य व प्रेरणादायी शैलीत इंद्रजीत देशमुख आपल्या व्याख्यानातून घेणार आहेत. त्यांनी शिवम प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक आणि गोवा या भागात सकारात्मक सामाजिक परिवर्तन घडवले आहे. प्रशासकीय सेवेत त्यांनी गटविकास अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपायुक्त अशा जबाबदारीच्या पदांवर कार्यरत राहून पारदर्शक प्रशासन, सेवा-निष्ठा आणि लोककल्याणकारी उपाय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून, सर्वांनी वेळेपूर्वी सकाळी ९.३५ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

**महत्वाचे...**

### २१ एप्रिलला प्रधानमंत्री राष्ट्रीय प्रशिक्षण मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे दि. २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता आय.टी.आय. उत्तीर्ण, १२ वी उत्तीर्ण, डिप्लोमा व पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय प्रशिक्षण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व आस्थापना व पात्र प्रशिक्षणार्थी यांनी मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा महात्मा बसवेश्वर शाासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार एस.आर.भालचिम यांनी केले आहे.

### चक्कर येऊन पडल्याने बाळेत एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
राहत्या घरी असताना अचानक चक्कर येऊन पडल्याने एकाचा मृत्यू झाला. हा प्रकार उत्तर सोलापूर तालुक्यातील बाळे येथील लक्ष्मीनगरात गुरुवारी सकाळी १०.३० वाजता घडली.सदानंद प्रभाकर मानेगावकर (वय ३९) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. गुरुवारी सकाळी सदानंद हा त्यांच्या बाळे येथील राहते घरात होता.



साधारण १०.३० च्या सुमारास त्याला अचानक चक्कर आल्याने पडल्याने तो बेशुध्द पडला. त्यास त्याच अवस्थेत भाऊ आनंद मानेगावकर याने ११.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सोलार लावताना करंट लागून एकजण जखमी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
येथील जिल्हा परिषदेच्या कार्यालयाच्या टेरेसवर सोलार लावत असताना करंट लागून एकजण जखमी झाला. हा प्रकार गुरुवारी दुपारी १२.३० वाजता घडला. आकाश अशोक मस्के (वय ३५, रा. दमाणी नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. गुरुवारी दुपारी १२.३० वाजता आकाश हा जिल्हा परिषदेच्या कार्यालयाच्या टेरेसवर सोलार सिस्टीम लावत होता. त्यास त्या ठिकाणी अचानक डाव्या हाताला करंट लागल्याने हातास जखम झाली आहे. मित्र सोहेल शेख याने उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### टँकरच्या पाईपला दुचाकीचा हॅन्डल लागल्याने दोघे जखमी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
पाण्याच्या टँकरच्या पाईपाला दुचाकीचा हॅन्डल लागल्याने खाली पडून दोघे जखमी झाले. हा प्रकार गुरुवारी सकाळी ९.३० वाजता घडला. तय्यब महिबूब मुल्ला (वय १८) व अरमान महेबूब शेख (वय १६, दोघे रा. विडी घरकुल, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. गुरुवारी सकाळी जखमी हे दुचाकीवरून राहत्या घरापासून शारदा नगरकडे जात होते. नेताजी शाळेजवळ बाजूने जाणा-या पाण्याच्या टँकरच्या लोखंडी पाईपला दुचाकीचा हॅन्डल लागला. यात दोघे खाली पडून तय्यब हा टॅक्टरच्या चाकाखाली आल्याने त्याच्या डोक्याला मार लागला.तर अरमानच्या पायाला मुकामार लागल्याने स्वत: दोघे उपचारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### बेशुध्दावस्थेत आढळलेल्या तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
जुना पूना नाका येथील फूटपाथवर बेशुध्दावस्थेत आढलेल्या तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. नागेश विनायक मारेकर (वय २८, रा. माडत ता. उमरगा) असे तरुणाचे नाव आहे. गुरुवारी मध्यरात्री १२.२० वाजता नागेश हा जुना पुना नाका येथील बायपास रोडच्या फूटपाथवर बेशध्दावस्थेत आढळून आला. त्याला पोलीस नाईक भद्रशेट्टी यांनी रात्री १२.४० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले असता उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# कुगाव ते शिरसोडी जोडपुलाचे काम युद्धपातळीवर

### आता जलसमाधीला मिळणार पूर्णविराम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१७ एप्रिल-**
उजनी धरणातील कुगाव ते शिरसोडी जोडपुलाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे करमाळा व इंदापूर हे दोन तालुके एकमेकांशी जवळच्या मार्गाने जोडले जातील. हा पूल नसल्याने अनेकांना येथे जलसमाधी मिळाली होती मात्र आता जलसमाधीला पूर्णविराम मिळणार असल्याने तसेच अनेक दिवसांपासूनची मागणी पूर्णत्वास येत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

सदर जोडपुलामुळे येत्या काळात मराठवाडा पश्चिम महाराष्ट्राशी उजनी बॅकवॉटर परिसरातून सर्वात जवळच्या मार्गाने जोडणार असून ते अंतर १०० किलोमीटर कमी होणार आहे. इंदापूर शहराची उलाढाल वाढण्यासह येथील तरकारी मालाला पुणे-मुंबई बाजारपेठ तात्काळ उपलब्ध होणार आहे. उसासाठी पुणे जिल्ह्यातील पर्यायी कारखाने उपलब्ध होणार आहेत. सध्या देशात सर्वाधिक केळीची



निर्यात उजनी बॅकवॉटर परिसरातून होत असल्याने केळी निर्यातीस जेएनपीटी मुंबई बंदरावर जाण्यासाठी सर्वात जवळचा मार्ग उपलब्ध होणार आहे.

रोजगार निर्मितीच्या संधीसह बॅकवॉटर टुरिझम ट्रॅन्गल परिसरात पर्यटनाचा विकास होणार आहे. या पुलामुळे परिसरातील मुलांना इंदापूर, भिगवण, बारामती येथील दर्जेदार शिक्षणाची सोय उपलब्ध होईल. या पुलामुळे परिसरातील रूग्णांना इंदापूर, बारामती, पुणे येथील आरोग्याच्या सोयी सुविधा वेळेत मिळण्यास मदत होईल. चित्रपट चित्रीकरणास मदत होणार आहे. बोटींग व्यवसायाला चालना मिळेल. मासेमारी करणाऱ्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

वाहतुकीच्या सुविधेमुळे उद्योग वाढण्यास मदत होणार आहे. फोटोग्राफी व्यवसायाला पर्यटकांमुळे अधिकची संधी उपलब्ध होणार आहे. स्थानिक बेरोजगारांना गावातच रोजगार निर्माण होणार आहेत.

### या परिसरातील अर्थकारणाला चालना

कुगाव (ता. करमाळा) हे ठिकाण भीमा नदीच्या काठी असून कुगावला नदीपात्राने तिन्ही बाजूला वेढले आहे. कुगावच्या नदी पात्रासमोर सात गावांचे क्षेत्र असून यात सोगाव, वाशिंबे, गंगावळण, कळाशी, कालठण, शिरसोडी, पडस्थळ या गावांचा समावेश होतो. सध्या कुगावला जाण्यासाठी चार जलमार्ग व एक भुमार्ग मंजूर आहे. भुमार्गाने जाण्यासाठी १२० किलोमीटरचा नाहक वळसा मारावा लागतो तर जलमार्गाने जाण्यासाठी शासनाने चार मार्ग मंजूर केले आहेत. पण शासकीय बोटी किंवा जलथांबे अशा कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा शासनाने उपलब्ध करून दिल्या नाहीत. त्यामुळे परिसरातील स्थानिक नागरिकांना जीव मुठीत घेऊनच खाजगी नौकांची मदत घ्यावी लागते. त्यापैकी सर्वात जवळचा मार्ग कुगाव ते शिरसोडी जोडपूल मंजूर करून काम युद्धपातळीवर सुरू केल्याने या परिसरातील अर्थकारणाला चालना मिळणार आहे.

**- तेजस्विनी कोकरे,**
माजी सरपंच, कुगाव (ता. करमाळा)

## इतिहास अभ्यासक डॉ. सुरज पंडित यांचे उद्या व्याख्यान

### कै. आनंद कुंभार स्मृती व्याख्यान: जागतिक वारसा दिनानिमित्त इंट्याकचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
सोलापूरचे थोर इतिहास अभ्यासक संशोधक कैलासवासी आनंद कुंभार यांचे शिलालेख वाचन-संशोधन, एकूणच इतिहास संशोधनातील कार्य मोलाचे आहे. सोलापूरकरवासियांना भूषणावह असलेले असे हे व्यक्तिमत्व, त्यांच्या कार्यास स्मरण करण्याच्या दृष्टीने व स्मृतिप्रित्यर्थ प्रतिवर्षी जागतिक वारसा दिनाच्या निमित्त इंट्याक सोलापूरने व्याख्यान सत्राचे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे.

यंदाच्या प्रथम वर्षी श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या संयुक्त विध्यमाने, मुंबईच्या साठे कॉलेजचे उपप्राचार्य तथा बुद्धीज स्टडीजचे विभाग प्रमुख, थोर इतिहास अभ्यासक डॉ. सुरज पंडित यांचे नागरी वारसा व पुरातत्त्व या विषयावरचे व्याख्यान शनिवारी, दिनांक १९ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता श्री हिराचंद नेमचंद





वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात आहे. यावेळी इंट्याकचेचे पदाधिकारी समन्वयक प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर, सहसमन्वयक आर्किटेक श्वेता कोठावळे, हि.ने. वाचनालय अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, कार्यवाह डॉ.नभा काकडे, कुंभार कुटुंबीय आदींची उपस्थिती असणार आहे. डॉ. सुरज पंडित, मुंबई यांचे कान्हेरी लेणी या विषयातील त्यांचे इतिहास संशोधन कार्य सुप्रसिद्ध आहे. अनेक पुस्तकांचे व शोधनिबंधांची लेखक तथा महाराष्ट्र शासन, केंद्र सरकारच्या विविध पुरातत्त्व संशोधनासाठी ते कार्यरत आहेत. त्याचबरोबर युनेस्को च्या सोबतही त्यांचे कार्य चालू आहे. आजच्या काळात अत्यंत आवश्यक अशी समजून घेण्याची बाब म्हणून नागरी वारसा व त्या अनुषंगाने त्याचे पुरातत्त्व या अंगाने असणाऱ्या संबंध, महत्त्व याचे विवेचन ते सचित्र सादर करणार आहेत.

## दहावी, बारावी खेळाडू विद्यार्थी ग्रेस गुण प्रस्ताव; जिल्हा क्रीडा कार्यालयात विनामूल्य स्वीकारण्याची मागणी

### प्रत्येकांना १५० रुपयांचा भूर्दंड, पुणे बोर्डाच्या चुकीमुळे छाननी शुल्क दोनदा भरावे लागले



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
दहावी व बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण भरताना 'आपले सरकार' या ऑनलाईन प्रणालीमध्ये क्रीडा शिक्षकांना अनंत अडचणी निर्माण झाल्या आहेत. गेल्या वर्षी जिल्हा क्रीडा कार्यालय ऑफलाइन अर्ज स्वीकारीत होते तेही विनामूल्य. तरी हे प्रस्ताव विनामूल्य व ऑफलाईनने स्वीकारावे, अशी मागणी सोलापूर शहर शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाचे सचिव सुहास छंचुरे यांनी केली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या परिपत्रकानुसार सन २०२४-२५ या वर्षापासून दहावी व बारावींच्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ग्रेस गुणाचे अर्ज शासनाच्या 'आपले सरकार' या ऑनलाईन प्रणालीद्वारे स्वीकारले जात आहेत. परंतु गुण भरताना क्रीडा शिक्षकांना अनंत अडचणी येत आहेत. यामध्ये क्रीडा शिक्षक व खेळाडू यांची तारांबळ उडाली. शहर जिल्ह्यातील अंदाजे ३५०० विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत. या पोर्टलवर रुपये २३.५० ऑनलाईन शुल्क भरण्यास सांगितले. परंतु हे भरण्यासाठी ई महासेवामध्ये १०० रुपये आकारले जात आहेत.

नंतर परत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभागीय मंडळाने छाननी शुल्क २५ रुपये ऑनलाईनने भरण्यास सांगितले आहे. याबाबत योग्य सूचना नसल्यामुळे आणि कोणतीही कार्यशाळा झाली नसल्यामुळे काही शाळांनी ही रक्कम नेहमीप्रमाणे बोर्डाच्या खात्यात भरली. परंतु हे खाते बारावीच्या विद्यार्थ्यांचे होते. त्यामुळे दहावीच्या विद्यार्थ्यांना परत दहावीच्या खात्यात भरावे लागले. पुणे बोर्डाच्या या चुकीमुळे काही शाळांना ही रक्कम दुसऱ्यांदा भरावी लागली. त्यामुळे यासाठी संबंधित शाळांना १५० रुपये खर्च करावा लागला आहे. यापूर्वी हे गुण भरण्यासाठी १४ एप्रिलपर्यंत मुदत होती. ती आता १७ एप्रिलपर्यंत वाढविण्यात आली होती. अनंत अडचणीवर मात करीत संबंधित सर्व शाळांतील क्रीडा शिक्षकांनी हे अर्ज ऑनलाईनने सादर केले आहेत.

### अर्ज प्राप्त झाल्याची माहिती दिसत नाही

शेवटच्या दिवसापर्यंत सोलापूर जिल्ह्यातून किती विद्यार्थ्यांचे अर्ज आले आहेत याबाबात जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, या ऑनलाईन प्रणालीत फक्त पेंडीग अर्ज किती आहेत एवढीच माहिती दिसत आहे. एकूण अर्ज किती व किती अर्ज रिजेक्ट झाले याची माहिती दिसत नाही. जिल्हा क्रीडा कार्यालयास अर्ज अॅप्रूव्ह करण्याची २१ एप्रिलपर्यंत मुदत आहे.

# बग्गी ते कंटेनर; भीमजयंती मिरवणुकीची दिमाखदार वाटचाल

- देशभरातील सर्वात मोठी मिरवणूक सोलापुरात
- काळानुसार सोलापुरातील मिरवणुकीत झाले अनेक बदल
- जगभरातील बांधव घेऊन जातात काळीज भरून ऊर्जा

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताहाची सांगता भव्य अशा विराट मिरवणूकीने करण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. पूर्वी आकर्षक अशा सजवलेल्या बग्गी (रथ) मधून मिरवणूक निघायची. आता मिरवणुकीचे स्वरूप अमुलाग्रपणे बदलले असून बग्गी ते कंटेनर आणि पारंपारिक वाद्य ते डॉल्बीचा दणदणाट असा बदल झाला आहे. काही वर्षांपासून सजवलेल्या मोठ्या कंटेनरवरुन दिमाखदार अशी भीम जयंती मिरवणूक भव्य स्वरुपात काढली जात आहे. हायटेक अशी मिरवणूक काढली जाते.

अवघ्या जगात सर्वात मोठी मिरवणूक सोलापुरात काढण्यात येते. भीम जयंतीचा जगभरात नावलौकिक आहे. जगभरातून भीम अनुयायी या मिरवणुकीसाठी येतात. काळीज भरून ऊर्जा घेऊन जातात. सोलापूर शहरात डॉ. आंबेडकर जयंती सप्ताहास १४ एप्रिलपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ होतो आणि येणाऱ्या रविवारी या सप्ताहाची भव्य मिरवणुकीने सांगता केली जाते. सोलापुरातील भीम जयंती मिरवणुकीचा स्फूर्तीदायी इतिहास



आहे. काळानुसार भीम जयंती मिरवणुकीच्या स्वरुपात प्रतिवर्षी नवे बदल पडत गेले आहेत. प्रारंभीच्या काळात आकर्षक अशा सजवलेल्या बग्गीतून डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात येत होती. आरंभीच्या काळात शंभरहून अधिक मंडळांकडून मिरवणूक काढण्यात येत होती.

सोलापुरात दिवंगत जीवाप्पा ऐदाळे, हरिभाऊ तोरणे गुरुजी, उद्धव थोडो शिवशरण, एन.टी. बनसोडे यांच्यासह वतनदार मंडळींच्या पुढाकाराने मिरवणूकीची सुरुवात झाली होती. ही मिरवणूक फॉरेस्ट येथील शाळा क्रमांक १० च्या मैदानातून सुरु होत होती आणि विसर्जन बुधवार पेठेतील थोरला राजवाडा (मिलिंदनगर) येथील पंचाची चावडी पुढे होत असे. फॉरेस्ट येथून वाडिया हॉस्पिटल, रेल्वे स्टेशन, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भैया चौक), मेकॅनिक चौक, नवी पेठ, माणिक चौक, मधला मारुती, सराफ बाजार, मंगळवार पेठ पोलीस चौकी, चाटी गल्ली, बाळीवेस मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पुढे थोरला राजवाडा (मिलिंद नगर) पंचाच्या चावडीपुढे या मिरवणुकीचे विसर्जन होत होते. निळे ध्वज हातात घेऊन जय भीम चा नारा देत या मिरवणुकीत मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी होत असत. या मिरवणुकीत बैलगाडीवर मल्लखांबाचे विविध खेळ मलखांबपटू सादर करत होते. तसेच विविध मैदानी खेळांचे सादरीकरणही केले जात होते. वेगवेगळे कलावंत आपल्या अनेकविध खेळाचे कौशल्य दाखवून सर्वांची मने आकर्षीत करीत असत. या मिरवणूकीत सर्वात लक्ष वेधून घेणारे आवसे वस्ती आंबराई येथील समता सैनिक दलाचे बँड पथक असे. खाकी हॉफ पँट, पांढराशर्ट, निळा स्कार्फ, बुट असा यांचा वेष होता. ६ बॅग पाइपर (मशाक) ६ बिगुलधारक, ६ बासरीवादक आणि ड्रम आणि समोर त्यांना हातवारे करुन सूचना देणारे मास्तर, अतिशय सुरेल गाणी, तालबध्द संचालन त्यांच वैशिष्टय होत. स्त्री - पुरूष शिस्तीत निघत होते. मिरवणूकीच्या शेवटी एक रथ असे. डॉ. बाबासाहेबांचे तैलचित्र त्यामध्ये ठेवलेले असे. आणि भीमसैनिक 'भीमराजा प्राण माझा भीमराजा प्राण' हे गीत उत्साहाने म्हणत असत. त्यानंतर मिरवणुकीत लेझीम पथके आली. विविध वस्त्यामधून लेझीम पथके संगीताच्या तालावरती लयबध्द खेळ करू लागली. मिरवणुकीत ट्रकवरती बाबासाहेबांच्या लढ्याचे सचित्र दर्शन, विविध घोष वाक्ये, यांची रेलचेल होती. सर्व समाज या मिरवणुकीचे स्वागत करीत होते. ठिकठिकाणी पाणपोया उघडलेल्या असत. दरम्यान, काळानुसार या मिरवणुकीत बदल झाला. लेझीम पथके आती सजवलेल्या ट्रकवरुन मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर पुढे डॉल्बी साऊंड सिस्टिमचा वापर मिरवणुकीत होऊ लागला. डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकू लागली. सुरुवातीला सर्व समाजबांधवांच्यावतीने बग्गीतून एकच मिरवणूक निघायची. सध्या शंभरहून अधिक मंडळांच्या वतीने मिरवणूक काढण्यात येते. त्यानंतर आता ट्रक ऐवजी भलेमोठे कंटेनरचा वापर मिरवणुकीसाठी केला जात आहे. दरम्यान, डॉल्बीच्या मोठ्या आवाजावर निर्बंध आले. त्यामुळे काही मंडळाकडून पुन्हा पारंपारीक वाद्यांचा उपयोग मिरवणुकीत केला जात होता. सध्या विविध मंडळांकडून आकर्षक देखावे, आकर्षक सजावट मिरवणुकीत केली जाते. तर काही मंडळांकडून प्रबोधनात्मक फलक व देखावे सादर केले जातात. बाणेकरी तालीम संघाने मैदानी खेळाचे परंपरा राखली होती. आता मैदानी खेळाची परंपरा मिरवणुकीत लोप पावली आहे.

### कंटेनरमुळे पारंपरिक मिरवणूक मार्गात बदल

दरम्यान कंटेनरचा वापर होत असल्याने पारंपारिक मिरवणूक मार्ग टाळून काही मंडळे मोठ्या रस्त्यावरुन मिरवणूक काढत आहेत. कंटेनरमुळे पारंपरिक मिरवणूक मार्गात काही प्रमाणात बदल झाला आहे. मात्र मिलिंद नगर येथे मिरवणुकीचा समारोप करण्याची परंपरा आजही कायम आहे. पारंपारिक वाद्य ते सध्या कानठळ्या बसविणारा डॉल्बीचा आवाज असा बदल काळानुरूप झाला असल्याचे दिसून येते. मोठ्या आवाजावर नियंत्रण ठेवण्याची गरज वर्तवली जात आहे.

### १९६४ सालानंतर पार्क चौकातून मिरवणुकीस प्रारंभ

पूर्वी ही मिरवणूक फॉरेस्ट येथील शाळा क्रमांक १० च्या मैदानातून सुरु होत होती. १९६४ सालानंतर पार्क चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात आला. तेव्हापासून भीमजयंती मिरवणुकीचा प्रारंभ येथील पुतळ्यापासूनच होऊ लागला. सध्या या चौकाचे नामकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे करण्यात आले आहे. ही परंपरा आजतागायत कायम आहे. शहर- जिल्हा तसेच देशभरातून मोठ्या संख्येने अबालवृद्ध या मिरवणुकीत सहभागी होतात. काळीज भरून ऊर्जा घेऊन जातात.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०९०

**तैसें व्यासोक्ती अळंकरिलें । आवडे तें बरवेपण पातले ।**
**तें जाणोनी काय आश्रयिलें । इतिहासीं ।।**

हा ग्रंथ किती महान आहे याचे स्पष्टीकरण केल्यानंतर ज्ञानेश्वर माऊलींनी या ग्रंथाची महती सांगतांना, म्हणऊनि महाभारती जें नाहीं । तें नोहेचि लोकीं तिहीं । येणे कारणे म्हणीपें पाही । व्यासोच्छिष्ट जगत्रय ।। असे म्हटले आहे. या ग्रंथाची थोरवी सांगतांना जे काही अपुरे पडले असेल त्याची भरपाई या ओवीत झाली आहे. या ओवी नंतर या ग्रंथात काय आहे हे सांगण्यासाठी आता दुसरे शब्द उपयोगात आणण्याची गरज राहीली नाही असे वाटते. माऊली या महाभारतात काय आहे त्यापेक्षा या ग्रंथात काय नाही ? अशा प्रश्नरुपी ओवीने ग्रंथाची महती सांगत आहेत. ते म्हणतात सुर्याच्या तेजामुळे त्रिभुवन जसे प्रकाशमान होते अगदी त्याप्रमाणे महर्षि व्यासांच्या विशाल बुध्दीने व्यापलेले हे ज्ञानाचे विश्व या कथेच्या रुपाने लखलखीत झाले आहे. या ग्रंथातून ज्याला ज्ञानरुपी प्रकाश प्राप्त झाला त्याला त्याच्या



जीवनात कुठेच अंध:कार दिसण्याचा प्रश्न उरत नाही. अर्थात, प्रत्येक अडी-अडचणीचे, प्रश्नाचे उत्तर वाचका जवळ असणार आहे. सुपीक शेतात बिज टाकले म्हणजे ते आपल्या परीने चांगल्या प्रकारे वाढत जाते अगदी त्याप्रमाणे या महाभारतरुपी सुपीक शेतात मानवी जीवनातील प्रत्येक विषय उत्कृष्टपणे वाढत गेलेला आहे. ज्याला जे पाहिजे ते प्राप्त होण्यासारखे या ग्रंथात आहे. वसंतऋतुचे आगमन झाल्यानंतर उदयानातील छोटया-मोठया सर्व वृक्ष, वेलीवर जसा पानाफुलांचा बहर येऊन चोहीकडे सुंगध दरवळतो व वातावरण प्रसन्न होते. अगदी याप्रकारे हा कथारुपी वसंतऋतु आपल्या जीवनात आपण आणला तर आपल्या जीवनातही आपल्या कर्तृत्वाचा सुगंध दरवळेल. आम्ही हे वाक्य अनुभवातून मांडत आहोत. महर्षी व्यासांच्या वचनांचा, वाक्यांचा उपयोग करुन काही लिहायचे, करायचे ठरवले म्हणजेच व्यासांच्या विचाराचा आश्रय घेतला तर पाहिजे ते प्राप्त होते. हे ओळखूनच जगातील सर्व इतिहासांनी महाभारताचा आश्रय घेतल्याचे दिसुन येते. या अनुषंगाने माऊलींनी उपरोक्त ओवी घेतली आहे. आपणालाही उचित सन्मान प्राप्त व्हावा म्हणून स्वत:च्या ठिकाणी नम्रपणा स्विकारुन सर्व पुराणांनी आख्यानाचे रुप घेऊन महाभारताच्या ठिकाणी प्रवेश केला आहे. याचाच अर्थ असा आहे की जे महाभारतात नाही ते त्रिभुवनात आढळणार नाही. त्यामुळे व्यासोच्छिष्ट जगत्रय असे म्हटले जाते. त्रिभुवनापेक्षा आपण आपल्या जीवनापुरता विचार केला तरी असे सांगता येईल की मानवी जीवनाला जे आवश्यक आहे ते सर्व महाभारतात भरुन उरले आहे. म्हणून सुखी जीवनासाठी महाभारताच्या आश्रयाला येण्यास हरकत नसावी. आमचे हे लिखाण महाभारताचाच एक भाग आहे. माऊलींच्याओव्या ह्या महाभारताचाच भाग असल्यानें आपण इतर संत वचनांबरोबर या लिखाणाचा श्रध्दापुर्वक लाभ घ्यावा अशी आपणास नम्र प्रार्थना आहे. माऊलींच्या ओव्यांचा आणि संत वचनांचा सहवास आपणास ज्ञानामृत आनंदलहरींची अनुभूती देईल यांत आम्हास शंका वाटत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. १७ एप्रिल २०२५
विक्रम संवत् २०८१
शके - १९४७
संवत्सर - क्रोधी नाम
मास - चैत्र
कृ. चतुर्थी (१५.२३)
ऋतु - वसंत
नक्षत्र - ज्येष्ठा (अहोरात्र)
योग - वरियन (२४.४९)
करण - कौलव (२८.१८)

दिनविशेष - चांगला दिवस, मळगंगामाता यात्रा जामगाव ता. पारनेर, जि. नगर

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील. कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# पशुपालक शेतकऱ्यांची 'सौर'पेक्षा गोबरगॅसला पसंती

## जिल्ह्यातील ८८ शेतकऱ्यांना लाभ

## करमाळा तालुक्यात सर्वाधिक 33 लाभार्थी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १७ एप्रिल-**

सध्या सरकारकडून व सोशल मिडीयावर सर्वत्र सौर ऊर्जाच्या वापराबाबत जनजागृती मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. त्यामुळे गोबर गॅस योजना गुंडाळावी लागणार अशी चर्चा होती. परंतु पशुपालक शेतकरी मात्र सौरऊर्जा योजनेपेक्ष गोबर गॅसला पसंती देत असल्याचे दिसून येते. कृषी विभागाने गोबर गॅस योजनेच्या उद्दीष्ट पूर्ण करण्याचा टप्पा गाठला आहे. जिल्ह्यातील ८८ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

केंद्र शासन पुरस्कृत नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रम योजना राबविण्यात येते. ही योजना राबविण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना अनुदानही दिले जाते. ही योजना सर्वसाधारण तसेच अनुसुचित जाती व जमातीसाठी आहे. या योजनेसाठी लाभार्थी हा शेतकरी असावा तसेच त्याच्याकडे जनावरे असणे बंधनकारक आहे. यासाठी सन २०२४-२५ या वर्षासाठी या योजनेला जिल्हा परिषदेच्या सेसमधून ९ लाखांची तरतूद करण्यात आली होती. त्यासाठी शासन स्तरावरुन सर्वसाधारण शेतकऱ्यांसाठी १४ हजार ३५० रुपये तर जिल्हा परिषद सेसमधून ९ हजार रुपये असे २३ हजार ३५० रुपये अनुदान दिले जाते. तर अनुसुचित जाती व जमातीच्या शेतकऱ्यांना शासन स्तरावरुन २२ हजार रुपये तर जिल्हा परिषदेच्या सेसमधून ९ हजार असे ३२ हजार रुपये अनुदान दिले दिले जाते. हे अनुदान शासन स्तरावरुन थेट लाभर्थ्यांच्या बँक खात्यावर वितरीत केले जाते. तर जिल्हा परिषदेचे सेस अनुदान हे तालुका स्तरावरुन लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर वितरीत करण्यात येते. सन २०२४-२५ या वर्षात सर्वसाधारण शेतकऱ्यांसाठी ७३ चे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यापैकी फेब्रुवारी अखेर पर्यत ७२ शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घेतला आहे, तर अनुसुचित जातीसाठी २५ शेतकऱ्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. पैकी १६ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. अनुसुचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी २ उद्दिष्ट असताना एकानेही योजनेचा लाभ घेतला नाही.

**तालुकानिहाय लाभ घेतलेले सर्वसाधारण व अनुसुचित जाती लाभार्थी**

| तालुका | सर्वसाधारण | अनुसुचित जाती |
|---|---|---|
| अक्कलकोट | ४ | १ |
| बार्शी | ५ | २ |
| करमाळा | ३० | ३ |
| माढा | ५ | २ |
| माळशिरस | ५ | १ |
| मंगळवेढा | ३ | १ |
| मोहोळ | ३ | ० |
| उत्तर सोलापूर | ४ | १ |
| पंढरपूर | ५ | १ |
| सांगोला | ५ | २ |
| दक्षिण सोलापूर | ३ | २ |

### सेसमधून वाढीव अनुदानाची मागणी केली

ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी बायोगॅस ही योजना फायदेशीर ठरत आहे. त्यासाठी शेतऱ्यांकडूनही मोठा प्रतिसाद मिळत आहे. सन २०२४-२५ या वर्षात १०० शेतकऱ्यांचे उद्दिष्ट होते. ते सर्व मार्च अखेर पूर्ण झाले आहे. या योजनेला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने कृषी विभागाने या योजनेसाठी यावर्षीच्या बजेटमध्ये सेसमधून वाढीव अनुदानाची मागणी केली आहे.

**- हरिदास हावळे, कृषी विकास अधिकारी, जि. प. सोलापूर**

### दक्षिणमधील शेतकऱ्यांचा प्रतिसाद

प्रत्येक गावात जाऊन पशुपालक शेतकर्यांना गोबर गॅसचे महत्व पटवून दिले. त्यामुळे गतवर्षी दक्षिण पंचायत समितीला ७ लाभार्थ्यांचे उद्दीष्ट असताना ६ लाभार्थ्यांनी गोबर गॅस योजनेचे काम पूर्ण केले आहे. पशुपालन करणार्या शेतकऱ्यांकडून गोबर गॅस योजनेला चांगला प्रतिसाद आहे.

**- एस.एम. पाटील, कृषी विस्तार अधिकारी, पंचायत समिती दक्षिण सोलापूर.**

### गोबरगॅस योजना लाभदायक

शासनाची गोबर गॅस योजना पशुपालक शेतकर्यांसाठी लाभदायक आहे. शेतकरी जनावरांचे शेण खत म्हणून वापर करतो. मात्र या जनावरांच्या शेणापासून वीजनिर्मिती तयार होऊन घरातील वीज मागणी पूर्ण होते. त्यामुळे वीजबिलापासून सुटका मिळते. शिवाय स्वयंपाकासाठी गॅस उपलब्ध होत असल्याने त्याचाही फायदा मिळतो.

**- कांबळे, लाभार्थी, मंद्रुप**



## मिलिंद नगर कमान, बुद्ध विहारची महापालिका आयुक्तांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

बुधवार पेठेतील मिलिंद नगरातील मराठवाडा नामांतर प्रतिकृती कमान व मिलिंद नगर बुद्ध विहारची आज मनपा आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत निधी देऊन सुद्धा काम प्रलंबित असल्याची खंत आनंद चंदनशिवे यांनी आयुक्त यांच्या पुढे व्यक्त केली. मनपा आयुक्तांनी या कामाबद्दल तातडीने निर्णय घेण्याबाबत संबंधित अधिकाऱ्याना आदेश दिले. यावेळी भंतेजी , अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे , सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, नगर अभियंता सारिका अकुलवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, युवा नेते आतिश बनसोडे ,चाचा सोनवणे, भीमशक्ती सेना मंडळाचे अध्यक्ष गौरव कांबळे, आरोग्य निरीक्षक, जमादार उपस्थित होते.

# रविवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव सांगता मिरवणूक

## मिरवणूक मार्गावर वाहतूक बंद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सांगता (विसर्जन) मिरवणूक रविवारी, २० एप्रिल रोजी निघणार आहे. मिरवणुकीत वाहतुकीची कोंडी होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता मिरवणूक मार्गावर जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांना प्रतिबंध करण्यात आला असल्याची माहिती पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी एप्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.रविवारी, २० एप्रिल रोजी च्या सकाळी दहापासून ते दिनांक २१ एप्रिल रोजीच्या पहाटे दोन वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सांगता (विसर्जन) मिरवणूक मार्गावर सर्व प्रकारच्या वाहतुकीस जाण्यास व येण्यास बंद करण्यात आली आहे.

### बंद करण्यात येणारा मार्ग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान सम्राट चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक.

हॉटेल ॲम्बेसेडर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक. छत्रपती शिवाजी महाराज चौक - मेकॅनिकी चौक सरस्वती चौक - चार हुतात्मा पुतळा चौक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक- डफरीन चौक - जुना एम्प्लायमेंट चौक - वाडीया हॉस्पीटल - जुना चांदणी चौक - महापौर निवास - रेल्वे स्टेशन गांधी पुतळा - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक - मेकॅनिकी चौक. या मार्गावर मिरवणुकीत सामील होणारी वाहने वगळता इतर सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहतुकीस व सदर मार्गावर वाहन पार्कीगसाठी बंदी राहील.

### पर्यायी मार्ग

✻ विजापूर रोड कडून हैद्राबाद, तुळजापुर, पुणे कडे जाणारी वाहतुक पत्रकार भवन चौक - महावीर चौक - गुरुनानक चौक - संत तुकाराम चौक - अशोक चौक - शांती चौक - जुना बोरामणी नाका - मार्केट यार्ड मार्गे इच्छित स्थळी. ✻ मंगळवेढा कडून येणारी होटगी रोड व विजापुर रोड कडे जाणारी वाहतुक मरीआई चौक नागोबा मंदिर - रामवाडी पोलीस चौकी - मोदी बोगदा - पत्रकार भवन मार्गे इच्छित स्थळी. ✻ जुना पुना नाका चौकाकडून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनधारकानी जुना पुना नाका - जुना कारंबा नाका - जुना तुळजापूर नाका - जुना बोरामणी नाका - शांती चौक - रंगभवन - सातरस्ता - मोदी पोलीस चौकी - मोदी बोगदा - रामवाडी दवाखाना रामवाडी पोलीस चौकी - ते रेल्वे स्टेशन किंवा जुना पुना नाका ✻ नवीन केगांव बायपास मार्गे देगांव नाका कडून मरिआई चौकी नागोबा मंदिर ते रेल्वे स्टेशन या मार्गाचा वापर करावा. - विजापूर, मंगळवेढ्याकडून येणारे जड वाहतुक वाहनधारकाने नवीन केगाव बायपास रोडचा वापर करावा. ✻ अक्कलकोट कडून येणाऱ्या जड वाहतुक वाहनधारकाने नवीन अक्कलकोट नाका - शांती चौक - जुना बोरामणी नाका - मार्केट यार्ड या मार्गाचा वापर करावा.

# नागरिकांपर्यंत शासकीय योजना प्रभावीपणे पोहोचवा : जिल्हाधिकारी अशोक काकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि. १७ एप्रिल-**

गरीब, भूमिहीन व बेघर नागरिकांपर्यंत शासकीय योजना प्रभावीपणे पोहोचाव्यात, यासाठी संबंधित विभागांनी तातडीने पाठपुरावा करावा अशा सूचना जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी नंदिवाले समाजातील लाभार्थ्यांना जातीच्या दाखल्यांचे वाटप प्रसंगी दिल्या. राज्य शासनाच्या शंभर दिवस कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने कडेगाव तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील भटक्या व विमुक्त जातीच्या नागरिकाना दाखल्यांचे प्रातिनिधिक वितरण जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वतः झोपडपट्टीत जाऊन दाखले दिल्याने जिल्हाधिकारी यांच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे.


यावेळी प्रांताधिकारी रणजीत भोसले, तहसीलदार अजित शेलार, गट विकास अधिकारी प्रशांत राउत, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अधिकराव जाधव प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी काकडे म्हणाले की, शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत विभागांनी गतीमान काम करुन लोकाभिमुख कार्यपद्धतीचा अनुभव जनतेला दिला आहे, त्यातुन शासनाप्रती जनतेमध्ये चांगला दृष्टीकोन तयार होत आहे. अनेक प्रकल्प, मोठे कामे या शंभर दिवसाच्या कालावधीत करण्यात येत आहेत, अनेक पूर्ण झाली आहेत. शासनस्तरावरील विविध कल्याणकारी योजना गरजूंना उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या कार्यवाहीचे निर्देश त्यांनी दिले.



यावेळी मंडळ अधिकारी मनोहर पाटील, सरपंच संजना माळी, सोसायटी चेअरमन प्रविण पवार, उपसरपंच सुरज पवार, माजी सरपंच हणमंतराव पवार, माजी उपसरपंच संभाजी शेळके, जयंत पाटील, आकाश पाटील, ग्रामपंचायत सदस्य विराज पवार उपस्थित होते. प्रास्ताविक प्रांताधिकारी रणजीत भोसले यांनी तर आभार सेतु व्यवस्थापक प्रविण पवार यांनी मानले.

# येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन

गुडफ्रायडे म्हणजे प्रभू येशुने पापी मानवा करीता दिलेले स्वतःचे बलिदान. जगामध्ये अनेक लोकांनी आपल्या परीवाराकरिता, धर्माकरीता, देशाकरिता स्वतःचे बलिदान दिले. पण प्रभू येशुने जगातील पापी मानवाकरिता स्वतःचे बलिदान दिले. व मानवाला सर्व प्रकारच्या पापातून बंधमुक्त करून तारण व सार्वकालिक जीवन प्राप्त करून दिले. सर्व मानव जातीचा उध्दार करण्यासाठी दु:ख व मरण सोसले. कारण देवाचे पवित्र वचन म्हणते, कारण सर्वांनी



पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत. पण ते उणेपण देवाच्या कृपेने ख्रिस्त येशुने खंडणि भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्याद्वारे ते विनामुल्य नीतिमान ठरतात. (रोम ०३:२३,२४) कारण त्याच्या रक्ताने विश्वासाच्याव्दारे प्रायश्चित होण्यास देवाने त्याला पुढे ठेवले, यासाठी की, पूर्वी झालेल्या पापांची देवाच्या सहनशीलतेने उपेक्षा झाल्यामुळे त्याने आपले नीतिमत्व व्यक्त करावे (रोम ०३:२५) आपण दुर्बल असतानाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला (रोम ०५:०६) कारण पापाचे वेतन मरण आहे पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे. (रोम ०६:२३) आणि त्याच्या वधस्तंभावरील रक्ताच्या व्दारे शांति करून त्याच्याद्वारे जे सर्व काही आहे ते सर्व, ते पृथ्वीवरील असो किंवा स्वर्गातील असो, त्याचा स्वतःबरोबर त्याच्याव्दारे समेट करावा हे पित्याला बरे वाटले. (कलरसै ०१:२०) आणि ज्याने तुम्हांला प्रकाशातील पवित्र जनांच्या वतनाचे विभागी होण्याजोगे केले त्या पित्याची तुम्ही उपकारस्तुती करावी (कलरसै ०१:१२) व स्वतःला सर्व प्रकारच्या पापापासुन, आत्महत्येपासुन अलिप्त करून प्रभु येशुच्या वधस्तंभावरील बलिदानाचा दैवो उद्देश समजून घेऊन परमेश्वराचे उपकार मानावे.

**- सुनिल मोरे (९८८१७२१५७८)**

## डॉ. आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव अध्यक्षपदी व्हनकडे

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सूर्यकांत व्हनकडे यांची निवड करण्यात आली. आरपीआय चे जिल्हा उपाध्यक्ष सतीश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली.



इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : कार्याध्यक्ष सचिन फडतरे, विशाल माने. उपाध्यक्ष चंद्रशेखर गायगवळी, किरण आठवले, सुनिल रणखांबे, विजयकुमार गायकवाड. कोषाध्यक्ष राहुल बनसोडे, संतोष फडतरे. सरचिटणीस श्रीकांत बनसोडे, चिटणीस ज्ञानेश्वर बनसोडे, जितू गावडे, किशोर चौधरी.

# एमएसएमई आणि उद्योगवर्धिनी युवतींना देणार व्यवसायाभिमुख प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

एम.एस.एम.ई (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय) आणि उद्योगवर्धिनी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील युवतींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पूर्णपणे नि:शुल्क असलेल्या या प्रशिक्षणासोबतच व्यवसायवाढीसाठी अत्यंत उपयुक्त असलेले शासकीय प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे, अशी माहिती उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शासनाच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयातर्फे विविध १७६ प्रकारचे प्रशिक्षण अभ्यासक्रमांद्वारे देण्यात येते. यातील फॅन्सी कॉटनबॅग मेकिंग आणि फूड प्रोसेसिंग अँड प्रोडक्शन हे दोन अभ्यासक्रम सोलापुरातील युवतींना शिकवण्यात येणार आहेत. संपूर्ण महिनाभर दररोज तीन तास हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याशिवाय व्यवसाय सुरू करण्यासाठीच्या शासकीय योजना, या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, कार्यालयांची माहितीदेखील या प्रशिक्षणादरम्यान देण्यात येणार आहे. तसेच व्यवसायवाढीसाठी उपयुक्त असलेले शासकीय प्रमाणपत्रदेखील प्रशिक्षणार्थींना मिळणार आहे. १८ वर्षांवरील युवतींसाठी हे प्रशिक्षण असून ज्यांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन उद्योग सुरू करण्याची इच्छा आहे, अशा युवतींनी ९४२२०६९४५५ किंवा ९५०३७१३६९१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा उद्योगवर्धिनी संस्थेशी बी. सी. बॉईज हॉस्टेल, जुना एम्प्लॉयमेंट चौकाजवळ, सोलापूर येथे संपर्क साधावा आणि २४ एप्रिल पर्यंत नावनोंदणी करावी, असे आवाहन उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान यांनी याप्रसंगी केले.

या पत्रकार परिषदेस सचिवा मेधा राजोपाध्ये, उपाध्यक्षा शोभा श्रीवास्तव, खजिनदार वर्षा विभूते, संचालिका ॲड. गीतांजली चौहान, मयंक चौहान उपस्थित होते.

## डॉ. आंबेडकर जयंती साजरी



### मेडिकल असोसिएशन, पंढरपूर

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पंचशील तरुण मंडळ कराड नाका,पंढरपूर यांचेकडून पंढरपूर डॉक्टर्स मेडिकल असोसिएशनच्या सर्व डॉक्टरांचा सामाजिक कार्याबद्दल आणि कोविड मध्ये केलेल्या कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष ॲड. महेश कसबे उपस्थित होते. समाजातील सर्व घटकांनी जातीपातीच्या पुढे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत, त्याचप्रमाणे आज आपण ज्या पदावर आहोत आणि समाजात जी प्रतिष्ठा मिळवत आहोत या सर्व गोष्टी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आपणास शक्य झाले असल्याचे मत लाईन-लाइन हॉस्पिटलच्या प्रमुख डॉ. मंजुषा देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले. सूत्रसंचालन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र बनसोडे यांनी केले.यावेळी डॉ. ऋजूजा गोळवलकर-उत्पात, डॉ. दत्तात्रय साळुंखे, डॉ. अमरसिंह जमदाडे, डॉ. अमितकुमार आसबे, डॉ. अरुण मेनकुदळे, डॉ. बजरंग धोत्रे, डॉ. विनायक राऊत, डॉ. विजयसिंह पवार, डॉ. मंजुषा देशमुख, डॉ. पिसे, डॉ. श्रीधर येलमार, आर.पी. कांबळे, मारुती ठोकळे, मोहन कडलाख, मुकुंद मागाडे व डॉ.आंबेडकर उपस्थित होते.



### दुधनी येथे विविध कार्यक्रम

अक्कलकोट येथील दुधनी येथील सामाजिक कार्यकर्ते आझम शेख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम ांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी दुधनी येथील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी दुधनीचे माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे आणि जिल्हा आरपीआय गटाचे उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी प्रतिमेचे पूजन केले. या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दुधनी येथील नागरिकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ डोधमानी, दुधनी मुस्लिम अल्पसंख्याक अध्यक्ष म हेदीमिया जिडगे, शिव गायकवाड, निंगप्पा निंबाळ, कासू लोडेनवरू, भीमा झळकी, सातलिंग निंबाळ, धर्मा शिंगे, इब्राहिम अत्तार, अशपाक मुजावर, वशिम पटेल, महिबूब मोमीन, सद्दाम शेख, मुनीर अत्तार, इनुस बडेखा, फिरोज पठाण, अली जिडगे आदी भीम सैनिक याप्रसंगी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल दुधनी येथील नागरिकांतून आजम शेख यांच्या उपक्रमा बद्दल कौतुक व्यक्त होत आहे.




### भाजपा पंचायतराज व ग्रामविकास विभाग, बार्शी

पचायतराज व ग्रामविकास विभाग भाजपा २४६ बार्शी विधानसभा याचेवतीने महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले याप्रसंगी हेमंत रातंजनकर, दशरथ उकिरडे, रेखा कसबे, शिल्पा काबळे, लक्ष्मीकांत कुलकर्णी, प्रणव रणदिवे, विवेक कुलकर्णी, नम्रता पिगळे उपस्थित होते.



### वंचित बहुजन माथाडी कामगार संघटना, अक्कलकोट

अक्कलकोट मंगरूळ हायस्कूल चौक येथे वंचित बहुजन माथाडी कामगार संघटनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त मंगरुळे चौक अक्कलकोट येथे फोटो पूजन करण्यात आले. पत्रकार राजेश जगताप पत्रकार स्वामीराव गायकवाड, इंजिनिअर म नोज लोणी यांच्या वतीने महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे फोटो पूजन करण्यात आले. दरम्यान कामगार संघटने च्या वतीने बांधकाम कामगार यांना नोंदणीकृत ओळख पत्र वाटप करण्यात आले. कामगार संघटनेच्या वतीने सिद्धार्थ बनसोडे यांनी कामगारांना योजनेचा लाभ घेऊन देण्यास प्रयत्न केले अनेक बांधकाम कामगार नोंदणीकृत आहेत यांना ह्या योजनेचा लाभ मिळणार आहे व तसेच शासनमान्य पदविकेसाठी प्रतिवर्षी वीस हजार रुपये पदव्युत्तर पदवीसाठी प्रतिवर्षी २५ हजार रुपये कामगारांच्या पहिल्या मुलीच्या लग्नासाठी ५१ हजार रुपये अर्थसाह्य अनुदान ज्या कामगारांचे लग्न झाल्यास त्या कामगारांना तीस हजार रुपये अर्थसहाय्य असे या कामगारांच्या नोंदणीकोट कार्डाचे उद्दिष्टे आहेत. तालुकाध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांना कार्ड वाटप करण्यात आले. यावेळी सिद्धार्थ बनसोडे, शिलामनी बनसोडे, अमोल शिंदे, वाशिम खासबागदार उपस्थित होते.

# मोबाईलने हिरावले बालपण अन् मामांचे गावही

## पारंपरिक खेळाचा पडला विसर

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १७ एप्रिल-**

पूर्वी लहान मुलापासून ते अगदी कॉलेजला असणाऱ्या मुलांना कधी एकदा आपले पेपर संपतात आणी उन्हाळयाची सुट्टी कधी लागतेय यासाठी विद्यार्थी अगदी देव पाण्यात घालून बसत असत. एकदा सुट्टी लागली की वयाचा विचार न करता सर्व मुले एकत्र येऊन पोहणयाचा आनंद घेत असत. तसेच विटी दांडू, सूर पारंब्या, गोटया खेळणे, सुरफाटयांचा डाव, क्रिकेट, यात दिवस कसा गेला किंवा संध्याकाळचे किती वाजलेत आणी घराकडे जायचे भान सुद्धा ही मुले विसरुन जात असत. दिवसभर अक्षरशः ते मातीत खेळत असत.आंबे, कैऱ्या खाणे, जांभळे खाणे याचा आनंद लुटणारी मुलांची अक्षरशः टोळकीच्या टोळकी ग्रामीण भागात पाहवयास मिळायचा. बरीच मुले सुट्टी लागली खाजगी जिप ,एसटीने माम ाच्या गावाला जायची त्याठिकाणी जाऊन सुट्टीचा आनंद घयायचे. सुट्टी लागली की मुले घरात कमी आणी मैदानावर जास्त. जोपर्यंत आई-वडील जोराजोरांनी हाक



मारीत नाहीत तोपर्यंत मुले हे मैदानावर खेळताना दिसायची. पण आताच्या इंटरनेटच्या जमान्यात परिस्थिती बदलली मोबाईलमुळे मुलांचे बालपण हरविले आहे. ग्रामीण भागात पारंपरिक खेळही बंद झाले शहरात तर यापेक्षा भयानक अवस्था पाहवयास मिळत आहे.

लॉकडाऊनमध्ये मुलांना खरतेतर शाळा बंद असल्यामुळे मुलांना आनलाईन अभ्यास करण्यासाठी पालकांनी मोबाईल खरेदी केले. यामध्ये बोटावर मोजण्याएवढया मुलांनी मोबाईल वर प्रामाणिकपणे अभ्यास केला. पण याचा परिणाम उलट झालाय कारण मुलांना मोबाईलचे अक्षरशः व्यसन लागले आहे. मुले सध्या वेगवेगळ्या प्रकारच्या गेम्स, रिलस खेळण्यात एवढे व्यस्त झाले आहेत सुरवातीच्या काळात मोबाईलचा वापर विरंगुळा व अभ्यासाला मदत म्हणून केला पण याचा परिणाम उलट झाला मुलांना मोबाईलचे व्यसन लागले आहे. सध्या मूले कोपऱ्यात बसून तासनतास गेम्स खेळतात किंवा मित्र, मैत्रीणी बरोबर चॅटींग करीत असल्याचे पाहवयास मिळत आहेत. समाजात यामुळे याचे काही दुष्परिणाम सुद्धा पाहवयास मिळू लागले आहेत. याचा मुला-मुलींच्या पालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे खरेतर अनेक मुलांची गुणवत्ता ढासळू लागली आहे. मुलांना मामाच्या गावाचाही विसर पडला आहे. मोबाईलचा अतिवापर भविष्यात वेगवेगळ्या परिणामांना सामोरे जाणयास भाग पाडल्याशिवाय राहणार नाही हे पालकांपुढे एक मोठे आव्हान आहे.

# बेकायदा वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

## चालक फरार, अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१७ एप्रिल-**

भीमा नदी पात्रातून बेकायदा वाळू उपसा करुन बिगर नंबरचा ट्रॅक्टर जात असताना सिध्दापूर येथे पोलीसांनी पकडून अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भीमा नदीचे पात्र पाण्याअभावी कोरडे असल्याने तांडोर परिसरातून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा एक जेसीबी व चार वाहनाच्या माध्यमातून सुरु असल्याच्या अनेक तक्रारी होत्या. या दरम्यान दि.२ एप्रिल रोजी पहाटे ३ वाजता सिध्दापूर गावातील काका ढाब्या जवळून एक लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा व बिगर नंबरचा ट्रॅक्टर जात असताना पोलीसांनी पकडला.

पाठीमागील डंपींग मध्ये अज्ञात चालकाने स्वत:च्या फायद्याकरिता अवैधरित्या शासनाची परवानगी न घेता, रॉयल्टी न भरता गौणखनिज वाळू उत्खनन करुन पर्यावरणाचा ऱ्हास होईल हे माहित असतानाही वाळू चोरुन वाहतूक करत असताना पोलीसांना मिळून आला. याची फिर्याद पोलीस हवालदार श्रीमंत पवार यांनी दिल्यावर बिगर नंबरच्या अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान तपासिक अंमलदार, पोलीस हवालदार मनोज खंडागळे यांनी तो बिगर नंबरचा ट्रॅक्टर जप्त करुन पोलीस स्टेशनच्या आवारात लावला आहे. त्या फरार आरोपीचा पोलीस कसून शोध घेत आहेत. भीमा नदी पात्रात बुधवार दि. १६ रोजी उजनी धरणातून सोलापूर शहरासाठी सोडलेले पाणी आल्यामुळे वाळू चोरीला लगाम बसणार आहे.



### आंबेगांव जि.प.शाळेत स्वयंशासन दिन

**वैराग, दि. १७ एप्रिल-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबेगांव येथे प्रथम सन २०२५- २६ मध्ये दाखल पात्र मुलांचा प्रवेश उत्सव साजरा करण्यात आला व त्यांना पहिलीत प्रवेश देण्यात आला व त्यांचे स्वागत करण्यात आले. सोलापूर प्रज्ञाशोध परीक्षा, MTS परीक्षा व मंथन परीक्षामध्ये यश संपादन केलेल्या मुलांचा शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी स्वयंशासन दिन व इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी आज शाळेच्या पूर्ण दिवसाचे नियोजन केले. परिसर स्वच्छता, फलक लेखन, परिपाठ, वर्ग अध्यापन, विविध खेळ विद्यार्थ्यांनी घेतले. या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष शहाजी दळवे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ.आनंद सुरवसे,सुर्यकांत भुसारे, बाबासाहेब केंडे, इन्नस सय्यद, अण्णासाहेब भुसारे, श्रीकांत दळवे, नेताजी दळवे, नानासाहेब साळुंके,सतीश दळवे व मातापालक बहुसंख्येने उपस्थित होत्या. निरोप समारंभानिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेसाठी वॅल क्लॉक भेट म्हणून दिले. शाळेकडून सर्व विद्यार्थ्यांना पालकांना सांबर भात व गुलाबजामून देण्यात आले. मुख्याध्यापक नामदेव शेंडगे यांनी चौथीच्या पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## आपुलकी प्रतिष्ठानला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ एप्रिल-**

सांगोल्यातील अस्तित्व संस्थेचे अध्यक्ष शहाजी गडहिरे यांनी आपुलकी प्रतिष्ठानला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अनुसंधान ट्रस्ट साथी, पुणे या संस्थेच्या सहकार्याने एक ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन भेट दिली.

लोकार्पण कार्यक्रमासाठी आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, सदस्य अजयकुमार बाबर, सोमनाथ माळी, सोमनाथ सपाटे, महादेव बोराळकर, शशिकांत येलपले, अतुल वाघमोडे, अरविंद केदार, दीपक शिनगारे, प्रा.रमेश बुगड, प्रा.विधिन कांबळे, दत्तात्रय नवले, राहुल टकले, सुरेश चौगुले, अरविंद डोंबे, दत्तात्रय खटकाळे, रमेश गोडसे, रमेश देशपांडे, वसंत माने, रविंद्र कदम, अस्तित्वचे संकल्प गडहिरे, खंडेराव लांडगे उपस्थित होते. यावेळी शहाजी गडहिरे यांनी मनोगत व्यक्त केले.



आपुलकी प्रतिष्ठानकडे सध्या ५ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन व ५ हॉस्पिटल बेड रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ऑक्सीजन मशीन व बेड नाममात्र शुल्क घेऊन गरजू रुग्णांना भाड्याने वापरण्यासाठी दिले जातात. तेव्हा गरजू रुग्णांनी आपुलकीचे सचिव संतोष महिमकर, मो.नं.७६२०६५७११२ वर संपर्क साधावा.
**- राजेंद्र यादव, अध्यक्ष, आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला.**

### उद्या ईद मिलन कार्यक्रम

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने शनिवार दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता गोल्डन, हॉल मुळेगाव रोड येथे ईद मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष रियाज सय्यद यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. याप्रसंगी सोलापुरातील सर्व चालक-मालक, प्रतिनिधी, अधिकारी, राजकीय नेते, पदाधिकारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी अक्षय जाधव, संजय कुराडे, हजरत शेख, प्रदीप शिंगे, लाडजी नदाफ उपस्थित होते.



### महाळुंग येथील आरोग्य शिबीरात १५६ जणांची तपासणी

**महाळूंग, दि. १७ एप्रिल-**

श्रीपूर येथिल प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने घेण्यात आलेल्या आयुष्मान भारत योजने अंतर्गत आयुष्मान आरोग्य शिबिरात १५६ जणांची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाळुंग-श्रीपूरच्या नगराध्यक्षा लक्ष्मी चव्हाण होत्या. तर मंचावर डॉ. सचेतन घोडके, अशोक चव्हाण उपस्थित होते. प्रथम उपस्थितांच्या हस्ते आरोग्यदेवता धन्वंतरीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिबिरात लाभार्थ्यांनी विविध वैद्यकीय सेवा व मार्गदर्शनाचा लाभ घेतला. विशेषतः आयुष्मान भारत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची नोंदणी, तपासण्या व जनजागृती यासाठी शिबिर उपयुक्त ठरले. डॉ. राठोड यांनी आभार मानले.

## बार्शीत अशोक स्तंभाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १० मे १९२४ रोजी बार्शीत आले होते. या घटनेस १०१ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल येथील भीमनगर चौक येथे खासदार फंडातून अशोक स्तंभ उभारण्यात आला आहे. या अशोक स्तंभाचे उद्घाटन खा. ओमराजे निंबाळकर, आमदार दिलीप सोपल यांच्या हस्ते करण्यात आले.



भारत मुक्ती मोर्चाचे तानाजी बोकेफोडे, भाऊसाहेब कांबळे आणि भीमसैनिक यांनी नगरपालिकेकडे याठिकाणी अशोक स्तंभ उभारावा, अशी मागणी करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच चौकातून देशांतर, नाम ांतर की धर्मांतर याविषयी सखोल मार्गदर्शन केले होते. यावेळी तत्कालीन नगरसेवक सखाराम बोकेफोडे यांच्यासह भीमनगरमधील असंख्य रहिवाशी उपस्थित होते. खासदार ओमराजे निंबाळकर यांनी त्यांच्या फंडातून सुमारे ९ लाख रुपये खर्चून हा स्तंभ येथे साकारला आहे. या अशोक स्तंभामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणी नेहमीच आपल्या स्मरणात जिवंत राहतील, असे प्रतिपादन खासदार ओमराजे निंबाळकर यांनी यावेळी केले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, माजी नगरसेवक नागेश अक्कलकोटे, पृथ्वीराज बाफना, दीपक बोकेफोडे, भारत मुक्ती मोर्चाचे तानाजी बोकेफोडे, आबा बोकेफोडे, ॲड. शंकर ननवरे, मनोज सोनवणे, सुनील बोकेफोडे, संदल कांबळे, दत्ताअण्णा सोनावणे, दयावान कदम, अंदमान गायकवाड, विद्या वाघमारे, लता बोकेफोडे उपस्थित होते.

### आ. डॉ. बाबासाहेब देशमुखांनी तातडीने सोडवला विद्यार्थ्यांचा प्रश्न

**सांगोला, दि. १७ एप्रिल-**



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, सोलापूरच्या अंतर्गत घेतलेल्या बी.कॉम, भाग-३, सेमिस्टर-५ च्या परीक्षेच्या पेपर पुनर्मूल्यांकन संदर्भात काही विद्यार्थ्यांनी आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांची भेट घेऊन उत्तर पत्रीकेतील गुणांमध्ये तफावत असल्याची तक्रार केली. उत्तर पत्रिकेतील झालेल्या चुकीची माहिती दिली. त्यावर आ. देशमुख यांनी तातडीने विद्यापीठाच्या कुलगुरूंना संपर्क करून पुनर्मूल्यांकनची तारीख वाढवून देण्यास सांगितले व त्या मागणीचे पत्र विद्यापीठाला दिले. आ.देशमुख यांच्या मागणीची विद्यापीठ प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पेपर पुनर्मूल्यांकन करण्याची तारीख वाढवून देण्यात आली. आ. डॉ. बाबासाहेब देशमुख हे विद्यार्थ्यांच्या सदैव पाठीशी असणारे नेतृत्व असल्याची माहिती चंद्रकांत सरतापे यांनी दिली.




### शिवाजी पॉलीटेक्निकमध्ये तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**सांगोला, दि. १७ एप्रिल-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. उत्तम घाटूळे, भाऊसाहेब पवार तर अध्यक्षस्थानी अंकुशराव गायकवाड उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रस्ताविक प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख यांनी केले. विद्यार्थ्यांनीही मनोगतात संस्थेत घालवलेल्या वर्षांतील अनुभव सांगितले आणि प्राध्यापकांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन आणि आभार प्रा.एस. डी.बावचे यांनी केले.

## राष्ट्र उभारणीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान

### आमदार सचिन कल्याणशेट्टी; अक्कलकोट भीमनगरमध्ये डॉ. आंबेडकर जयंती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एका जाती धर्मासाठी काम केले नाही. त्यांनी देशातील सर्वच जाती धर्मासाठी काम केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना एका जाती पुरते मर्यादित न ठेवता त्यांना व्यापक दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. राष्ट्र उभारणीमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भिमनगर अक्कलकोट या ठिकाणी आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या उपस्थिती म ध्ये प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी नगरसेवक.



मिलन कल्याणशेट्टी, पोलीस उपविभागीय अधिकारी विलास यामवार, पोलीस निरीक्षक राजेंद्र टकणे, दक्षिण पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक महेश स्वामी, तहसीलदार विनायक मगर, महेश हिंडोळे, यशवंत धोंगडे, विजय हर्डीकर, प्रथमेश इंगळे, पत्रकार मारूती बावडे, स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, रमेश भंडारी, संतोष पराणे, नागराज कुंभार, शिवशरण जोजन, कांतू धनशेट्टी, अविनाश मडीखांबे, उत्तम गायकवाड, चंद्रशेखर मडीखांबे आदीची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संदीप मडिखांबे, कल्याणी घाडगे,अर्जुन साळे, भारत सोनकांबळे, विजयकुमार बाळशंकर, दत्ता मडीखांबे, तमा सुतार, गंगाराम मडीखांबे, शिवशरण शिंदे, अंबादास बनसोडे, विरपक्ष माने, स्वाम ीराव मडीखांबे, जयंती उत्सव अध्यक्ष सतीश सुतार, उपाध्यक्ष रोहित वाघमारे, महादेव बनसोडे, अजय मडीखांबे, खजिनदार: स्वामीनाथ गायकवाड, सचिव तुषार गायकवाड, सहसचिव दशरथ मडीखांबे, विजय मडीखांबे, पांडुरंग घाटगे, कार्याध्यक्ष लखन वेस्कर, सहकार्याध्यक्ष सिद्धार्थ म डीखांबे पप्पू इब्रामपूर, दत्ता शिंदे शुभम मडीखांब नागेश मडिखांबे, अमित बनसोडे, सचिन बनसोडे, बाळासाहेब मडीखांबे, शिलमनी बनसोडे, नितेश मडिखांबे, सिद्धाराम मडिखांबे, दिनेश रुही उपस्थित होते.



### शंकरनगर येथे ज्योतिबा फुले यांची जयंती

**अकलूज, दि. १७ एप्रिल-**

शंकरनगर (ता. माळशिरस) येथे ज्योतिबा फुले यांची जयंती विविध कार्यक्रमाणी साजरी करण्यात आली. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी सयाजीराजे मोहिते-पाटील, सत्यशील मोहिते पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी सैनिक व सैनिकांचे पालक यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी विजयकुमार सावंत, रामचंद्र पाचगे, नवनाथ माळी, यानाजी बाबर, महेंद्र जरे, जयवंत घाडगे, अभय रणनवरे, सोम नाथ महाजन या माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी बापू बनकर, शशी बनकर, मनोज क्षीरसागर, राहुल गवळी, सुरज गोरे, दादा सूळ, बापू जठार, रमेश शेवते, नानासो जाधव, संदीप गवळी, बापू एकतपुरे, अजय बनकर, गणेश बनकर यांनी परिश्रम घेतले.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हा परिषद बावी शाळेचे मंथन परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १७ एप्रिल-**

बावी (ता.माढा) येथील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिलीतील आदित्य नंदकुमार मोरे यांने नंथन परिक्षेत राज्यात तेरावा तर जिल्ह्यात आठवा क्रमांक मिळवून यश संपादन केले. अनुश्री कोरे या विद्यार्थिनीने राज्यात २१ वा क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे.

या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक श्रीमंतराव देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव, केंद्रप्रमुख डॉ.शिवराज ढाले यांनी अभिनंदन केले. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदकुमार मोरे




तसेच सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती बावी व सर्व ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.



**महत्वाचे...**



### शालेय स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी उपयुक्त : गटशिक्षणाधिकारी

**मोडनिंब, दि. १७ एप्रिल-**

शालेय स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्पर्धात्मक दृष्टिकोन आणि निर्णयक्षमतेचा विकास घडवत असल्याने त्या भविष्यातील अधिकारी घडवण्यासाठी उपयुक्त ठरत असल्याचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव यांनी सांगितले.मोडनिंब (ता. म ढा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ येथे विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी माढा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव बोलत होते. शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रज्ञाशोध परीक्षेत माढा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावणारा क्षितिज प्रकाश रणदिवे (इयत्ता चौथी) आणि तृतीय क्रमांक मिळवणारा यश दीपक बागल (इयत्ता सातवी) यांचा विशेष सत्कार करण्यात आला.मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत आणि जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच इंटरनॅशनल मॅथ्स ऑलिंपियाड आणि ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षेत पदकप्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी विस्तार अधिकारी डॉ. शिवराज ढाले यांनी, स्पर्धा परीक्षेत सातत्य, योग्य मार्गदर्शन व प्रामाणिक सराव आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले.या विद्यार्थ्यांना घडवण्यात मोलाचे मार्गदर्शन करणाऱ्या जयश्री शिंदे, अशोक ढोबळे, अतुल थोरात, संगीता सावंत, दादासाहेब गायकवाड, मोहन चव्हाण, विद्या भानवसे, स्वाती निचळ, निलिमा जाधव व मसुदेव चव्हाण या शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष बालाजी गायकवाड, शिक्षणप्रेमी राजेश निंबाळकर, मुख्याध्यापक राजन सावंत, शिक्षकवृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन अशोक ढोबळे यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक राजन सावंत यांनी केले.



### सांगोला विद्यामंदिरमध्ये एनएमएमएस शिक्षकांचा सत्कार

**सांगोला, दि.१७ एप्रिल-**

सांगोला विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत उत्तुंग यश मिळवलेबद्दल माजी प्राचार्य लक्ष्मण जांगळे, भिमाशंकर पैलवान, सेवानिवृत्त प्रयोगशाळा परिचर पांडूरंग भुईटे यांनी संस्थाध्यक्ष प्रबुद्धचंद्र झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, विभाग नियंत्रक प्रदीप धुकटे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख व मार्गदर्शक शिक्षकांचा अभिनंदनपर सत्कार केला. यावेळी उपमुख्याध्यापिका शाहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. यावेळी नामदेव खंडागळे, वैभव कोठावळे, निलेश जंगम, मंगेश म्हमाणे, राजेंद्र ढोले, अमोल महिमकर, मनीषा पांडे, सिताराम राऊत, शितल कांबळे, रोहिणी शिंदे, कविता राठोड, विनीत चिकमने, शिवानंद लोखंडे, दिग्विजय चव्हाण, भारती गयाळी, सविता गायकवाड, अजित मोरे यांचा सन्मान झाला.



### आदर्श राज्यस्तरीय गुणवंत पुरस्काराने प्रशांत कोल्हे सन्मानित

**बाशी, दि. १७ एप्रिल-**

येथील के.एल.ई सोसायटी संचलित सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे यांना मुंबईच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्यावतीने ६३ व्या राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशनात राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दापोली (जि. रत्नागिरी) येथील कार्यक्रमात महामंडळाचे कार्याध्यक्ष शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, अध्यक्ष तानाजी माने, सचिव नंदकुमार सागर, माजी अध्यक्ष सुभाष माने यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. मानाचा फेटा, ट्रॉफी, शाल, सन्मानपत्राने त्यांना गौरवविण्यात आले. याप्रसंगी सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे संचालक सुरेश गुंड, ज्योत्स्ना डोके, उपमुख्याध्यापक अनिरुध्द चाटी उपस्थित होते. के.एल.ई. परिवारातील सर्व पदाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापक कोल्हे यांचे अभिनंदन केले. तसेच बार्शीचे गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके, प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे, शहर व तालुक्यातील अनेक शाळांच्या मुख्याध्यापकांनीही त्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## माळशिरस तालुक्यातील २२ गावांचा पाण्याचा वनवास संपणार

### माजी आमदार राम सातपुते यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १७ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील २२ गावांना लवकरच नीरा देवघर चे पाणी मिळणार असून या गावांचा वनवास संपेल असे आश्वासन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहे. त्यामुळे पिढ्यानपिढ्या दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या तालुक्यातील जनतेतून समाधान व्यक्त होत आहे.

यासंदर्भात बुधवार दि. १६ एप्रिल रोजी मंत्रालयात जलसंपदा



**जलसंपदा मंत्र्यांशी चर्चा करताना पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते आदीसह अन्य.**

मंत्री विखे-पाटील यांच्यासह माजी आमदार राम सातपुते, पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर याची बैठक झाली.

या बैठकीत माळशिरस तालुक्यातील निरा उजव्या कालव्यापासून वंचित असणारे २२ गावे यामध्ये कोथळे, कारुंडे, पिंपरी, फडतरी, लोंढे मोहितेवाडी, लोणंद, गिरवी, भांब, रेडे, कन्हेर, मानकी, इस्लामपूर, गोरडवाडी, गारवड, मगरवाडी, पठाणवस्ती, तरंगफळ सुळेवाडी, शिंगोर्णी, बचेरी, जळभावी आदी गावे कायमच दुष्काळी गावे म्हणून ओळखली जातात. परंतु माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर व माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांनी सातत्याने या २२ गावांना नीरा देवघरचे पाणी मि ळावे यासाठी प्रयत्न केले. काही तांत्रिक अडचणीमुळे ही प्रक्रिया लांबणीवर पडत होती. परंतु बुधवारी मा आ राम सातपुते यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार नाईक निंबाळकर व स्वतः बैठकीस उपस्थित राहून यावर मार्ग काढला असून लवकरच या २२ गावांना पाणी मिळणार आहे. या बैठकीसाठी जलसंपदा मंत्र्यासह जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव, कार्यकारी संचालक तसेच प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

> **दुष्काळी कलंक पुसणार**
>
> माळशिरस तालुक्यातील २२ गावाकडे दुष्काळी गावे म्हणून सातत्याने पाहिले जात होते. या गावातील नागरिक मुंबई पुणे यासारख्या शहरांमध्ये कामानिमित्त स्थलांतरित होत होते. या ठिकाणी कमालीचे दारिद्र्य वास्तव्य करीत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे, मा खा रणजीतसिंह नाईक निंबाळकर व मा आ राम सातपुते यांच्या प्रयत्नातून २२ गावांच्या कपाळी असणारा दुष्काळी कलंक पुसणार आहे .
>
> **- महादेव पवार, शेतकरी इस्लामपूर**

## प्रिसिजनने केला कासेगावला पाणीदार बनवण्याचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

समृद्धी ग्रामविकास अभियानांतर्गत कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे प्रिसिजन कॅम शाफ्टस लिमिटेड आणि सेवावर्धिनी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाणलोट विकासाच्या कामांचा शुभारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमाचा उद्देश म्हणजे डोंगराच्या माथ्यापासून ते शेवटच्या शेतापर्यंत जलसंधारणाची शाश्वत तंत्रे राबवून संपूर्ण परिसराचा पाणलोट क्षेत्र म्हणून विकास करणे हा आहे. प्रस्ताविक सेवावर्धिनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश देगावकर यांनी केले. त्यांनी अभियानाची पार्श्वभूमी व उद्दिष्टे स्पष्ट करत प्रिसिजन कॅमशाफ्टस लिमिटेड कंपनीच्या सीएसआर सहकार्याबाबत माहिती दिली. प्रिसिजन फाउंडेशनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी शाश्वत जलसंधारण हे ग्राम विकासाचे मूलभूत अंग असून, प्रिसिजन कॅमशाफ्टस लिमिटेड कंपनीच्या सामाजिक बांधिलकीतून हे कार्य करीत आहे. येत्या तीन वर्षात ही जलसंधारणाची कामे होणार



असून गावकऱ्यांचा सहभाग गरजेचा आहे असे सांगून प्रकल्पासाठी निधी देण्यामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. वडकबाळकरांनी पाणलोट क्षेत्र विकासाचे तांत्रिक, पर्यावरणीय आणि सामाजिक फायदे उलगडून सांगितले. त्याचबरोबर पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवून व बंधाऱ्यात साठवून त्या पाण्याचा योग्य वापर करावा असे सांगत गावकऱ्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवून या बंधाऱ्यातील दर दोन चार वर्षांनी गाळ काढणे, स्वच्छता करणे अशा गोष्टी करण्यासाठी प्रोत्साहित केले. डॉ. अजित देशपांडे यांनी कोरडवाहू शेतीच्या आव्हानांवर उपाय सुचवत शाश्वत शेतीची दिशा स्पष्ट केली. त्याचबरोबर ज्यांच्याकडे भरड शेती आहे अशा शेतकऱ्यांनी वृक्ष शेती कडे वळावे असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी प्रिसिजन कॅमशाफ्टस लिमिटेडचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे, विनायक दुदगी, सरपंच यशपाल वाडकर, उपसरपंच ज्ञानेश्वर रोकडे, माजी सरपंच नेताजी पाटील, सरकार पाटील, विलास वाडकर, मल्लिनाथ येणगुरे, शाम इटूकडे, शहाजहान शेख, मोहन जाधव, जालिंदर गायकवाड, दत्तात्रय काटकर, लक्ष्मण ढेकळे, निशिकांत पाटील, प्रदीप माने, भरत चौगुले, भरत जाधव आदी उपस्थित होते. चन्नवीर बंकुर यांनी सूत्रसंचालन केले. सरपंच यशपाल वाडकर यांनी आभार मानले.

## शहीद जवान आप्पासाहेब काटे स्मृतीस्थळाचे भूमीपूजन

### ग्रामस्थांसह सैनिक कल्याणकारी मंडळाचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१७ एप्रिल-**

कुंभेज (ता. करमाळा) येथे देशप्रेमी नागरिक व ग्रामस्थांच्या सहकार्याने सैनिक कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून शहीदांची स्मृती जपणे नैतिक जबाबदारी मानून शहीद जवान आप्पासाहेब काटे यांच्या नियोजित स्मृतीस्थळाचे भुमीपूजन नुकतेच करण्यात आले.

यावेळी शहीद जवान कुटुंबीय सोनामाता काटे, शहीद पत्नी राणीताई काटे, ॲड.बाळासाहेब मुटके, सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष मेजर अक्रुर शिंदे, बागल विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पाटील, विदर्भ कोकण बँकेचे अधिकारी गणेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते अनिल कादगे, प्रा.सचिन हवालदार, मेजर मोहन मुटके, मेजर जालिंदर कन्हेरे, महावीर साळुंके, सुभेदार हाके, इंदापूर सैनिक संघटनेचे मेजर काटे, गोकुळ शिंदे, उपसरपंच संजय तोरमल, सैनिक



संघटनेचे सचिव सुभेदार बिभिषण कन्हेरे, पै.आण्णासाहेब साळुंके, भारत काटे, हवालदार बाळासाहेब कन्हेरे, आण्णासाहेब भोसले, सुभेदार आदलिंग, सुभेदार माणिक कडाळे, मेजर सुभाष मुटके, मेजर संतोष वीर, अंकुश गायकवाड, दत्तात्रय शिंदे, संभाजी भोसले, निलेश साळुंके, महावीर भोसले, संदीप शिंदे, अगस्ती मुटके, सोपान शिंदे, छगन गायकवाड, संतोष गजेंद्र शिंदे, अभियंता शशीकांत कन्हेरे, बाबासो माळी, आबा काटे, गोरख मुटके, मेजर कादगे, कांतीलाल कादगे, बागल विद्यालयाचे शिक्षक कल्याणराव साळुंके, सिताराम बनसोडे, संतोष शिंदे, विष्णू पोळ, दादा जाधव, कुमार कादगे, विनोद कादगे, संतोष घोरपडे, सैनिक, प्रीतम चौगुले, सैनिक किरण मोहिते, माजी सैनिक दादासाहेब कन्हेरे, माजी सैनिक सरडे, माजी सैनिक, बाळासाहेब शिंदे उपस्थित होते. यावेळी ॲड. मुटके यांनी सैनिक म्हणजे देशाचे रत्न असल्याने एखादा शहीद झाला तर कुटूंबासह देशाचे अपरिमित नुकसान होते. भावी पिढीला देशसेवेची व राष्ट्रप्रेमाची प्रेरणा देणारा सैनिकच असल्याचे सांगितले. यावेळी मेजर अक्रुर शिंदे, मुख्याध्यापक पाटील, बँक अधिकारी शिंदे, सामाजिक कार्यकर्ते कादगे, प्रा. हवालदार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष मेजर शिंदे यांनी शहीद काटे यांच्या स्मृती स्थळासाठी आर्थिक योगदान देण्याचे ग्रामस्थांना आवाहन केले तसेच उपस्थितांचे आभार मानले. कल्याणराव साळुंके यांनी सूत्रसंचालन केले.

## दत्तकला महाविद्यालयात एआय अभ्यासक्रमास मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१७ एप्रिल**

दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन या अभियांत्रिकी महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) या अभ्यासक्रमास ऑल इंडिया कॉन्सिल ऑफ टेक्नीकल एज्युकेशन , दिल्ली यांचेकडून मान्यता मिळाली आहे.

दत्तकला इंजिनिअरिंग म हाविद्यालयामध्ये काळानुरूप सर्व शाखा उपलब्ध असून त्यात कृत्रिम बुद्धीमत्ता या शाखेचा समाविष्ठ झाल्यामुळे तंत्रज्ञानाची सर्वच क्षेत्रातील गरज ओळखून महाविद्यालयाने या अभ्यासक्रम ासाठी अध्यक्ष रामदास झोळ यांचे मार्गदर्शनाखाली आयसीटीईकडे अर्ज केला होता. सर्व प्रगतशील क्षेत्रात संशोधन करण्यास विद्यार्थ्यांना मोठी संधी मिळणार आहे.सदर आयसीटीइचे ऑनलाईन छाननीसाठी सचिवा माया झोळ स्वतः उपस्थित राहून आवश्यक पूर्तता करणे संदर्भात समिती बरोबर चर्चा केली. तसेच प्राचार्य व प्रा. शितल धायगुडे, डीन अॅकेडमीक, डॉ. अनारसे, डिन रिसर्च, व डॉ. बेरे, एच.ओ.डी. कॉम्प्युटर, सांळुखे यांनी प्रस्तावासाठी व इतर कामासाठी कामगिरी निभावली.

## माजी विद्यार्थीनींच्या हस्ते मंदिराचे कळसारोहण

### शेळगाव हायस्कूल प्रांगणातील श्रीराम मंदिराला आले पूर्णत्व

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ एप्रिल-**

शेळगाव (आर) (ता. बार्शी) येथील शेळगाव हायस्कूल या शाळेतून यंदा शिकून सासरी गेलेल्या माहेरवाशीन मुलींनी शाळेच्या प्रांगणातील श्रीराम मंदिराचा कळसारोहण करण्याचा निश्चय केला अन तो पूर्णत्वास नेला. त्यामुळे ३५ वर्षांपूर्वीच्या या मंदिराला पूर्णत्व आले आहे.

शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शेळगाव हायस्कूलला येथील मार्तंडे दळवी यांनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या मार्फत शाळेला पाच एकर जमीन दान दिली. त्या बदल्यात सदर जागेत अखंड आरती तेवत राहावी अशी त्यांची मागणी होती. त्यानुसार संस्थेचे संस्थापक



सचिव लक्ष्मणराव गायकवाड, संस्थाध्यक्ष नानासाहेब गायकवाड, संस्था संचालक रामचंद्र देवकर, चांगदेव गायकवाड, बळीराम बादगुडे, सदाशि व बादगुडे, गायकवाड गुरुजी यांनी त्या मागणीचा विचार करून प्रशालेच्या प्रांगणात मंदिराची उभारणी केली. सुमारे ३५ वर्षांपूर्वी या मंदिरामध्ये प्रभूरामचंद्र, लक्ष्मण, सीता यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना संस्थेचे संस्थापक सचिव लक्ष्मणराव गायकवाड व त्यांच्या पत्नी शकुंतला गायकवाड तसेच संस्थेचे संचालक विवेकानंद मिसाळ यांनी सपत्नीक प्रतिष्ठापना केली. तेव्हापासून आजतागायत रामनवमीनिमित्त येथे अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. मागील सर्व अखंड हरिनाम सप्ताह हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील कार्यरत कर्मचारी यांच्यातर्फे आजतागायत सुरू आहे. या शाळेतून यंदा शिकून सासरी गेलेल्या माहेरवाशीन मुलींनी शाळेतील श्रीराम मंदिरास कळसारोहण करण्याचा निश्चय केला व तो पूर्णत्वास नेला. रविवारी टाळ मृदंगांचा गजर करत विद्यार्थी भजनी मंडळी सहभागी होऊन सर्व गावातून कळसासह मिरवणूक काढण्यात आली. शशिकांत जाधव महाराज, मन्मथ महाराज, कुमार महाराज, संतोष गाडेकर महाराज, रामेश्वर मते महाराजआदींची कीर्तनसेवा झाली. बाबा गायकवाड यांच्यामार्फत सुमारे चार हजार भाविकांना महाप्रसादाचा लाभ दिला गेला.

## एआय तंत्रज्ञानाच्या जमान्यात विद्यार्थी संस्कारक्षम बनवावेत

### खासदार धैर्यशील मोहिते-पाटील; आदर्श शिक्षक, शिक्षिका पुरस्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ एप्रिल-**

एआय या टेक्नॉलॉजीच्या जम ान्यात विद्यार्थी हा सक्षम, संस्कारक्षम बनायला हवा त्यासाठी सर्व शिक्षकांनी काम करावे, सोबतच शिक्षक सहकार संघटनेच्या माध्यमातून माळशिरस तालुक्यातील शिक्षकांसाठी नविन उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. शिक्षक बांधवानी टाकाऊ पासून टिकाऊ हा उपक्रम राबवावा, विद्यार्थी यांनी सर्व प्रकारच्या बियांचे संकलन करून, शाळेकडे येणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूनी वृक्षारोपण करावे, जेणेकरून पर्यावरण समतोल व पर्यावरण संवर्धन यासाठी मदत होईल,



असे प्रतिपादन खासदार धैर्यशील मोहिते - पाटील यांनी केले.

अकलूज येथे शिक्षक सहकार संघटना शाखा माळशिरसचा गुणवंत आदर्श शिक्षक, शिक्षिका पुरस्कार सोहळा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी राज्यकार्याध्यक्ष दिपक परचंडे यांनी खासदार धैर्यशील मोहिते- पाटील यांचे स्वागत केले. यावेळी राष्ट्रनिर्माण आदर्श शिक्षिका पुरस्कार, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, प्रतिभावंत कलाकार पुरस्कार, अष्टपैलू खेळाडू पुरस्कार, उत्कृष्ट कलाकार पुरस्कार, व जिल्हा स्तर कला, क्रीडा स्पर्धा विजेता प्राप्त शिक्षक पुरस्कार यांचे अभिनंदन करून मार्गदर्शन केले.

याप्रसंगी राज्याध्यक्ष संतोष पिट्टलवाड, राज्यसरचिटणीस निलेश देशमुख, राज्य उपाध्यक्ष मनोज कोरडे, राज्य संघटक विठ्ठल टेळे, जिल्हा अध्यक्ष रविराज खडाखडे, महिला आघाडी जिल्हा अध्यक्षा सुवर्णा गाडे उपस्थित होते.यावेळी राज्याध्यक्ष संतोष पिट्टलवाड यांनी शिक्षकांच्या विविध मागण्याचे निवेदन खासदार साहेबांना दिले. कार्यक्रमाच्या सुरवातीला तालुका अध्यक्ष नागनाथ बळवंतराव यांनी प्रास्ताविक केले. माळशिरस तालुक्यातील त्र्याहत्तर शिक्षक -शिक्षिका यांना विविध पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रम ाचे नियोजन राज्यकार्याध्यक्ष, दिपक परचंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन गाडे, सुबोध काटे, दादासाहेब भोसले, ज्ञानेश्वर सर्जे, सचिन वलेकर, सतीश बरळ, बाळासाहेब लोखंडे, केशव अभंगराव, सूर्यकांत जाधव, सोमनाथ कांबळे, गणेश देशमुख, माणिक करडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी तालुक्यातील शिक्षक बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व शिक्षक संघटना समन्वय समिती माळशिरसच्या पदाधिकारी यांचे राज्यकार्याध्यक्ष दिपक परचंडे यांनी आभार मानले.